सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ३० नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २४६ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नाना पटोले आरएसएसचे एजंट म्हणून काम करतात; त्यांची पक्षातून हकालपट्टी करावी

## काँग्रेसच्या पराभूत उमेदवार बंटी शेळकेंचा आरोप

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी
मुंबई,दि.२९ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीत नामुष्पकीजन्य पराभवाला सामोरे जावे लागलेल्या काँग्रेसमधील अंतर्गत वाद आता चव्हाट्यावर येत आहेत .काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे आरएसएसचे एजंट असून माझ्या पराभवसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले, असा सनसनाटी व गंभीर आरोप नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार बंटी शेळके यांनी शुक्रवारी केला. टिळक भवनात गुरुवारी झालेल्या पक्षाच्या बैठकीत ही आपण नाना पटोले यांच्या बडतर्फीची मागणी केली आहे असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या आरोपामुळे काँग्रेसला मध्ये काही अलबेल नसल्याचे स्पष्ट होत आहे .

नागपूर मध्य मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार असलेल्या बंटी बाबा शेळके यांचा भाजपाचे उमेदवार प्रवीण दटके यांनी ११,६३२ मतांनी पराभव केला आहे. आपल्या पराभवाला त्यांनी सर्वस्वी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना जबाबदार धरले आहे. ते म्हणाले,'माझे नेते राहुल गांधीजी म्हणतात घाबरू नका, तुमचे सरकार किंवा तुमच्या पक्षाच्या नेत्यांनी काही चुकीचे केले तरी उघड विरोध करा. मी माझ्या नेत्याने दिलेल्या आदेशाचे आणि माझ्या लोकशाही अधिकारांचे पालन करत आहे. संघ मुख्यालयासमोर द्वेषाची भावना असलेल्या संघाची खाकी चड्डी आणि काळ्या टोप्या हा गणवेश मी जाळू शकतो, तर काँग्रेस पक्षाच्या सन्मानासाठी नाना पटोले यांच्यासारख्या संघाच्या दलालांचाही मी तीव्र निषेध करू शकतो. त्यांनी पहिल्यांदा माझे तिकीट कापण्याचा अटोकाट प्रयत्न केला. स्थानिक निरीक्षकाकडून पाठवलेल्या उमेदवारांच्या यादीत माझे नावच येऊ दिले नव्हते. त्यानंतरही राहुल गांधी यांनी हस्तक्षेप करून केल्याने आपल्याला तिकीट मिळाले मात्र माझ्यासाठी एक ही प्रचार सभा घेतली नाही तत्व पडतोय मोठ्या नेत्याला मतदारसंघात आणले नाही केवळ प्रियांका गांधी यांचा एक रोडशो झाला होता त्यामुळे पाठवले हे आपल्या पराभवासाठी भाजपाच्या उमेदवाराला आतून मदत केल्याचे स्पष्ट आहे. ते संघाचे एजंट म्हणून काम करतात त्यामुळे त्यांना पक्षातून बडतर्फ करून त्याच संघटनेत पाठवावे, असे सांगून ते म्हणाले,'बहुतांश ब्लॉक अध्यक्ष माझ्या बाजूने नव्हते.

दोन महिला अध्यक्ष माझ्याविरोधात नियुक्त केल्या. मध्यतील कुणालाही पद हवे असल्यास माझा विरोध करावा, अशी त्यांची भूमिका होती. टिळक भवनात झालेल्या पराभूत उमेदवाराच्या बैठकीत आपण आपल्या भावना उघडपणे व्यक्त केल्या आहेत पक्षाकडून योग्य ती कारवाई व्हावी अशी अपेक्षा आहे त्यांनी सांगितले. त्यामुळे हाय कमांड याबाबत आता कोणतं भूमिका घेते याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे.

### तो संघटनेतला विषय आहे, त्यावर औषध नंतर करू : नाना पटोले

बंटी शेळके यांनी केलेल्या गंभीर आरोप केलेल्या नाना पटोलें यांनी त्याबाबत अधिक बोलणे टाळले आहे. बंटी शेळके यांनी केलेल्या आरोपावर मी नंतर बोलेन, तो संघटनेतला विषय आहे, त्यावर औषध नंतर करू. मी लोकशाही वाचवण्यासाठी काम करत आहे. त्याचे गांभीर्य मला आहे, असे त्यांनी सांगितले.

### बंटी शेळके हा लढवय्या नेता - विजय वडेट्टीवार

बंटी शेळके काय बोलले हे मला माहीत नाही, त्यांचा उद्रेक का झाला, ही भाषा ते का वापरात आहे. हे हायकमांडच्या कानावर घालू, उद्वेगाची करणे शोधले पाहिजे. त्यांना ठेच लागली, याची माहिती घेतली जाईल. जय पराजय होत असतो, संयम महत्वाचा असतो, १६ चे १६० कसे होतील, बंटी शेळके हा लढवय्या आहे, निवडणुकीत मदत कमी पडल्याने त्यांनी राग व्यक्त केला असावा असे मत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले आहे.

# एका दिवसात तब्बल ९.९९ लाख ३५९ मतांची वाढ कशी झाली?

## काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे विचारणा

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २९ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीतील महाघोटाळा दिसत असल्याने जनभावना अत्यंत तीव्र आहेत. निवडणूक आयोगाने जाहीर केलेली मतांची आकडेवारी पाहता मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ नंतर मतदान केंद्रावर लांबच लांब रांगा लागल्या असल्या पाहिजेत. राज्यातील किती मतदारसंघावर त्यावेळी लांब रांगा लागल्या होत्या? याचे व्हिडीओ चित्रीकरणासह पुरावे निवडणूक आयोगाने जाहीर करावेत, अशी मागणी करणारे पत्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाकडे पाठवून केली आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, आयोगाच्या मतांमधील ७.८३ टक्के वाढीवर शंका उपस्थित होत असून अधिकृत आकडेवारीनुसार २० नोव्हेंबरला रात्री ११.३० वाजेपर्यंत ६५.२% मतदान झाले होते. दुस-या दिवशी म्हणजे २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता जाहीर केलेली अधिकृत आकडेवारी ६६.०५% होती. निवडणूक आयोगाने स्वत: अधिकृतरित्या जाहीर केलेल्या आकडेवारीत १.०३% ची तफावत कुठून आली? एका दिवसात तब्बल ९ लाख ९९ हजार ३५९ मतांची वाढ कशी झाली? मतांच्या टक्केवारीतील तफावत पाहता हा प्रकार गंभीर व चिंताजनक वाटत आहे. या वाढीबद्दल जनतेच्या मनातच शंका उपस्थित होत असतील तर त्या दूर करणे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. निवडणूक आयोगाने स्वतः पुढे येऊन आपली भूमिका पुराव्यासह स्पष्ट करावी, असे या पत्रात नमूद केले आहे.









## 'महाराष्ट्राची हास्यजत्रा', कॉमेडीची हॅटट्रीक!

छत्रपती संभाजीनगर - सोनी मराठी वाहिनीवरील 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाने महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. या कार्यक्रमाचे अनेक चाहते आहेत आणि यांमध्ये अनेक दिग्गज नामवंतांचाही समावेश आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' ह्या कार्यक्रमची नवी पर्वे, त्यांतले नवे विषय, नवनवीन प्रहसने यांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन होत असते. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' आता कॉमेडीची हॅटट्रीक घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या नव्या पर्वामध्ये आपल्याला नक्कीच नवीन काहीतरी पाहायला मिळणार आहे. तब्बल ६ वर्षांहून जास्त काळ 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम प्रेक्षकांचे मनोरंजन करतो आहे.

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' ह्या कार्यक्रमाचे आजवर ८००पेक्षा अधिक भाग प्रसारित झाले आहेत. ह्या कार्यक्रमाने प्रेक्षकांच्या मनात घर केले असून प्रेक्षकांनीही त्यांच्या या आवडत्या कार्यक्रमाला भरपूर प्रेम दिले आहे.२ डिसेंबरपासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा', कॉमेडीची हॅटट्रीक हे नवे पर्व सोनी मराठी वाहिनीवर सुरू होणार आहे. या पर्वाचे वैशिष्ट्य काय असणार आहे, याबद्दल 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचे निर्माते आणि दिग्दर्शक सचिन गोस्वामी म्हणाले, प्रेक्षकांनी यापूर्वी प्रहसनांच्या अनेक मालिका पाहिल्या. यांतून अनेक पात्रे लोकप्रिय झाली, पण ती पात्रे फक्त त्या-त्या मालिकेमध्ये पाहिली. या नव्या पर्वामध्ये वेगवेगळ्या मालिकांमधली पात्रे एकमेकांच्या मालिकांमध्ये जाऊन धमाल करताना प्रेक्षकांना पाहायला मिळतील. ह्या पर्वात हा नवा प्रयोग आपल्याला पाहता येईल. यातून नक्कीच मोठा हास्यकल्लोळ निर्माण होईल आणि तो प्रेक्षकांना नक्कीच आवडेल अशी मला खात्री आहे.

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचे निर्माते आणि लेखक सचिन मोटे म्हणाले, यंदाच्या पर्वात प्रेक्षकांच्या आवडत्या मालिकेमध्ये काही नवनवीन पात्रे पाहायला मिळतील. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचे लेखक पुन्हा एकदा सज्ज झाले आहेत आणि आधीच्या विषयांमध्ये नवीन पात्रांचा आणि गोष्टींचा समावेश करून ते सादर करण्यात येणार आहेत.'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाच्या नव्या पर्वाचे विशेष प्रोमोज प्रेक्षकांना आवडताहेत. पहिल्याच काही भागांमधला आश्चर्यचकित करणारा पहिलाच भाग प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

# फेंगल चक्रीवादळ अधिक तीव्र होण्याची शक्यता

चेन्नई: तामिळनाडूला धडकणारे फेंगल चक्रीवादळ आगामी २४ तासात अधिक तीव्र होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) वर्तवली आहे. उत्तर तामिळनाडू, पुडुचेरी आणि दक्षिण आंध्र प्रदेश किनारी भागांत ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच काही भागांत संभाव्य पूरपरिस्थिती निर्माण होण्याची देखील शक्यता आहे.



बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले चक्रीवादळ 'फेंगल' तमिळनाडूच्या किनारपट्टीच्या जिल्ह्यांकडे येत आहे. त्यामुळे तामिळनाडून राज्यातील बहुतांश भागात मुसळधार आणि व्यापक पावसाचा अंदाज आयएमडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वर्तवला आहे. फेंगल चक्रीवादळ येत्या २४ तासांत तीव्र होण्याचा अंदाज आहे. ते उत्तर-वायव्य दिशेने सरकत असून शनिवारी ३० नोव्हेंबरच्या सकाळपर्यंत कराईकल आणि महाबलीपुरम दरम्यान ओलांडण्याची शक्यता आहे. या चक्रीवादाळामुळे, तामिळनाडूच्या बहुतेक भागांमध्ये पुढील २-३ दिवसांत मोठ्या ते मध्यम स्वरूपात पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे आयएमडीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावाखाली मुसळधार पावसाचा अंदाज असल्याने केंद्रशासित प्रदेशातील सर्व शाळा आणि महाविद्यालये ३० नोव्हेंबरपर्यंत बंद राहतील, असे पुद्दुचेरी सरकारने जाहीर केले आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात फेंगल चक्रीवादळाची तीव्रता वाढत असल्याने भारतीय नौदलाने सर्वसमावेशक आपत्ती प्रतिसाद योजना सक्रिय केली आहे. तसेच मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा सल्लाही अधिकाऱ्यांनी दिला आहे.

## वाचवले दुर्मिळ अशा गिळण्यास होणाऱ्या समस्येतून ३४ वर्षीय रुग्णाचे प्राण

अगदी नुकत्याच घडलेल्या घटने मध्ये पुण्यातील बाणेर येथे असलेल्या मणिपाल हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी गिळण्यास त्रास होत असलेल्या दुर्मिळ अशा समस्येशी झगडणा-या ३४ वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार केले आहेत. हा रुग्ण डिसफेजिया या आजाराने त्रस्त होता आणि त्यामुळे त्याला गिळण्यास त्रास हाणे, उलट्या होणे, मळमळणे, भूक न लागणे अशी लक्षणे दिसून येत होती त्याच बरोबर गेल्या सहा महिन्यांपासून हा त्रास असल्याने त्याच्या जीवनशैलीवर यांचा घातक परिणाम होत होता. त्याच बरोबर त्याची ही परिस्थिती पहाता त्याच्यावर एसोफॅगो-गॅस्ट्रो-ड्युओडेनोस्कोपी (ओजीडी स्कॉपी) ही करण्यात आली होती. यातून असे दिसून येते की त्याला अचलसिया कार्डियाचा सुध्दा त्रास आहे. त्याची तपासणी केल्यावर डॉ. प्रसाद भाटे आणि त्यांच्या चमूने त्याच्यावर पर ओरल एन्डोस्कोपिक म्योटोमी (पीओईएम) प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (व्हि.एन. काटकर साहेब) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- ३६५/२०२४

अर्जदार : १. नांदीबाई भ्र.उदा राठोड, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. गव्हालीतांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद / छ. संभाजीनगर २. कैलास पिता उदा राठौड, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. गव्हाली तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद / छ. संभाजीनगर ३. नारायण पिता उदा राठोड, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. गव्हालीतांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद / छ. संभाजीनगर ४. विनायक पिता उदा राठोड, वय ३५ वर्षे, धंदा- शेती, रा. गव्हालीतांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद / छ. संभाजीनगर ५. यशोबदाबाई भ्र. बळीराम चव्हाण, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. हिवरखेडा गौताळा ता. कन्नड जि. औरंगाबाद / छ. संभाजीनगर ६. अलका भ्र. किसन चव्हाण, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचखेडा बु. ता. कन्नड जि. औरंगाबाद / छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे - जिल्हा अधिकारी औरंगाबाद.

अर्ज:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायैदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ६ यांनी ॲड. हि. के. चव्हाण कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की, अर्जदार क्रं. १ चे पती व अर्जदार क्रं. २ ते ६ चे वडील नामै उदा देवराव राठौड, रा. गव्हाली तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद / छ. संभाजीनगर है दिनांक. २०.०९.२०२४ रोजी मयत झालेले असुन मयतास त्याचे मृत्यु पश्चात व मृत्यु समयी अर्जदार नं.१ ही त्यांची निधना पत्नी असुन अर्जदार २ ते ४ मुलै व अर्जदार क्रं.५ व ६ ह्या विवाहीत मुली आहेत. मयताने त्याचे हयातीत कोणतेही इच्छा अथवा मृत्युपत्र करुन ठेवले नाही. करीता मयताचे मृत्यु पश्चात त्याचे स्थावर जंगम, मिळकतीतील हक्क व अधिकार, ऋण, रेशन, तसेच महसुल, ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी नोंदणी करणे संदर्भात कार्यालयीन आणि मयताचे मृत्यु पश्चातचे शासकिय व निमशासकिय यौजनांचे लाभां करीता वारस कार्यवाहीसाठी अर्जदार है मयताचे वारस असल्याने कायदेशिर वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन मा. न्यायालयात दाखल केले आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत कौर्टात सादर करावा. अन्यथा मुदतीत कोणाचेही उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांचा उपरोक्त अर्ज मंजुर करून अर्जदार नं. १ ते ६ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतरचा आलेला उजर / आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक. २९.११. २०२४

प्रकरणात पुढील तारीखः-०६/०१/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## ग्रामपंचायत कार्यालय आगरनांदूर ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर सर्वसाधारण मुदतीची निविदा नोटीस

सर्व शासनमान्य / तसेच पा.पु. अधिकृत विक्रेते उत्पादक, पुरवठादार धारकांना कळविण्यात येते की, ग्रामपंचागत आगरनांदूर ता. पैठण १५ वा वित्त आयोग योजना खालील नमुद केलेल्या कामाची मोहोरबंद लखोट्यातून निविदा मागवित आहे. सदरची ही दोन लिफाफा पध्दतीने देणेच्या आहेत. लिफाफा क.१ मध्ये तांत्रिक मागदपत्रे असावीत व लिफाफा क्र.२ मध्ये मध्यनिविदापत्रक असावे व तसे दोन्ही लिफाफ्यावर नमुद करुन दोन्ही लिफाफे मोठ्या लिफाफ्यात मोहरबंद करावेत,

| अ.क्र | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ष 2022-23 | | | | | | |
| 1 | [illegible] | 50000 | 1000 | 500 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 2 | [illegible] | 150000 | 3000 | 1500 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 3 | [illegible] | 78874 | 1577 | 788 | 200 | 15 दिवस | [illegible] |
| 4 | [illegible] | 46431 | 928 | 464 | 200 | 15 दिवस | [illegible] |
| | वर्ष 2023-2024 | | | | | | |
| 1 | [illegible] | 59828 | 1196 | 598 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 2 | [illegible] | 100000 | 2000 | 1000 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 3 | [illegible] | 100000 | 2000 | 1000 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 4 | [illegible] | 20000 | 400 | 200 | 200 | 15 दिवस | [illegible] |
| 5 | [illegible] | 431420 | 8628 | 4314 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 6 | [illegible] RO ATM [illegible] | 355000 | 7100 | 3550 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 7 | [illegible] | 100000 | 2000 | 1000 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 8 | [illegible] | 150000 | 3000 | 1500 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 9 | [illegible] | 70000 | 1400 | 700 | 200 | 15 दिवस | [illegible] |
| 10 | [illegible] | 200000 | 4000 | 2000 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 11 | [illegible] | 236420 | 4728 | 2364 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 12 | [illegible] | 100000 | 2000 | 1000 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 13 | [illegible] | 59828 | 1196 | 598 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 14 | LED [illegible] | 120000 | 2400 | 1200 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 15 | [illegible] | 100000 | 2000 | 1000 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 16 | [illegible] LED [illegible] | 100000 | 2000 | 1000 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 17 | [illegible] | 30000 | 600 | 300 | 200 | 15 दिवस | [illegible] |
| 18 | [illegible] | 74679 | 1493 | 746 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 19 | [illegible] | 100000 | 2000 | 1000 | 200 | 30 दिवस | [illegible] |
| 20 | [illegible] | 200000 | 4000 | 2000 | 200 | 30 दिवस | [illegible] |

निविदापत्रके दिनांक : ०१/१२/२०२४ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत ग्रा.पं. कार्यालयाकडे विकत मिळतील दि.०७/१२/२०२४ रोजी दु.३.०० वा. पर्यंत भरलेली निविदापत्रके ग्रा.पं. कार्यालयात स्विकारली जातील. बयाणा रक्कम रोख निविदेसोबत देणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदा विचारात घेतली जाणार नाही. या कामासाठी निविदाधारक चालक असला पाहिजे. निविदाच्या शर्ती, संपुर्ण माहिती सुट्टीखेरीज कार्यालयीन बेळेत पहावयास मिळतील.

शती व अटी ज्यांना मान्य असतील त्यांनीच निविदा देण्याचे आहेत, कोणतेही अट घालणेची नाही. कमी अथवा ज्याजा दराची निविदा मंजुर करणे अथवा नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाही. शक्य झाल्यास त्याच दिवशी हजर निविदा धारकांसमोर अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीसमोर बंद निविदा पाकिटे सरपंच ग्रामपंचायत अधिकारी / सदस्य ग्रा.पं. कार्यालयात उघडली जातील. बंद लखोट्यावर कामाचे नाव नमुद केले प्रमाणे लिहावे.

स्वाक्षरीत/- **संरपंच** — स्वाक्षरीत /- **ग्रामपंचायत अधिकारी**

## 'संगीत मानापमान' चा भव्य म्युझिक लाँच सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न !



छत्रपती संभाजीनगर : मायानगरी मुंबईत, जिओ स्टुडिओज प्रस्तुत आगामी मॅग्नम ऑपस संगीतमय चित्रपट संगीत मानापमान चा ग्रँड म्यूझिक लाँच सोहळा पार पडला. १० जानेवारी २०२५ ला संगीत मानापमान हा सिनेमा आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. हा सिनेमा म्हणजे कला, संस्कृती आणि संगीताचा एक उत्सव.

खाडिलकरांच्या ११४ वर्ष जुन्या अभिजात नाटकावरून प्रेरित, संगीत मानापमान हा सिनेमा कट्यार काळजात घुसली तसेच आणिडॉ. काशिनाथ घाणेकर यांसारख्या प्रतिष्ठित चित्रपटांचा समृद्ध वारसा पुढे नेत आहे. नयनरम्य दृश्य, अस्सल संगीतमय कथाकथन आणि एका पेक्षा एक कलाकार आश्वासन देतायत की हा सिनेमा नक्कीच एक अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे.

दिग्गज संगीतकार शंकर-एहसान-लॉय ह्यांनी या चित्रपटासाठी मंत्रमुग्ध करणारी एकूण १४ गाणी कंपोज केली आहेत, ह्या गाण्यांना १८ नामवंत गायकांनी जसे शंकर महादेवन, सोनू निगम, राहुल देशपांडे, महेश काळे, अवधूत गुप्ते, बेला शेंडे, प्रियांका बर्वे, आर्या आंबेकर, प्रतिभा सिंग बघेल, जसराज जोशी, आनंद भाटे, शौनक अभिषेकी, सावनी रवींद्र, हृषीकेश बडवे, अस्मिता चिंचाळकर, कृष्णा बोंगाणे, शिवम महादेवन आणि श्रीनिधी घटाटे हयांनी आपला आवाज दिला आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे यातले सात गायक हे राष्ट्रीय पुरस्कार विजेते गायक आहेत.

संगीत मानापमान च्या या भव्यदिव्य म्युझिक लॉन्चच्या कार्यक्रमामध्ये संपूर्ण चित्रपटाची स्टारकास्ट उपस्थित होती.

## टूगेदरवुईसोअर या प्रेरणादायी मोहीमेचा शुभारंभ

मुंबई : श्रीराम ग्रुपची प्रमुख कंपनी असलेली तसेच भारतातील आघाडीच्या वित्तीय सेवा प्रदात्यांपैकी एक असलेल्या श्रीराम फायनान्स लिमिटेडने ' टूगेदरवुईसोअर ' ही प्रेरणादायी नवीन ब्रँड मोहीम सुरू केली आहे. श्रीराम फायनान्सची ही मोहीम, एकतेची शक्ती अधोरेखित करत, महत्त्वाकांक्षी भारतासोबत भागीदारी करण्याच्या वचनबद्धता प्रतिबिंबित करते. आज, अनेक भारतीय 'मग, काय?' तत्त्वज्ञान स्वीकारत आहेत, जे त्यांच्या यशाच्या प्रवासातील कोणत्याही आव्हानांवर मात करण्याची आकांक्षा प्रतिबिंबित करत आहेत. राहुल द्रविडच्या स्वतः च्या आयुष्याचे काही अंश घेऊन, या मोहिमेचा उद्देश हा उत्साह साजरा करणे आणि भागीदारीला पुढे जाण्याचे साधन म्हणून दाखवणे आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र १५०/२०२४

अर्जदार : १) विजया विनायक महालपुरे, वय-५९ वर्ष धंदा-धरकाम २) चेतना सुरेंद्र कुंभारे, वय-३४वर्ष धंदा-घरकाम ३) चेतन विनायक महालपुरे वय-३० वर्ष धंदा-शेती १ ते ३ रा. गोंदेगाव ता.सोयगाव, जि. औरंगाबाद ४) स्मिता महेंद्र खोडके वय-३७ वर्ष धंदा-घरकाम रा. १०५ माउली धाम, कल्याण शील रोड, सोनारपाडा, शंकर नगर, डोंबिवली पूर्व, कल्याण जि.ठाणे.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे कै. विनायक जगन्नाथ महालपुरे यांचा दिनांक-११/०८/२०२२ रोजी मौजे गोंदेगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत कै. विनायक जगन्नाथ महालपुरे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १३/१२/२०२४. आज दि.१५/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १४९/२०२४

अर्जदार : १) संगीता दिपक धुमाळ, वय-५५वर्ष धंदा-घरकाम २) अंकुश दिपक धुमाळ, वय-२५वर्ष धंदा-शेती १ व २ रा.पळाशी, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद ३) राधा अतुल खेळवणे वय-२३वर्ष धंदा-घरकाम रा. मंगरूळ ता. सिल्लोड जि. औरंगाबाद.

-विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै. दिपक विश्वनाथ धुमाळ यांचा २१/०७/२०२३ रोजी अल्पशा आजाराने मौजे पळाशी, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे कै. दिपक विश्वनाथ धुमाळ यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ३ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०७/१२/२०२४. आज दि. १५/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तरः सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर**

जि.छ.संभाजीनगर सिव्हील एम.ए.नं. ५३०/२०२४ पु.ता.१०/०१/२०२५

अर्जदार : १. बापू कुंडलिक पानकडे, वय ५७ वर्ष धंदा. शेती २. रमेश कुंडलिक पानकडे, वय ५० वर्ष धंदा. शेती १ व २ रा. मारोत्ती मंदिर जवळ, आंबेवाडी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. सुनिता बाबासाहेब पवार, वय. ६८ वर्ष धंदा. शेती रा. चापेवाडी, जेऊर ता.जि. अहमदनगर ४. रुक्मिणी भाऊराव वांढेकर, वय ५३ वर्ष धंदा. शेती रा. वांभोरी ता. राहुरी जि. अहमदनगर ५. शोभा बाबासाहेब गायकवाड, वय. ४९ वर्ष धंदा. शेती रा. पानवी ता. वैजापूर जि.छ. संभाजीनगर

- विरूद्ध :-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,

असे की, अर्जदार यांचे वडिल नामे कुंडलिक गोविंद पानकडे हे दि.२०/०१/२०२४ रोजी मौजे आंबेवाडी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार यांची आई नामे नेहाबाई कुंडलिक पानकडे ही देखील दि.१७/०४/२०२४ रोजी मौजे मौजे आंबेवाडी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाली आहे. अर्जदार हे मयत कुंडलिक गोविंद पानकडे व मयत नेहाबाई कुंडलिक पानकडे यांचे एकमेव कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत कुंडलिक गोविंद पानकडे व नेहाबाई कुंडलिक पानकडे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत कुंडलिक गोविंद पानकडे व नेहाबाई कुंडलिक पानकडे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत कुंडलिक गोविंद पानकडे व नेहाबाई कुंडलिक पानकडे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहाय्यक अधिकक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर


IIFL FINANCE

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com


## सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **05.12.2024 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तीसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **16.12.2024** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तीसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **बीड- सुभाष रोड गोल्ड लोन - एच. क्रमांक 211290, प्रकाश हाइट्स, सुभाष रोड, बीड-431122**

**शाखेचे नांव:अंबेजोगाई-नगरपालिका संकुल जीएल, तालुका - अंबेजोगाई.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL30370461, GL30377473, GL30370485, GL30377479, GL32165356, GL32168303, GL30263236, GL30827890, GL30269753, GL32037143, GL32020154, GL32014668, GL32004226, GL30100865, GL30089937, GL32542140, GL31883960, GL31900924.

**शाखेचे नांव: आष्टी शनी मंदिर रोड जीएल, तालुका - आष्टी.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL31645016, GL31650272, GL34238522, GL32123456, GL32107741, GL30921252, GL30182855, GL31959821, GL31952666, GL31828011, GL31833474, GL29977276, GL29879581, GL29899549, GL31739133, GL31756970, GL29817663, GL29802346.

**शाखेचे नांव: बीड-बीड मोहो, तालुका - बीड.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL24133309, GL28104192, GL32220618, GL32134906, GL23060104, GL33649062, GL24113089, GL33732000, GL25415847, GL26532793, GL29409920.

**शाखेचे नांव: बीड- सुभाष रोड गोल्ड लोन, तालुका - बीड.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL31197495, GL31192823, GL30232879, GL30216888, GL30389923, GL30366063, GL30378756, GL30312500, GL30317970, GL34235801, GL32143767, GL32128863, GL32105356, GL32122333, GL30234069, GL30222524, GL31997475, GL30143844, GL30158291, GL30129756, GL30133840, GL31981207, GL30099705, GL30110673, GL30111905, GL30093171, GL30072820, GL31921689, GL31932897, GL31921181, GL31932575, GL31876782, GL31858046, GL31876485, GL31857572, GL31871213, GL31877742, GL29990756, GL30006996, GL29971081, GL30227603, GL31804009, GL31806029, GL27913250, GL31775042, GL31780587, GL31773936, GL31779921, GL26616656, GL22856140.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : **30.11.2024**
स्थळ: बीड

स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड


IIFL FINANCE

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com


## सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **05.12.2024 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तीसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **16.12.2024** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तीसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **औरंगाबाद-पैठण गेट रोड - जोशी हाईट्स, कमर्शियल तळमजला, उजव्या बाजूचा भाग, सीटीएस क्रमांक १४१८५ क्रांती चौक ते गुलमंडी रोड, पैठण गेट परिसर, औरंगाबाद-४३१००१**

**शाखेचे नांव: औरंगाबाद-औरंगाबाद जी8एच, तालुका - औरंगाबाद.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL24158781, GL31977336, GL30792063, GL32180681, GL25905027, GL23163801, GL33918706, GL32112086, GL32110930, GL26089087, GL31998814, GL26374682, GL24521902, GL28997257, GL31721879, GL26042154, GL31257176, GL31843331, GL34077953, GL24391381, GL31713420, GL24031038, GL31802332, GL26030238, GL22884382, GL31762233, GL25505037, GL29363752, GL31723856, GL31715445.

**शाखेचे नांव: औरंगाबाद-चिखलठाणा जीएल, तालुका - औरंगाबाद.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL30333006, GL32186133, GL24474234, GL34165373, GL24468530, GL32068344, GL30186089, GL30166490, GL31890919.

**शाखेचे नांव: औरंगाबाद-सिडको गोल्ड लोन, तालुका - औरंगाबाद.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL31321847, GL31307938, GL31446319, GL31968820, GL31438416, GL31197122, GL31192151, GL31774103, GL30391908, GL30400787, GL31563272, GL30392246, GL30397075, GL30392327, GL25640607, GL25020114, GL32220954, GL30336481, GL33653531, GL32169674, GL32159943, GL30281465, GL32137231, GL30276106, GL30260225, GL30271212, GL30273473, GL30264866, GL25477630, GL25440621, GL27987326, GL25882872, GL34197270, GL25577551, GL23892051, GL32095354, GL32078754, GL30253506, GL30247580, GL30230327, GL30229937, GL30232383, GL32048657, GL32045453, GL27738447, GL30111361, GL30105709, GL30081731, GL30093058, GL31884433, GL31901178, GL30023854, GL30019766, GL31851672, GL31843447, GL31833518, GL31828126, GL29949902, GL29955431, GL27348940, GL31806858, GL31552602, GL31797841, GL31791452, GL31763621, GL31779928, GL31563405, GL23623388, GL25372030, GL22852311.

**शाखेचे नांव: एमआयडीसी वाळूज औरंगाबाद, तालुका - गंगापूर**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL30038037, GL30033133, GL32102710, GL32120845, GL30300150, GL30318673, GL32068342, GL32138587, GL32143570, GL32135526, GL32146279, GL32110810, GL32119411, GL30248524, GL33192803, GL32080729, GL34150250, GL30229777, GL32838039, GL30207114, GL33467085, GL32191497, GL32046971, GL30153299, GL31969010, GL31960955, GL31954420, GL30093853, GL30109466, GL30108255, GL30090242, GL31934226, GL31923091, GL31928358, GL31852717, GL31847968, GL29884001, GL29907233, GL31770149, GL31777564, GL31745383.

**शाखेचे नांव: औरंगाबाद-पैठण गेट रोड, तालुका - औरंगाबाद.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL30372840, GL30378044, GL32163957, GL32167475, GL32158756, GL32168997, GL30284054, GL30283881, GL30276116, GL30266164, GL32068436, GL30201135, GL30209969, GL32011295, GL32006066, GL32011695, GL31995717, GL30125820, GL30138206, GL30133646, GL30129306, GL31930009, GL31928796, GL31900182, GL31882716, GL31900200, GL31882853, GL31870477, GL30023861, GL29981333, GL29946614, GL29958888, GL31806285, GL29905091, GL29884530, GL31781748, GL31768407.

**शाखेचे नांव: औरंगाबाद-शिवाजीनगर, तालुका - औरंगाबाद.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL34237414, GL32168607, GL32165801, GL32141826, GL32123877, GL32109296, GL30267837, GL32037526, GL32031638, GL30173362, GL29971644, GL33649701, GL29916568, GL33472494, GL29929594, GL31793569.

**शाखेचे नांव: विवेकानंद-नगर औरंगाबाद, तालुका - औरंगाबाद.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL32152803, GL32171755, GL32126883, GL32142657, GL32130997, GL32045021, GL29944154, GL29957704.

**शाखेचे नांव: वैजापूर -स्टेशन रोड जीएल, तालुका - वैजापूर.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL30638186, GL30657294, GL30398518, GL30383059, GL30376505, GL30366566, GL30334160, GL32186553, GL32145451, GL32132777, GL30272399, GL32122845, GL32116924, GL30263718, GL30251179, GL31961888, GL31956082, GL31845244, GL31852083, GL31845174, GL31808248, GL31752711, GL31730309, GL31717454, GL31729324, GL31728896, GL31715909.


ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**


तारीख : **30.11.2024**
स्थळ: औरंगाबाद

स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

# नारायणपूरमध्ये होते गोवंश हत्या!

## कत्तलखान्यांना वाळूज पोलिसांचा वरदहस्त

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने तसेच केंद्र व राज्य सरकारच्या गोवंश हत्याबंदी कायदा लागू असताना वाळूज पोलिसांच्या आशिर्वादाने नारायणपूरसह वाळूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत जवळपास १५ ते २० दुकानांमधून गोवंशांची हत्या करून त्यांच्या मांसाची विक्री सर्रासपणे केल्या जात आहे. वाळूज पोलिस या कत्तलखान्यांकडे 'अर्थ'पूर्ण संबंधाने दुर्लक्ष करीत आहेत.

वाळूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत नारायणपूर परिसरात कत्तलखाना सुरू आहे. त्यामध्ये दररोज गाय व बैलांची सर्रास कत्तल केली जात आहे. याठिकाणी गाय व बैलांची कत्तल केल्यानंतर पांढरी कार, अॅपे रिक्षा व लोडिंग रिक्षामध्ये भरून आसपासच्या १५ ते २० दुकानांवर विक्रीसाठी पुरविण्यात येते. विशेष म्हणजे वाळूज पोलिस ठाण्याच्या समोरच एक हॉटेल असून, त्या हॉटेलमध्ये गोवंशच्या मांसाचे पदार्थ करून विक्री करण्यासाठी दररोज गोमांसाची आयात केली जाते. या संदर्भात अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी आमरण उपोषणाच्या इशारा,निवेदने देऊनही वाळूज पोलिस या कत्तलखान्यांकडे का दुर्लक्ष करीत आहेत हे न उलगडणारे कोडे आहे.

आंबेलोहळचा कत्तलखाना पुन्हा सुरू

तीन महिन्यापूर्वी एमआयडीसी वाळूज पोलिसांनी पहाटेच्या ४ वाजेच्या सुमारास आंबेलोहळ गावातील कत्तलखान्यावर धाड टाकून कारवाई केली होती. या कारवाईत काही मांस जप्त करीत संबंधित कत्तलखाना चालविणार्या ७ जणांवर गुन्हे दाखल करून कारखाना बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु काही दिवस हा कारखाना बंद ठेवल्यानंतर पुन्हा सुरू करण्यात आला असून पुन्हा या कत्तलखान्यामध्ये पहाटे ३ ते ५ या दरम्यान गाय व बैलांची कत्तल सुरू झाली आहे.

# महायुतीचा शपथविधी सोहळा होणार पाच डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानावर

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये महायुतीला मोठा विजय मिळाला आहे. तर लोकसभा निवडणुकीत आत्मविश्वास बळावलेल्या महाविकास आघाडीचा लाजीरवाणा पराभव झाला आहे. यानंतर महायुतीत मुख्यमंत्रिपदासाठी रस्सीखेच पाहायला मिळाली. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री असतील, अशी माहिती सूत्रांकडून मिळत असून महायुती सरकारचा शपथविधी नेमका कधी आणि कुठे होणार? याकडे देशाचे लक्ष लागले आहे. आता याबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. महायुतीचा शपथविधी सोहळा पाच डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानावर होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागताच महायुतीत मुख्यमंत्री कोण होणार? याबाबत जोरदार चर्चा रंगल्या होत्या. भाजपने या निवडणुकीत १३२ जागांवर विजय मिळवल्याने मुख्यमंत्री भाजपचाच होईल, असे बोलले जात आहे. मात्र यामुळे सध्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आले. एकनाथ शिंदे यांनी ठाणे येथे पत्रकार परिषद घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुख्यमंत्रिपदाबाबत जो निर्णय घेतील, त्यास माझा आणि शिवसेनेचा पाठिंबा असेल, अशी भूमिका जाहीर केली. यामुळे भाजपच्या मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा झाला. काल अमित शाह यांच्या उपस्थितीत देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती मिळत आहे. मात्र अद्याप भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

महायुतीचा शपथविधी सोहळा आझाद मैदानात

आता महायुती सरकारचा शपथविधी सोहळा नेमका कुठे पार पडणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असतानाच याबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. महायुती सरकारचा शपथविधी कुठे होणार? याबाबत राजशिष्टाचार विभागाकडून चाचपणी सुरू करण्यात आली आहे. मुहायुतीचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबरला आझाद मैदानात पार पडणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. तसेच शिवाजी पार्क रेसकोर्स, ब्रेबॉर्न स्टेडियम आणि राजभवन या पर्यायांची देखील चाचपणी केली जात आहे. राजशिष्टाचार विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा म्हैसकर आणि पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी शिवाजी पार्कची पाहणी केल्याची माहिती समोर आली होती. ६ डिसेंबरला महापरिनिर्वाण दिनाच्या तयारीत कुठलाही अडथळा न येता शिवाजी पार्कवरच शपथविधी करण्यावर भर देण्यात येत होता. तसेच वानखेडे स्टेडियमवर क्रिकेट सामने सुरू असल्याने इतर ठिकाणांचीदेखील चाचपणी सुरू होती. मात्र आता आझाद मैदानात महायुती सरकारचा शपथविधी सोहळा पार पडेल, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

## जितेंद्र आव्हाड एकनाथ शिंदेंच्या भेटीला 'वर्षा'वर

मुंबई : राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीला वर्षा निवासस्थानी गेले आहेत. या भेटीमागचं कारण अद्याप स्पष्ट झालं नाही. पण या दोन नेत्यांच्या भेटीची चर्चा मात्र आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आणि राज्यात महायुती सरकार पुन्हा आले. त्यामध्ये मुख्यमंत्रीपदाची बदली मात्र झालं असून ते भाजपच्या वाट्याला जाणार हे नक्की झालं आहे. त्यामुळे राज्याचा कारभार सध्या काळजीवाहू मुख्ममंत्री म्हणून एकनाथ शिंदे हेच पाहत आहेत. आता त्यांच्या भेटीला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नवनियुक्त आमदार जितेंद्र आव्हाड पोहोचले आहेत. या आधी गणेश चतुर्थीच्या पहिल्याच दिवशी जितेंद्र आव्हाडांनी एकनाथ शिंदे यांच्या घरी जाऊन भेट घेतली होती.

# 'एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्विकारणार नाहीत' : संजय शिरसाट

मुंबई : राज्यात महायुतीला बहुमत मिळालेलं असतानाही अद्याप सरकार स्थापन झालेलं नाही. त्यात मुख्यमंत्रीपदी कोण होणार? याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही. दिल्लीत गुरुवारी रात्री राज्यातील नवं सरकार, मंत्रिमंडळ आणि मुख्यमंत्री यावर यासंदर्भात खलबतं झाली. मात्र त्यानंतरही अधिकृतपणे काही माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान एकनाथ शिंदे यांनी आधीच मुख्यमंत्रिपदावरचा दावा सोडला असून, त्यांना उपमुख्यमंत्रीपद दिलं जाईल अशी चर्चा आहे. त्यातच आता शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी मोठं विधान केलं आहे.

एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्विकारणार नाहीत असा अंदाज संजय शिरसाट यांनी व्यक्त केल आहे. तसंच एकनाथ शिंदे महाराष्ट्राच्याच राजकारणात राहतील असंही म्हटलं आहे. ते म्हणाले की, एकनाथ शिंदे महाराष्ट्राच्याच राजकारणात राहतील असं वाटतं. कदाचित उपमुख्यमंत्रिपद स्विकारणार नाहीत असा माझा अंदाज आहे. ही फार मोठी गोष्ट असू शकते.

बैठक उत्तम आणि सकारात्मक झाली. ही पहिली बैठक होती. आम्ही शाह आणि जे. पी. नड्डांशी चर्चा केली. महायुतीची अजून एक बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये मुख्यमंत्री कोण होणार हे ठरवलं जाईल. ही बैठक मुंबईमध्ये होणार आहे, अशी माहिती एकनाथ शिंदेंनी दिल्लीत बैठकीनंतर दिली.

कालच्या पत्रकार परिषदेत मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. मुख्यमंत्री पदासंदर्भात महायुतीत कोणताही गोंधळ नाहीये. हा लाडका भाऊ दिल्लीत चर्चेसाठी आला असून लाडका भाऊ ही ओळख कोणत्याही पदापेक्षा मोठी वाटते, असं एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.

# शाळेची सहल काढताय? सुरक्षेची हमी बॉण्ड पेपरवर द्या! शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशामुळे शाळांचे कानावर हात

नागपूर : शाळेच्या सहलीसाठी निघालेल्या बसला झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाधिकाऱ्यांनी परिपत्रक काढले आहे. त्यानुसार, सहल काढण्यासाठी मुख्याध्यापकांना १०० रुपयांच्या बॉण्ड पेपरवर सुरक्षेची हमी लिहून द्यायची आहे. या परिपत्रकामुळे शाळा व्यवस्थापनांमध्ये सहल काढावी की नाही, यावरून संभ्रम निर्माण झाला आहे.



शंकरनगर येथील सरस्वती विद्यालयाद्वारे आयोजित सहलीसाठी निघालेल्या बसचा अपघात होऊन त्यात एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. तर, चाळीसहून अधिक जण जखमी झालेत. अपघाताची दखल घेत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) रोहिणी कुंभार आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सिद्धेश्वर कळुसे यांनी परिपत्रक जाहीर केले आहे. यानुसार, शाळांना एका वर्षात एकच शैक्षणिक सहल आयोजित करता येणार आहे. विद्यार्थ्यांना सहलीला येण्याची सक्ती करता येणार नाही.

सहलीसाठी विद्यार्थी व पालकांचे संमतीपत्र अनिवार्य असेल. तसेच सहभागी विद्यार्थ्यांची यादी व संपर्क क्रमांक संमतीपत्रासोबत संलग्न असावे, शाळा व्यवस्थापन समिती/शाळा समिती यांच्या संमतीचा ठराव घेवूनच सहलीचे आयोजन करण्यात यावे, सहलीसाठी दहा विद्यार्थ्यांमागे एक या प्रमाणात शिक्षकांची संख्या असावी, विद्यार्थ्यांच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक तसेच सहलीतील सर्व शिक्षक यांची राहील, सहलीस विद्यार्थिनींचा सहभाग असल्यास महिला शिक्षिका सोबत असणे अत्यावश्यक आहे, सहलीसाठी खासगी बसेसचा उपयोग करता येणार नाही, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसनेच सहल न्यावी, सहलीचा नियोजन आराखडा तयार करताना पालकांशी चर्चा करावी, सहलीत प्रथमोपचार पेटी सोबत असावी आदी मार्गदर्शक तत्त्वे परिपत्रकामध्ये देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना एकटे सोडणे महागात पडणार

सहलीला आलेल्या विद्यार्थ्यांना एकटे व नजरेआड फिरण्यास सोडू नये. सहलीतील सहभागी कोणीही तंबाखू, गुटखा, तसेच मादक पदार्थ सेवन करू नये, असे या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. शाळेच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाल्यास तसेच विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका झाल्यास संबंधित शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यावर नियमानुसार गरज भासल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सहलीच्या नियोजित मार्गामध्ये बदल करण्यासाठी तशी परवानगी घ्यावी लागणार आहे.

स्वसंरक्षणाचे द्यावे लागणार प्रशिक्षणविद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल नेण्यापूर्वी दोन प्रशिक्षित शिक्षकांच्या मार्गदर्शनाखली सहलीबाबत संपूर्ण माहिती देण्यासाठी तसेच आपात्कालीन परिस्थिती उद्भवल्यास बचाव करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे लागेल, असे परिपत्रकात म्हटले आहे. त्याशिवाय, रात्रीचा प्रवास टाळावा, समुद्र, अतिजोखमीचे पर्वतावरील ठिकाण, नदी, तलाव, विहिरी, तसेच व उंच टेकड्या अशा विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका होईल अशा ठिकाणी शैक्षणिक सहलीचे आयोजन करता येणार नाही.

## कोकणात अंडर वॉटर म्युझियम तर नाशकात राम-काल पथ; मोदी सरकारचे महाराष्ट्राला १५० कोटी

मुंबई : केंद्र सरकारने कोकण आणि नाशिककरांसाठी आनंदाची बातमी दिली आहे. महाराष्ट्राच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून महत्वाची पाऊले उचलण्यात आली आहेत. माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सोशल मीडियाद्वारे यासंदर्भात माहिती दिली आहे.

Ex INS गुलदार अंडरवॉटर म्युझियम, कृत्रिम रीफ आणि सिंधुदुर्गातील पाणबुडी पर्यटन सुरु करण्यात येणार आहे. नाशिकमधील राम काल पथाचा विकास करण्यात येणार आहे.

हे प्रकल्प, ३२९५.७६ कोटी रुपयांचे असून ते ड-डउख योजनेचा एक भाग आहेत. यामुळे पर्यटनाला जागतिक दर्जापर्यंत पोहोचवण्यास मदत होणार. यासोबतच स्थानिक अर्थव्यवस्था आणि रोजगाराला चालनादेखील मिळणार असल्याचा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्या प्रयत्नांमुळे, महाराष्ट्राला जागतिक पर्यटन नकाशावर ठळक प्रकल्पांसह चमकण्यासाठी चालना मिळत असल्याचे फडणवीसांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

३ मोठ्या परियोजना

समृद्ध आणि विकसित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल टाकत ३ मोठ्या परियोजनांना केंद्राने मंजुरी दिल्याची माहितीदेखील फडणवीसांनी आपल्या ट्विटमध्ये दिली आहे. पोर्ट कनेक्टिव्हिटीला प्रोत्साहन देण्यासाठी पूर्वांचल ते मुंबईलला जोडण्यासाठी कॉरीडोर तयार करण्यात येणार आहे. मध्य रेल्वेतील परेल, एलटीटी, कल्याण आणि पनवेल या टर्मिनल्सची क्षमता वाढवण्यात येणारा आहे.

# अर्थव्यवस्थेला मोठा झटका! जीडीपी दोन वर्षातील निच्चांकी स्तरावर

नवी दिल्लीः जीडीपी अर्थात ग्रॉस डेमेस्टिक प्रॉडक्ट म्हणजे देशाच्या आर्थिक विकासाचा दर होय. चालू आर्थिक वर्षातील दुसऱ्या तिमाहीतील भारताच्या जीडीपीचे आकडे जाहीर झाले आहेत. आर्थिक वर्षातील दुसऱ्या तिमाहीत देशाचा आर्थिक विकासाचा दर ५.४ टक्के इतका नोंदवला गेला आहे. जो गेल्या दोन वर्षातील सर्वात निच्चांकी आहे. गेल्या वर्षी याच कालावधी जीडीपी ८.१ टक्के इतका आर्थिक विकास दर होता. या आर्थिक वर्षात एप्रिल-जून या तिमाहीत ६.७ टक्के इतका विकास दर होता.

शुक्रवारी सकराने आर्थिक विकाससंदर्भातील आकडेवारी जाहीर केली. देशातील नागरिकांनी खर्च कमी केल्याने आणि काही प्रमुख क्षेत्रातील खराब कामगिरीचा परिणाम जीडीपीवर झालेला दिसून येतो. याबाबत तज्ञांनी याआधीच भविष्यवाणी केली होती. जीडीपीचा याआधीचा सर्वात निच्चांकी स्थर हा ४.३ इतका होता जो २०२२-२३ च्या ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीत नोंदवला गेला होता. अर्थात या तिमाहीतील घसरणीनंतर देखील भारत हा सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी एक आहे. या वर्षातील जुलै-सप्टेंबर महिन्यात चीनच्या जीडीपीचा दर ४.६ टक्के इतका नोंदवला गेला होता.

दुसऱ्या तिमाहीत उत्पादन क्षेत्राची वाढ २.२ टक्के झाली. तर खाणकाम आणि उत्खनन क्षेत्राची वाढ ही उणे ०.१ टक्के नोंदवली. एप्रिल-सप्टेंबर या सहा महिन्याच्या काळात रियल ग्रॉस व्हॅल्यू एडेड ग्रोथ रेट ६.२ टक्के इतका राहिला आहे. दुसऱ्या तिमाहीत रियल जीव्हीए ५.६ टक्के नोंदवला गेलाय. गेल्या वर्षाच्या याच तिमाहीमध्ये तो ७.७ इतका होता. कृषी क्षेत्रात दुसऱ्या तिमाहीत ३.५ टक्के इतकी वाढ नोंदवली आहे. गेल्या चार तिमाहीत कृषी क्षेत्राची कामगिरी चांगली नव्हती मात्र यावेळी मोठा दिलासा मिळाला आहे. बांधकाम क्षेत्रात स्टीलच्या मागणीमुळे त्यात ७.७ टक्के इतकी तेजी आली आहे. सेवा क्षेत्रात ७.१ टक्के अशी दमदार वाढ नोंदली गेली आहे. उद्योग, हॉटेल आणि वाहतूक या क्षेत्राची वाढ ६.० टक्के इतकी राहिली आहे.

रॉयटर्सद्वारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात दुसऱ्या तिमाहीत आर्थिक विकासाचा दर ६.५ इतका असे असा अंदाज वर्तवण्यात आला होता. तर आरबीआयने जीडीपी ७ टक्के असेल असा अंदाज वर्तवला होता.

## कंपनी मॅनेजरचे घर फोडून साडेतीन लाखांची चोरी

वाळूज महानगर (प्रतिनिधी) सिडको वाळूज महानगर १ मधील समर्थ रेसिडेन्सीतील घर फोडून चोरट्यांनी १५.९ तोळ्यांचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना बुधवारी (२७ नोव्हेंबर) सायंकाळी समोर आली. वाळूज एमआयडीसी पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. एका खासगी कंपनीत मॅनेजर असलेले राजू बाबुराव बनकर (वय ५०) हे समर्थ रेसिडेन्सीत पत्नी ज्ञानेश्वरी यांच्यासह दीड वर्षापासून राहतात. ते रोज सकाळी सव्वा आठला ड्युटीवर जातात आणि रात्री ८ ला परततात. त्यांचा मुलगा आयुष्य वडोदरा येथे बी. फार्मसीचे शिक्षण घेत असल्याने बुधवारी सकाळी त्यांची पत्नी त्याला भेटायला वडोदरा येथे गेली होती. राजू बनकर ड्युटीवर गेले. संध्याकाळी सव्वा सातला ते परतले असता घराचे कुलूप उघडे दिसले. घरातील लोखंडी कपाट उघडेच होते. लॉकरमधील दोन मंगळसूत्रे, तीन चैन, एक अंगठी, एक पिळाची अंगठी, सात सोन्याचे कॉइन, दोन झुमके, एक इयररिंग असा एकूण ३ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केलेला होता. बनकर यांनी वाळूज एमआयडीसी पोलिसांत धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी पंचनामा करून चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर करत आहेत.

# शिवशाही बस अपघातातील मृतांचा आकडा वाढला, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधानांकडून शोक व्यक्त

गोंदिया : गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात झालेल्या शिवशाही बस अपघातात आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतकांमध्ये एक महिला पोलीस कर्मचार्याचा देखील समावेश आहे. तर ३ लोक गंभीर आणि २६ प्रवासी किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. यातील सर्व जखमींवर गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सध्या उपचार सुरू आहे. ११ मृतकांपैकी ९ मृतांची ओळख पटली असून अन्य २ मृतकाची ओळख अद्यापही पटलेली नाही.

या अपघाताच्या बातमीने राज्यासह देशभरातून प्रतिक्रिया उमटत असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील शोक वक्त करत मृतांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. तर अपघाताची बातमी समजताच काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अपघातातील मृतांना तातडीने १० लाख रुपयांची यांची मदत देण्याचे आदेश परिवहन प्रशासनाला दिले आहे. तसेच स्थानिक प्रशासनाकडून परिस्थितीची माहिती ही मुख्यमंत्र्यांनी घेतली असून जखमींना तातडीने आणि योग्य उपचार देण्याच्या सूचना ही दिल्या आहेत गोंदियातील शिवशाही बसचा दुर्दैवी अपघाताची बातमी समजतात आता राजकीय वर्तुळातूनही हळहळ व्यक्त केली आहे. या अपघाताबद्दल आता देवेंद्र फडणवीस यांनीही शोक व्यक्त करत मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. गोंदिया जिल्ह्यातील सडकअर्जुनीनजीक शिवशाही बसचा दुर्दैवी अपघात होऊन काही प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मृतांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. या घटनेत जे लोक जखमी झाले, त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार द्यावे लागले तरी ते तातडीने द्या, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# काळजीवाहू सरकार असताना वक्फ बोर्डला १० कोटींचा निधी, या प्रकाराची चौकशी करणार; देवेंद्र फडणवीसांचा पहिला निर्णय

मुंबई : राज्यात काळजीवाहू सरकार असताना वक्फ बोर्डला १० कोटींचा निधी दिल्याचा जीआर काढण्यात आला होता. प्रशासनाने काढलेला हा जीआर योग्य नसून त्याचे औचित्य आणि नियमाधीनता याची चौकशी करण्याचे आदेश दिले जातील असं भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं आहे.

राज्य सरकारनं वक्फ बोर्डाला दहा कोटी रुपये निधी देण्याचा शासन निर्णय जारी केल्यानंतर लागलीच मागे घेतला. राज्यात काळजीवाहू सरकार असताना अशा प्रकारे धोरणात्मक निर्णय घेता येत नसतानाही, प्रशासकीय पातळीवर वक्फ बोर्डाला निधी देण्याचा निर्णय झाला. त्यामुळे या निर्णयावर जोरदार टीका होताच राज्य सरकारवर हा जीआर मागे घेण्याची नामुष्की आली आहे. याबाबत त्याची चौकशी करण्यात येईल असं देवेंद्र फडणवीसांनी एक्सवर पोस्टवर सांगितलं.

वक्फ बोर्डाला तातडीने १० कोटींचा निधी जाहीर करण्यात आला होता. वक्फ बोर्डाला पायाभूत सुविधांसाठी तसंच बळकटीकरणासाठी हा निधी वितरित केल्याचं सांगण्यात आलं होतं. राज्याच्या अल्पसंख्यांक विभागाकडून शासन निर्णय जाहीर करण्यात आला होता.

मुख्य सचिव सुजिता सौनिकांकडून जीआर मागे

वक्फ बोर्डला निधी दिल्याचा एक जीआर काढण्यात आला, ही प्रशासकीय पातळीवरील चूक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. राज्यात काळजीवाहू सरकार असताना अधिकाऱ्यांना असा परस्पर आदेश काढता येत नसल्याची सूत्रांची माहिती आहे. यावेळी कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येत नाही. असं असताना देखील हा आदेश प्रशासकीय पातळीवर निघाला आहे अशी चर्चा होती. त्यामुळे ती चूक तत्काळ दुरुस्त करण्याच्या सूचना राज्याच्या मुख्य सचिवांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याची सूत्रांची माहिती समोर आली आहे.

वक्फ बोर्डाला निधी दिल्याचा जीआर ही प्रशासकीय चूक असल्याची माहिती आता समोर आली आहे. त्यानंतर मुख्य सचिव सुजाता सौनिकांकडून जीआर मागे घेतल्याची एबीपी माझाला माहिती देण्यात आली आहे. राज्यात काळजीवाहू सरकार असताना अधिकाऱ्यांना असा परस्पर आदेश काढता येत नसल्याची सूत्रांची माहिती आहे.

IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **05.12.2024 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **16.12.2024** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **परभणी -स्टेशन रोड गोल्ड लोन - 1ला मजला काबरा कॉम्प्लेक्स, लक्ष्मीनारायण मंदिर स्टेशन जवळ, परभणी-431401**

**शाखेचे नांव: परभणी -स्टेशन रोड गोल्ड लोन, तालुका - परभणी.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30262172, GL30276219, GL34171657, GL32089129, GL32095305, GL32069247, GL29920661, GL29924963, GL29910196, GL29926194, GL32898107, GL33767327, GL31804963, GL29898582, GL29892222, GL29820460, GL29806119.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : 30.11.2024
स्थळ: परभणी
स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **05.12.2024 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **16.12.2024** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **जालना जीएल - पहिला मजला, कडबी मंडी , जुना मोंढा रोड आंध्र बँकेच्या मागे , जालना - 431203.**

**शाखेचे नांव: अंबड-अंबड जीएल, तालुका - अंबड.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30243053, GL31891899, GL31899252, GL31802803, GL31768174, GL31781690.

**शाखेचे नांव: जालना जीएल, तालुका - जालना.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30656994, GL30636579, GL30345355, GL30335282, GL32172239, GL32154362, GL30272679, GL32101662, GL32120295, GL32085950, GL32093422, GL34068970, GL30861990, GL32037891, GL32032241, GL31998118, GL32012948, GL30092315, GL30109063, GL33899841, GL31883305, GL31900406, GL30003412, GL31835943, GL31820902, GL31797268, GL31788505, GL22897538, GL29819947, GL29813370.

**शाखेचे नांव: परतूर-परतूर जीएल, तालुका - परतूर.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30160580, GL30141918.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : 30.11.2024
स्थळ: जालना
स्वाक्षरीकर्ता/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

## अग्रलेख...

# कटोरा पुन्हा फेकताना...

पक्षप्रमुखांस पसंत नसतानाही माध्यमे ज्यांचा उल्लेख वारंवार उबाठा गट असाच करतात, त्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाने आता पुन्हा एकदा कटोरा फेकून देण्याची तयारी सुरू केली आहे. अशीच एक पहिली घटना जून २०१७ मध्ये घडली होती. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबतच्या युतीचा कटोरा आवेशात फेकून देत स्वबळाचा नारा दिला होता. यापुढे कोणाशी युती नाही, आपण स्वबळावर लढणार आणि मंत्रालयावर शिवसेनेचा भगवा फडकावणार, अशी प्रतिज्ञा त्यांनी मुंबईच्या गोरेगावात शिवसैनिकांच्या एका मेळाव्यात केली आणि स्वबळाचा स्वाभिमान जागृत झालेल्या प्रत्येक सैनिकाने प्रचंड जल्लोषात त्यांच्या प्रतिज्ञेचे स्वागत केले होते. संपूर्ण महाराष्ट्र आपल्याला कुटुंबप्रमुख मानतो, त्यामुळे आपले कुटुंब ही आपली जबाबदारी आहे, अशा गोड गैरसमजुतीला नवा धक्का देऊन महाराष्ट्राच्या मतदारांनी या पक्षाची वाताहत केली. शिवसेनेच्या उबाठा गटाचे विधान परिषदेतील नेते अंबादास दानवे यांनीच हा गौप्यस्फोट माध्यमांसमक्ष केला. ज्योतिष, भविष्य हा प्रकार म्हणजे शास्त्र असते की थोतांड, यावर विद्वानांच्या विश्वात कितीही वितंडवाद होत असले, तरी राजकारण मात्र भविष्याच्या भरवशावरच चालत असते. उबाठा गटासही तसेच वाटत असले पाहिजे. त्यामुळे त्या गटाने आपल्या कुंडलीतील ग्रहस्थितीला शाश्वत रूप देण्याकरिता कंबर कसली आहे, असा दानवे यांच्या त्या सूचक संकेताचा अर्थ म्हणावा लागेल. तसे करणे ही राजकारणाची किंवा त्या पक्षाची नव्हे, तर काळाची गरज आहे, अशी भावना या पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत यांची आहे. हे राऊत म्हणजे आधुनिक काळातील संजयच आहेत. महाभारतातील संजय ज्याप्रमाणे अंध धृतराष्ट्राच्या महाली बसून कुरुक्षेत्राच्या रणभूमीवरील घडामोडींचा साद्यंत वृत्तांत धृतराष्ट्रास नाट्यमयरीत्या कथन करीत असे, तीच भूमिका आता संजय राऊत आपल्या वातानुकूलित दालनात बसून निभावत असतात. महाभारताच्या तेराव्या अध्यायातील एका प्रसंगाचा दाखला देऊन भगवान श्रीकृष्णाने अर्जुनास केलेल्या उपदेशाचे याचि देही पाहिल्याच्या आविर्भावात त्यांनी दिलेले उदाहरण हा त्याचाच पुरावा ठरतो. कुरुक्षेत्रावरील युद्ध शिगेला पोहोचलेले असताना योद्धा अर्जुन एका क्षणी काहीसा व्यथित होऊन, पृथ्वीतलावर हे काय चालले आहे, असा उद्विग्न प्रश्न श्रीकृष्णास विचारतो आणि यावर काहीच उपाय नाही का, या विचाराने त्रस्त होतो. तेव्हा दिलाशादाखल श्रीकृष्णाने दिलेले उत्तर याच राऊत यांनी ऐकले आणि एका भर सभेत शेकडो श्रोत्यांच्या साक्षीने उद्धव ठाकरे यांना सांगितले. पृथ्वीतलावरील हा सारा प्रकार थांबवून राष्ट्र, धर्म, देव यांचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्या चार खांद्यांवर आहे, त्यापैकी एक खांदा उद्धव ठाकरे यांचा आहे, असे उत्तर श्रीकृष्णाने दिल्याचा जगातील पहिलावहिला खात्रीलायक गौप्यस्फोट राऊत यांनी त्या दिवशी एका जाहीर सभेत पहिल्यांदाच केला. ठाकरे यांच्या महत्तेची महती जगाला सांगणारे राऊत यांचे आणखीही काही किस्से पुढे जगप्रसिद्ध झाले आहेत. उद्धव ठाकरे यांची सर्वोत्तम मुख्यमंत्री अशी ख्याती पसरल्याची बातमी पोहोचताच अमेरिका, रशियाचे राष्ट्राध्यक्ष आणि ब्रिटनचे राजपुत्र यांची तातडीची टेलिकॉन्फरन्स झाली व त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याविषयीचे कमालीचे औत्सुक्य उघड करून आपल्याला त्यांची ओळख अजून कशी झाली नाही, याविषयी अचंबाही व्यक्त केल्याचा दावा याच राऊतांनी केला. त्यांनी मतदारांस साद घातली आणि पुन्हा एकदा अवघा महाराष्ट्र आपल्या पितृछायेखाली घेण्याकरिता हात फैलावले, पण महाराष्ट्राच्या जनतेस अजूनही बहुधा त्यांच्यावरील त्या ईश्वरी जबाबदारीची महती पटलेली नसावी. आपण कुटुंबप्रमुख आहोत, त्यामुळे चोरला गेलेला आपला पक्ष, पळविला गेलेला पिता आणि हडप केलेली निशाणी पुन्हा मिळवून देण्याचे पुत्रकर्तव्य महाराष्ट्राची जनता पूर्ण करेल, हा ठाकरे यांचा विश्वास वास्तवात उतरविण्याची जबाबदारी जनतेने स्वीकारलीच नाही, तेव्हा आता आपणच पुढे होऊन पुन्हा एकदा परिवर्तनाची पावले टाकली पाहिजेत, याची जाणीव ठाकरे यांच्या पक्षास झाली आहे.

दानवे यांनी दिलेल्या संकेतावरून तरी सध्या तसेच दिसते. इकडे देशभरातील विविध कार्यक्रमांत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जनतेस एकतेचा संदेश देत असताना, ठाकरे यांनी मात्र एकटेपणाच्या संदेशाची तयारी सुरू केल्याचे दानवे यांच्या संकेतावरून वाटते. 'एक(टे) है तो सेफ है' अशी त्यांची नवी धारणा झाल्याचा या संकेतांचा स्पष्ट अर्थ आहे. २५ वर्षे भाजपासोबतच्या युतीत सडल्यानंतर, त्या सडलेल्या अवस्थेतही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने सावली दिलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेच्या राजकीय कुंडलीतील ग्रहांची पुन्हा काही चलबिचल सुरू झाली आणि स्वबळाचा नारा देतानाचा तो आवेश ओसरतो की काय, अशा शंकेने ठाकरे यांच्या पक्षाच्या राजकीय कुंडलीतील ग्रहस्थिती ताळ्यावर आणण्यासाठी पुन्हा एकदा कटोरा फेकण्याची तयारी सुरू झाली, असा या संकेतांचा आणखी एक अर्थ असू शकतो. ठाकरे हे आपल्या शब्दाशी प्रामाणिक असतात, असे म्हटले जाते. सात वर्षांपूर्वीच्या जून महिन्यात शिवसैनिकांच्या मेळाव्यात त्यांनी युतीचा कटोरा फेकल्याचे जाहीर केले, तेव्हाही सर्वांची तीच खात्री होती. आता पुन्हा कोणत्याच पक्षाकडे युतीसाठी कटोरा घेऊन जायचे नाही, असा निर्धार त्या दिवशी त्यांनी केला, पण पक्षाच्या राजकीय कुंडलीतील ग्रहांची चलबिचल काही वेगळ्याच भविष्याचे संकेत देत असल्याची चाहूल लागल्याने व सत्तेच्या कोंबडीचे सोन्याचे अंडे दिवसागणीक मिळविण्यापेक्षा एकदाच कोंबडी कापून सारी सोन्याची अंडी हस्तगत करण्याच्या हव्यासाने हा विचार बहुधा बदलावयास लागला असावा. अन्यथा, युतीसोबत सत्ता उपभोगल्यानंतर सडलेल्या आपल्या पक्षास काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या तंबूत बांधण्याचा निर्णय त्यांनी घेतला नसता. राष्ट्राच्या कल्याणाची जबाबदारी भगवान श्रीकृष्णाने आपल्याही खांद्यावर टाकली आहे, हे संजय राऊत यांनी केव्हाच सांगून ठेवल्याने अशा तडजोडी कराव्या लागणे अपरिहार्य आहे, हे ओळखून त्यांनी तसे केल्यावर पुन्हा मुख्यमंत्रिपद मिळाल्याने, खरोखरीच ईश्वरी कार्यासाठी सिद्ध झाल्याचा साक्षात्कारही त्यांना झाला असावा. अन्यथा, सडलेल्या अवस्थेतही सत्ताप्राप्तीचे स्वप्न सहजपणे साकार होण्याचा योग जुळलाच नसता, हेही त्यांनी ताडले असावे. पण, राजकारणातील प्रश्नांची उत्तरे गणितातील उत्तराएवढी सरळधोपट नसतात. त्यामुळेच कोणाही पुढे हाती कटोरा घेऊन न जाता, जे काही करायचे ते स्वबळावर, असा निर्धार केलेल्या ठाकरे यांच्यावरील ईश्वरी जबाबदारीचे भान असलेल्या सैनिकांनी त्यांच्या नव्या निर्णयाचेही स्वागत केले असावे. त्यापुढचा इतिहास फार जुना नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबतच्या नव्या युतीसोबतच्या सत्तेमुळे सडलेल्या अवस्थेवर पुन्हा सत्तातेजाची झळाळी दिसू लागली. ज्यांच्या उद्धारासाठी कार्य करण्याकरिता कंबर कसावयाची, त्या जनता जनार्दनानेच कुटुंबप्रमुखाचा दर्जा नाकारल्याचे स्पष्ट झाल्यानंतर असुरक्षिततेच्या जाणिवांनी या गटास आता जागे केले असावे. 'एक है तो सेफ है' असे मोदी कितीही सांगत असले, तरी एकटे असू तरच सुरक्षित असू, याची आता त्यांना जाणीव झाली असावी. एकटे असण्यातील सुरक्षिततेच्या नव्या जाणिवेमुळे महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेण्याचा विचार पुढे येत आहे, असे सूचक संकेत अंबादास दानवे यांनी माध्यमांना दिले आहेत. युतीचा कटोरा फेकून देऊन जे काही करावयाचे ते स्वबळावरे, असा निर्धार ठाकरे यांच्या मनात रुंजी घालू लागला असावा, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. कारण देशाच्या, धर्माच्या उद्धाराची जबाबदारी भगवान श्रीकृष्णांनी ठाकरे यांच्या खांद्यावर दिली आहे, असे संजय राऊत यांनीच सभेच्या साक्षीने सांगून ठेवले आहे. गीतेच्या तेराव्या अध्यायातील हा संवाद आजवर अप्रकाशित होता. संजय राऊत यांच्या दिव्य दृष्टीमुळे तो उजेडात आला आहे. पुतिन, ट्रम्प व चार्ल्स यांनाही अचंबित करावयास लावणारा ठाकरे यांचा हा प्रवास आता नव्या वळणावर 'एक(टे) है तभी सेफ है' याच भावनेतून सुरू होणार असेल, तर नवा स्वबळाचा नारा लवकरच एखाद्या मैदानावर घुमेल हे निश्चित आहे. सध्या देश त्याची प्रतीक्षा करीत आहे.

## दृष्टिक्षेप

**विजय पांढरीपांडे**

# शिकण्याच्या संधीतून आपण शिकत का नाही?

कोरोना संपून आता दोन वर्षाधिक काळ लोटला आहे. तो संकटाचा काळ तर होताच; पण आपले डोळे उघडणारा, आपले भान जागवणारादेखील काळ होता. अनेकांनी आपले जवळचे नातेवाईक गमावले. अनेकांनी स्वतः हॉस्पिटलच्या मरण यातना भोगल्या. त्या काळात नात्याचे भावनिक मूल्य कळले. एकत्र राहण्याची गरज, नाती जपण्याची कौटुंबिक जबाबदारी, लहान-मोठ्यांचा परस्परांविषयीचा कर्तव्य भाव या साऱ्याचे भान जागवले. शाळा-कॉलेजात न जाता, नोकरीसाठी ऑफिसला न जाता घरबसल्या आपापली कामे, कर्तव्ये पार पाडण्याची सवय लागली. हळूहळू कोरोना संपला. गाडी रुळावर यायला लागली. सारे काही पूर्ववत सुरू झाले. सर्वच क्षेत्रात झालेले नुकसान भरून काढण्याची स्पर्धा, धावपळ सुरू झाली. या काळात आपण जे काही अनुभवले, त्यातून आपण जे काही शिकलो ते पुढे न्यायला हवे होते. कॅरी ऑन करायला हवे होते. दुर्दैवाने तसे घडले नाही. पुढे जाण्याऐवजी, निदान आहे तिथेच टिकून राहण्याऐवजी आपण पुन्हा मागे गेलो. मूळ पदी आलो. इथेच सारे चुकले.

हा केवळ आपला, आपल्या देशाचा प्रश्न नव्हता. ही जागतिक समस्या, आपत्ती होती. त्यामुळे फक्त आपणच चुकलो असे नाही. आश्चर्य म्हणजे सारे जग चुकले. कुणीच काही शिकले नाही त्या दारुण प्रसंगातून. अजूनही आपल्याला नात्याचे, मैत्रीचे, सहकार भावनेचे मूल्य कळले नाही. नवरा-बायकोत भांडणे होताहेत. घटस्फोट वाढले आहेत. नैराश्य वाढले आहे. कुणीच कुणा बरोबर सुखी नाही. आनंदी तर नाहीच नाही. एकमेकांविषयी तक्रारी आहेत. मुलं आई-वडिलांचे ऐकत नाहीत. त्यांना जुमानत नाहीत. ती नको तितकी मोठी झाली आहेत लहान वयातच. मुजोरी वाढली आहे. आई-वडिलांचा संताप, चिडचिड वाढली आहे. एक प्रकारचे फ्रस्ट्रेशन वाढले आहे. मुलीदेखील सिगारेट ओढताना दिसतात सर्रास. ड्रग, दारूचे व्यसन सर्वसाधारण झाले आहे. काही कुटुंबात आई-वडील-मुलं एकत्र ड्रिंक एन्जॉय करताना दिसतात! कुणालाच कशाचे काही वाटत नाही. बाहेरच्या पार्ट्यांबद्दल तर विचारायलाच नको. आयटी इंडस्ट्रीमुळे पैसे हातात खेळतो आहे. त्यामुळे मनोरंजनाचे हॉटस्पॉट वाढले आहेत. नाती गोती पार विस्कटली आहेत. आईबापांना मुले विचारीत नाहीत. छोट्या छोट्या गोष्टीतून ताणतणाव वाढताहेत. नव्या सुनेला घरात थोरामोठ्यांची अडगळ (एक्स्ट्रा बॅगेज) नको आहे. इस्टेटीच्या छोट्या-मोठ्या वाटण्यादेखील कारण ठरतात गैरसमज अन् भांडण उकरून काढण्यासाठी. त्यामुळे वृद्धांचे प्रश्न वाढले आहेत, उतार वयात, आजारपणात त्यांची विचारपूस करणारे, काळजी घेणारे कुणी नाही. ज्यांच्या जवळ स्वतःचा पैसा, पेन्शन आहे त्यांना तो आधार. पण ज्यांच्या जवळ स्वतःचे काही नाही, जे परावलंबी आहेत त्यांचे हाल कुत्राही खाणार नाही, असे दयनीय आहेत. गंभीर आजारपण आले तर परिस्थिती अधिकच बिकट. अनेकांची मुले परगावी, परदेशात. तिकडेच कायमस्वरूपी स्थायिक. त्यांचाही नाईलाज. संपर्क फक्त व्हिडीओ कॉलपुरता मर्यादित. नातवंडांशी संवाद मोजका. भाषेचा प्रश्न. बोलून बोलून किती काय बोलायचे हा प्रश्न. संवाद साधणे कठीण. तिकडे जायचे म्हटले तर शरीर साथ देत नाही. तिकडची थंडी सहन होत नाही. मेडिकलचा खर्च परवडत नाही. तिथे प्रत्येक जण आपापल्या कामात व्यस्त. तुम्हाला दिवस खायला उठतो. घरातल्या घरात कंटाळा येतो. त्यांच्या विकेंडच्या पार्ट्यांत तुम्ही मिस फिट. म्हणजे तुम्ही तिथेही अडगळच! कौटुंबिक नात्यातला लळा-जिव्हाळा, जुनी भावनिक गुंतवणूक पार लयाला गेली आता. उरलेत कोरडे उपचार. लग्न, मर्तिक यावेळीसुद्धा माणसे जमत नाहीत. निमंत्रण, अभिनंदन, शुभेच्छा, सांत्वन सारे व्हॉट्सॲपवर.. हसू-आसूसाठी ईमोजी आहेतच हाताशी! आठवतं का कुणाला, तुम्ही कधी कुणाला घट्ट मिठी मारलीय? कुणाचा हात हातात घेऊन बोलला आहे? कुणाच्या खांद्यावर माथा टेकून आसवे गाळली आहेत? मन मोकळे केले आहे? तासन्तास हसत-खिदळत गप्पा मारल्या आहेत? मनातल्या गोष्टी शेअर केल्या आहेत? आठवतं?

हे सारे स्पर्श विसरून गेलोय आपण! जिवाभावाचे मित्र-मैत्रिणी राहिल्या नाहीत फारशा... बोलायला, हितगुज करायला. एक सुन्न रितेपण आले आहे आयुष्यात. कशानेही भरून न येणारी पोकळी. त्या खोल गुहेच्या एकांतात भुतासारखे एकटे आहोत आपण! भवतीचे आसमंत दूषित, कलुषित. आपल्याही मनात सद्भाव नाहीच. आहे फक्त क्लेश, द्वेष, अहंकार, हाव, असूया, स्पर्धा, कटुता; त्यापोटी आलेले प्रचंड नैराश्य! ही केवळ आपली, आपल्या देशाची संकुचित त्रिज्येची समस्या नाही. या समस्येचा परीघ फार मोठा आहे. या परिघाने जगाला व्यापून टाकले आहे. ही आता वैश्विक समस्या झाली आहे.

आयटी, नॅनो, इन्फो, एआय या तंत्रज्ञानांची भुतं आहेतच अवतीभवती नाचायला अन् त्यांच्या तालावर आपल्याला नाचवायला आपण गुलाम झालोत या तंत्रज्ञानाचे, सोशल मीडियाचे. आपल्या नकळत या तंत्र मांत्रिकाने आपला ताबा घेतला. आपल्याला वश केले. आता आपले असे स्वतःचे गुपित राहिलेच नाही. गुगल-फेसबुकला तुमची सारी माहिती आहे, जी तुमची तुम्हालादेखील नाही. ना आपल्याला कोरोना समजला, ना कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण केलेला सोशल मीडिया समजला. आपण फार गाफील राहिलो. अजूनही आपले डोळे उघडत नाहीत. आपल्याला सावध व्हावेसे वाटत नाही. संमोहित अवस्थेतच आपण रमलो आहोत. आपण स्वतःच्या बुद्धिमत्तेला, भावनेला, विवेकाला अक्षरशः गहाण टाकले आहे. पुढचा धोका आपल्याला दिसत असूनही त्याकडे आपण डोळेझाक करीत आहोत. मुलाच्या भविष्याची संबंधित जोडप्यांना काळजी नसते. मी, माझा स्वार्थ, माझे सुख हे जास्त महत्त्वाचे. जगात कधी नव्हे तितकी अशांतता, अस्थैर्य, अनागोंदी, म्हणजे तिसऱ्या महायुद्धाची तयारी सुरू आहे. आपण स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवले आहे. हे महायुद्ध वेगळ्या स्वरूपाचे, वेगळ्या पातळीवर लढले जातेय. ते कोरोनापेक्षाही महाभयंकर स्वरूपाचे, राक्षसी संहारक आहे. त्याच्या परिणामाची आपण कल्पनादेखील करू शकत नाही. हे सारे थांबवणे आता कुणाच्याच हातात राहिले नाही. सूत्रधार कुणी वेगळाच आहे. अदृश्य आहे. अनियंत्रित आहे. ही आपत्ती सहज, नकळत आली असे म्हणता येणार नाही. हे संकट आपणच ओढवून घेतले आहे. ही आपलीच करणी आहे. त्यातून सुटका करायची तर भरणी आपल्यालाच करावी लागेल. त्यासाठी पुन्हा एखादा बुद्ध शोधावा लागेल. आकाशातला देवबाप्पा शोधावा लागेल. तोच काहीतरी मार्ग दाखवू शकेल. आपण खोल अंधाऱ्या गर्तेत पडण्याआधी त्याला पुन्हा भूतलावर यावे लागेल. त्याची प्रार्थना करणे एवढेच आपल्या हातात आहे.

७६५९०८४५५५

## वेध

**निशिकांत मायी**

# बांगलादेशी हिंदूंना कोण देणार संरक्षण?

इस्कॉनचे चिन्मय दास यांना अटक करून जामीन नाकारला जाण्याची बांगलादेशातील घटना गंभीर आहे. बांगलादेशात कट्टर इस्लामिक लोकांकडून हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत. त्याविरोधात आवाज उठविला म्हणून दास यांना अटक करत त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवला जाणे चिंताजनक आहे. हिंदूंनी फक्त अत्याचार सहन करायचे, त्याविरोधात आवाज उठवायचा नाही, काही बोलायचे नाही हे अन्यायकारक आहे. एरवी भारतात कुठेही काही खुट्ट जरी वाजले, तरी चवताळून उठणारे स्वयंघोषित पुरोगामी आज हिंदूंवरील अनन्वित अत्याचाराबाबत काहीही बोलायला तयार नाहीत, ही बाब त्यांचे ढंग उघड करणारी आहे. बांगलादेशात जे काही घडले आहे आणि घडत आहे, ते निंदनीय आहे. घडलेल्या घटनांचा अर्थात हिंदूंवर झालेल्या अत्याचाराचा जेवढा निषेध करावा, तेवढा थोडाच आहे. बांगलादेशची निर्मिती झाली तेव्हा धर्मनिरपेक्ष असलेला हा देश हळूच इस्लामिक बनला आणि तेथील हिंदूंवर अत्याचार सुरू झाले. बांगलादेशात हिंदूंना लक्ष्य करण्यास प्रारंभ झाला. त्यांच्या घरांवर हल्ले करणे, त्यांची संपत्ती लुटणे, महिलांची अब्रू लुटणे असे प्रकार सुरू झाले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले करून तोडफोड करणे, श्रद्धास्थानांवर आघात करणे यामुळे बांगलादेशातील हिंदू असुरक्षित होऊ लागला होता. आता सध्या जे अत्याचार सुरू आहेत, त्याने तर हिंदू दहशतीत आहे. त्यातूनच दाससारख्या व्यक्तीने अत्याचाराविरुद्ध आवाज उठविला आणि म्हणून त्यांना तुरुंगात डांबण्यात आले.



एरवी भारताला फुकटचा सल्ला देणारा आंतरराष्ट्रीय समुदाय बांगलादेशातील घडामोडींबाबत काहीही बोलायला तयार नाही. याचा स्पष्ट अर्थ असा की, आंतरराष्ट्रीय समुदायाकडूनही सोयीची भूमिका घेतली जाते. अत्याचार सहनशक्तीच्या पलीकडे गेल्यामुळे असंख्य हिंदू भारतात येण्यास इच्छुक आहेत. घरदार सोडून ते सगळे जिवाच्या भीतीने भारतात आश्रय घेण्यास आसुसले आहेत. भारताशिवाय त्यांच्याकडे अन्य पर्यायही नाही. त्यामुळे जेवढ्या हिंदूंना भारतात यायचे आहे, त्या सगळ्यांना प्रवेश देण्याबाबत सरकारने सकारात्मक विचार करायला हवा. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने कालपरवा दास यांना झालेल्या अटकेबाबत चिंता व्यक्त केली असली, तरी याने काम भागायचे नाही. बांगलादेशला सक्त ताकीद द्यायला पाहिजे. वेळ पडलीच तर बांगलादेशला धडाही शिकवला पाहिजे. हिंदूंचा देश असलेल्या भारताने बांगलादेशातील हिंदूंच्या संरक्षणाची जबाबदारी घेतलीच पाहिजे. हिंदू बांधवांचा छळ होत असताना शरद पवारादी मंडळी कुठे वाळूत चोच खुपसून बसली आहेत, कळायला मार्ग नाही असे नाही. त्यांना हिंदूंपेक्षा मुस्लिमांचीच चिंता जास्त आहे, हे त्यांच्या राजकारणावरून आधीच स्पष्ट झाले आहे. ज्या पद्धतीने बांगलादेशातील कट्टरपंथीयांनी अल्पसंख्यक हिंदूंना लक्ष्य केले आहे, ते पाहता हिंदू तिथे सुरक्षित राहतील, याची शक्यता आज तरी दिसत नाही. भारत सरकारने याबाबत चिंता व्यक्त केली असली, तरी नुसती चिंता व्यक्त करून काही उपयोग होणार नाही. बांगलादेशातील हिंसाचाराकडे केवळ त्यांचा अंतर्गत मामला आहे असे म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. बहुसंख्य हिंदू असलेला देश ही भारताची ओळख आहे. ती जपून ठेवतानाच शेजारच्या देशांमधील हिंदूंचे मनोधैर्य खच्ची होणार नाही, याची काळजी आपण घेतली पाहिजे. जगभरातल्या हिंदूंसाठी भारत हे आशास्थान आहे. त्यांची आशा मावळणार नाही, अशी ठोस कृती करणे ही काळाची गरज आहे. बांगलादेशात हिंदू बांधवांवर अमानुष अत्याचार होत असताना आपल्या देशातले मानवाधिकारवालेही कुठे दडून बसले आहेत, हे कळायला मार्ग नाही. बांगलादेशात निष्पाप हिंदूंवर अत्याचार होत असताना तमाम मानवाधिकारवाले का आवाज उठवत नाहीत, या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळणार नाही. कारण, ही सगळी मंडळी स्वार्थी आहेत. यांना मानवाधिकाराशी काहीही देणेघेणे नाही. त्यांना त्यांचा स्वार्थ साध्य करायचा आहे. कोण मरतोय, कोण जगतोय याच्याशी त्यांना देणेघेणे असते, तर ते मूग गिळून गप्प बसलेच नसते. आपल्या मणिपूरमध्ये हिंसक घटना कुणी घडवून आणल्या हे संपूर्ण जगाला माहिती आहे. असे असतानाही भारताला शहाणपणा शिकवण्यात अनेक देश आघाडीवर होते. आज मात्र ते सोयीस्कर भूमिका घेत मूकदर्शक बनले आहेत. त्यामुळे भारतातील हिंदूंनीच आता पुढाकार घेत प्रश्न सोडविला पाहिजे.

९८८११५२४३९

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# 'मै समंदर हूं, वापस आऊंगा'

विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून पाच दिवस झाले. महायुतीला छप्परफाड बहुमत मिळाले आहे. तरीही नवे सरकार नाही, नव्या मुख्यमंत्र्याचा पत्ता नाही. त्यामुळे नेमके सुरू आहे तरी काय, असा प्रश्न जनतेला पडणे स्वाभाविक आहे. पण हे नवे नाही. कुठल्याही नव्या सरकारचे बाळंतपण हे असेच होते. कुठलेही सरकार घाईगर्दीने बनत नाही. कारण सरकार नुसते बनवून भागत नाही, ते चालवावे लागते. 'महायुतीचा मुख्यमंत्री, तिन्ही नेते एकत्र बसून ठरवतील' असे महायुतीतल्या तिन्ही पक्षांचे प्रवक्ते सांगत असतानाही विरोधकांनी वावड्या उडवणे सुरू केले होते. आतापर्यंत शिंदेंना 'मिंधे', 'गद्दार', 'खोके सरकार' म्हणणाऱ्या ठाकरे सेनेला शिंदेंच्या मानसन्मानाची 'चिंता' भेडसावत असल्याचे दिसत होते. 'शिंदे भूकंप करणार, बाहेरून पाठिंबा देणार' असल्या पुड्या सुटू लागल्या. अखेर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच त्यांची हवा काढली. मुख्यमंत्री पदावरचा दावा सोडला. मोठा बाका प्रसंग होता. कुर्बानी कोण देणार? अडीच वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी त्याग केला. मुख्यमंत्री पदावर नैसर्गिक दावा असताना उपमुख्यमंत्री पद स्वीकारले. आता पाळी शिंदे यांची होती. पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे जसे वागले तसे शिंदे यांनाही वागता आले असते. शरद पवार यावेळीही एका 'उद्धव ठाकरेंच्या' शोधात होतेच. अर्थात आकडे भाजपाच्या बाजूने होते. पण तोडफोड करून पवारांनी जुगाड जमवले असते. मात्र, एकनाथ शिंदे हे मोदी-शाह यांच्या बाजूने उभे राहिले. प्रगल्भ राजकारणी अशा प्रसंगात कसा वागतो त्याचा परिचय शिंदेंनी दिला. राजकारणात टिकायचे असेल तर कुठल्या एका जागी टिकावे लागते. शरद पवार, उद्धव ठाकरे यांना जमले नाही. 'जिधर बम उधर हम' असे राजकारण कराल तर जनता एक दिवस तुम्हाला तुमची जागा दाखवते. शिंदेंना मानले पाहिजे. त्यांनी चार दिवस उशिराने का होईना मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचा मार्ग मोकळा करून दिला. तुम्ही लिहून ठेवा. दोन दिवसांनी एकनाथ शिंदे हे देवेंद्र फडणवीस यांचे नाव सुचवतील.

तब्बल पाच वर्षांनंतर फडणवीसांना अच्छे दिन येऊ घातले आहेत. या काळात काय काय सोसले नाही या चाणक्याने? झाडून साऱ्या विरोधकांचे टार्गेट देवेंद्र फडणवीस होते. मुख्यमंत्री होते शिंदे. मात्र निशाण्यावर फडणवीस होते. संजय राऊत यांचा रोजचा भोंगा तर होताच. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनीही फडणवीसांना सोडले नाही. अतिशय खालच्या पातळीवरून फडणवीसांवर हल्लाबोल झाला. उद्धव ठाकरे यांनी 'एक तर तू राहशील, नाहीतर मी राहीन' अशा शब्दात फडणवीसांना ललकारले होते. फडणवीसांनी आपल्याला 'रिकामे' केले हा त्यांचा राग होता. २०१९ च्या निवडणुकीत भाजपा-शिवसेना यांची युती होती. लोकांनी या युतीच्या बाजूने कौल दिला होता. पण मुख्यमंत्री होण्याच्या महत्त्वाकांक्षेतून उद्धव ठाकरे यांनी धोका दिला. शरद पवारांकडे गेले. पवार अशा बकऱ्याच्या शोधात होतेच. त्यांनी या ठाकरेंची दुखरी नस हेरली. महाविकास आघाडी नावाने पवारांनी दुकान फिट केले.



भानगडीचे हे सरकार फार टिकणार नव्हतेच. अडीच वर्षांत कोसळले. पुढे साऱ्यांच्या मार्गात फडणवीस हा अडथळा होता. फडणवीसांना दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होऊ द्यायचे नव्हते म्हणून शरद पवारांनी उद्धव ठाकरेंना फोडले. मात्र उद्धव ठाकरे नाकर्ते निघाले. त्यांचेच आमदार त्यांच्या विरोधात गेले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात ४० आमदारांनी बंड केले. त्यात ठाकरे यांना घरी बसावे लागले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्याने ठाकरे सुडाने पेटून उठले. त्या द्वेषाग्नीत ठाकरे वाहवत गेले. हिंदुत्व सोडले. मुस्लिमांचे लांगूलचालन सुरू झाले. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने दलित आणि मुस्लिम मतांची मोट बांधली. विषारी प्रचार केला. घटना बदलण्यासाठी मोदींना ४०० जागा हव्या आहेत, असा प्रचार झाला. त्याचा भाजपाला तडाखा बसला. त्या निकालाचा चुकीचा अर्थ विरोधी नेत्यांनी घेतला. आता आपलीच हवा हवेत विरोधी नेते तरंगू लागले. 'हे सरकार बदलल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही' असे सांगत शरद पवार फिरू लागले. लोकसभा निवडणुकीत महाआघाडी आणि महायुती यांना मिळालेल्या मतांमधला फरक फार नव्हता. महायुतीला एक टक्कापेक्षाही कमी मतं होती. तीन टक्केही मतदान वाढवले तर आपण बाजी पालटवू शकतो हे फडणवीसांच्या लक्षात आले. त्यांनी तसा फॉर्म्युला दिला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मदतीला धावला. सोबतीला महायुतीची 'लाडकी बहीण' योजना कामी आली आणि बघता बघता चमत्कार झाला. भाजपाने कधी नव्हे एवढ्या जागा जिंकल्या. विरोधकांनाही हे करता आले असते; पण गाफील राहिले. जागावाटपात भांडत बसले. सहा महिन्यात लोकांच्या विचारात काय फरक पडणार? लोकांना आपल्यालाच मतं द्यायची आहेत, अशा गुर्मीत विरोधक होते. उद्धव तर सारखे म्हणायचे, 'माझा बाप चोरला, पक्ष चोरला, चिन्ह चोरले.' आता माझे मतदारही चोरले असे म्हणण्याची पाळी त्यांच्यावर आली आहे. युतीत २५ वर्षे आपण सडलो असे उद्धव म्हणाले होते. आता काँग्रेससोबत पाच वर्षांतच त्यांचे शेणखत झाले; पण बोलायची सोय नाही. फडणवीसांना गंभीरपणे घेतले नाही तर काय होते त्याचा हा नमुना आहे. 'तुतारी' वाजली नाही, 'मशाल' पेटलीच नाही. फाजील आत्मविश्वास विरोधकांना नडला. कुणी भावाला तर कुणी पत्नीला तिकिटा वाटल्या. संपूर्ण राज्याचे नेतृत्व करील, पक्षाला सोबत घेऊन चालेल असा नेताच आज विरोधकांकडे उरला नाही. जे आहेत ते त्यांच्या मतदारसंघापुरते आहे. 'मी आणि माझे कुटुंब' म्हणून पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, नाना पटोले पडता पडता वाचले. प्रदेश अध्यक्षाला जिंकण्यासाठी टपाली मतांचा आधार घ्यावा लागतो यावरून काँग्रेसची स्थिती किती केविलवाणी झाली आहे, ते लक्षात येईल. पोपट केव्हाच मेला आहे; पण हे राहुलबाबाला कोण सांगणार? राहुल गांधी यांच्या नेतृत्वात गेल्या तीन निवडणुका काँग्रेस हरली. तरीही राहुल गांधींच्या नावाची पालखी काँग्रेसवाल्यांना उचलावी लागते. १० वर्षांपूर्वी काँग्रेसने सपाटून मार खाल्ला तेव्हा आत्मपरीक्षणासाठी ज्येष्ठ नेते ए. के. अँथनी यांच्या नेतृत्वात काँग्रेसने समिती नेमली होती. त्यांनी दिलेला अहवाल अजूनही बाहेर येऊ दिला गेला नाही. काँग्रेसला अच्छे दिन येणार कसे? आता तर विधानसभेत विरोधी नेता म्हणून बसण्याएवढीही ताकद विरोधकांकडे नाही. राज्यसभेत पाठवण्याएवढेही आमदार मिळणे अवघड आहे. शरद पवारांची राज्यसभेची दीड वर्षे उरली आहेत. त्यानंतर त्यांना सक्तीची निवृत्ती आहे. सावकाश पुढे सकाळचा 'भोंगा'ही बंद पडेल.

पाच वर्षांपूर्वी एका सभेत फडणवीसांनी एक शेर म्हटला होता- 'मेरा पानी उतरते देख, मेरे किनारे पर घर मत बसा लेना, मै समंदर हू, लौटकर वापस आऊंगा.' फडणवीसांनी म्हटलेल्या 'मी पुन्हा येईन' या इशाऱ्याची विरोधक चेष्टा करीत राहिले. सुप्रिया सुळे तर म्हणाल्या होत्या, 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' एकटा देवेंद्र काय करू शकत नाही ते आज महाराष्ट्र पाहात आहे. विरोधकांनी जबरदस्त फिल्डिंग लावली, जाती-पातीचा आधार घेतला तरीही या आधुनिक अभिमन्यूने चक्रव्यूह भेदला. गेल्या तीन विधानसभा निवडणुका फडणवीस यांच्या नेतृत्वात झाल्या. तिन्ही निवडणुकीत भाजपाने शंभरावर जागा जिंकल्या. राजकारण बेभरवशाचे झाले आहे. शर्ट बदलावा तसे लोक पक्ष बदलताहेत. गेल्या पाच वर्षांत खूप उलथापालथ झाली. मात्र फडणवीसांचा एकही आमदार फुटला नाही. हल्ली दुर्मिळ झालेली एखाद्या नेत्याबद्दलची ही बांधिलकी, हा विश्वास फडणवीस यांच्या रूपात सहकाऱ्यांना दिसतो. त्यातूनच फडणवीसांचा 'देवाभाऊ' झाला, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तर त्यांना 'परम मित्र' संबोधले आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## दणदणीत म्हणतात ते हेच!

निवडणूक एकदाची पार पडली आणि वाट होती शनिवारची. धाकधूक सगळीकडेच होती. कारण इतक्यात राजकीय एक्झिट पोलची सर्वत्र पोलच खुलली होती. त्यामुळे महायुती जरी आघाडीवर होती, तरी यांचा हरयाणा तर होणार नाही ना, ही एक शंका होती. मात्र यंदा असा एक्झिट पोल कुणीच मनावर घेतला नव्हता. एकदाचा शनिवार आला. एक एक तास समोर जात होता. बघता बघता महायुती म्हणजेच भाजपा व मित्रपक्ष १००-२०० आणि त्याच्यावर जाऊन स्थिरावले. इकडे महाविकास आघाडीचा विकासच थांबून गेला. मोठ्या मुश्किलीने ते चाळिशी पार करते झाले. खुद्द नाना पटोलेंचा विजय अवघ्या २०० मतांवर येऊन पोहोचला. असे कितीतरी बघितले तर जनतेने तर त्यांना चपराक दिली म्हणायची. मनोज जरांगेला हाताशी धरून मराठा मतांची बोळवण करणारे पवार साहेब यावेळी कोणाचेच राहिले नाहीत. मतांचा पाऊस दिसलाच नाही. तिकडे शिवाजी महाराजांना आपलीच जागीर समजणारे उद्धवराव हे निवडणुकीपूर्वी खूप बोलले; अगदी राऊत यांच्यापेक्षाही जास्त. पण अवघ्या २० जागांवर लाज राखली म्हणायची साहेबांची. पुत्र हो-नाही म्हणता म्हणता जिंकून आला; तेवढीच काय जमेची ती बाजू. बाकी आता बाळाशी खेळायला भरपूर वेळ मिळेल. राज ठाकरे म्हणजे 'गरजनेवाले बरसते नहीं' असेच आहे. कोणतीही राजकीय मनीषा नाही, कोणतीही खेळी नाही. फक्त ठाकरे आहेत एवढेच. या निवडणुकीत २०० च्या वर सर्व जातीच्या घटकांनी एक होऊन मनसोक्त मतदान केले, यातूनच एकीचे बळ काय असते दिसून आले. भरमसाट, भरघोस या सोबतच दणदणीत हा शब्दही आता महायुतीजवळ आला, ही आनंदाची गोष्ट.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

## वाचक पत्रे

### सिव्हिक सेन्स शून्याकडे जातो आहे का?

सर्रास सिग्नल मोडणे, रस्त्यावर खर्रा-गुटखा- तंबाखू-मावा आदींच्या पिचकाऱ्या अगदी घरचे बेसिन आहे अशाप्रकारे मारणे, तीर्थरूपांना रस्त्याची जहागीरदारी मिळाली आहे, या आवेशात गाडी रॉंग साईडने चालवणे, हे सगळं करताना कोणालाही न जुमानता मुजोरी करणे, पब्लिक प्लेस कुठलीही असू देत, ट्रेन, बस, मेट्रो आणि अगदी चांगले रेस्टॉरंटसुद्धा-आदी जागी मोबाईलवर मोठमोठ्याने रील आणि व्हिडीओ बघणे, आपल्या आजूबाजूला कोण आहे याची दखल न घेता शिवीगाळ करत बोलणे, रस्त्यावर कुठेही कचरा टाकणे या सगळ्या गोष्टी नागपुरात अगदी जोरावर सुरू आहेत. खंत म्हणजे याला कोणीही अपवाद नाही. रस्त्यावर थुंकणारा माणूस अगदी मर्सिडिससारखी महागडी गाडी चालवणारादेखील आढळून येतो. रॉंग साईडने गाडी चालवणारे ऑटोवाले जास्त असले, तरी सुशिक्षित लोकसुद्धा हा प्रकार करताना आढळून येतात. लहान पोरांना घेऊन जाणारे स्त्री-पुरुष जेव्हा रॉंग साईडने गाडी चालवतात तेव्हा जिवाचा थरकाप तर उडतोच; पण आपण अप्रत्यक्षरीत्या हीच शिकवण त्या शिशूला देतो आहे, ही जाणीवसुद्धा उरली नाही आहे. देश प्रगत होण्यासाठी पाया असतो तो सिव्हिक सेन्स म्हणजे नागरी भावना. घडणाऱ्या या सगळ्या गोष्टी मात्र ती भावना हरवतेय असं दर्शवतात आणि जर नागरी भावना रसातळाला जात असेल तर प्रगती खुंटेल. निदान हे ध्यानात घेऊन साधी शिस्त तरी लोकांनी पाळावी, अशी माफक अपेक्षा आहे.



**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

### हिंदू एकतेचा विजय

'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक है तो सेफ है' या घोषणांचा परिणाम म्हणजे जनतेने जागृत होऊन केलेले मतदान आणि मतदानात वाढलेली टक्केवारी! त्याचाच परिणाम म्हणजे आज राज्यात हिंदुत्वनिष्ठ सरकार स्थापन होत आहे. केवळ निवडणुकीतील स्टंट म्हणून या घोषणांकडे बघता येणार नाही, तर त्यामुळे जिहादरूपी भयानकतेची जाणीव जनतेमध्ये निर्माण झाली आहे. आज राज्यात वक्फ बोर्ड, लव्ह जिहाद, भूमी जिहाद यांचे संकट आहे. या विरोधात हिंदुत्वनिष्ठ संघटना, आध्यात्मिक संस्था आणि सामाजिक संस्थांनी केलेल्या जागृतीचा परिणाम म्हणजे निवडणुकीत मिळालेला निकाल! हा विजय म्हणजे हिंदूंच्या एकतेचा विजय असे निश्चितच म्हणता येईल. आता येणाऱ्या सरकारकडून जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मंदिरे सरकारीकरणातून मुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत, लव्ह जिहादविरोधात लवकरात लवकर कायदा बनवावा तसेच धर्मांध प्रवृत्तींना आळा घालावा, अशा अपेक्षा जनतेने व्यक्त केल्या आहेत. निवडणुकीदरम्यान दिलेली 'एक है तो सेफ है' ही घोषणा प्रत्यक्षात सुरक्षित वातावरण निर्माण करून सार्थक करावी.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

**तुम्हाला माहिती आहे का?**

- महाराष्ट्रात एकूण २८८ आमदार थेट नागरिकांकडून निवडले जातात.
- महाराष्ट्राच्या १५ व्या विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरू आहे.
- राज्याची पहिली विधानसभा वर्ष १९६० मध्ये निवडून आली आणि सयाजी सिलाम हे पहिले विधानसभाध्यक्ष होते.

www.tarunbharat.net
शनिवार, दि. ३० नोव्हेंबर २०२४
तरुण भारत
छोटे उस्ताद


## अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

## लालसरी



काय काय नावं असतात ना पक्ष्यांची! आता हाच बघा चिमण शेंदऱ्या! तसं पाहिलं तर त्याला 'लालसरी' असेही म्हणतात. अन्य भाषेत बुडार, बुडारनर, लालसिर अशी नावं धारण केलेला हा पक्षी बदकापेक्षाही लहान असून नर-मादी दिसायला वेगवेगळे असतात. नराची मान तांबड्या, छाती, वरचा भाग, शेपटीच्या खालचा आणि वरचा भाग काळ्या रंगाचा असतो. मादीचे डोके, मान, पाठीवरचा भाग, छाती आणि शेपटी गडद तपकिरी रंगाची असून कंठ व चोचीजवळचा तोंडाचा भाग, डोळ्यांभोवतीचे कडे बदामी रंगाचे असतात. वरचा राखडी व खालील भाग पिवळट करडा असतो. हिवाळ्याच्या दिवसात या पक्ष्यांचे आगमन मोठ्या प्रमाणात होते. त्याला हिवाळी पक्षी असेही म्हणतात. सरोवरांच्या किनाऱ्यावर चिमण शेंदऱ्या आढळतो. विविध ठिकाणी विविध नावांनी दर्शन देणारा चिमण शेंदऱ्या या पक्ष्याच्या मोठी लालसरी व मोठी लालसरी असे दोन प्रकार असल्याची नोंद आहे. मोठी लालसरी अर्थात शेंदऱ्या बाड्डा असं नाव असणाऱ्या या पक्ष्यातील नराच्या डोक्यावर शेंदऱ्या रंगाची लव असते. लाल चोच व त्यावरील भाग फिक्कट राखडी रंगाचा असतो. खांद्यावर पांढरे डाग दिसून येतात. उडताना तो दिसल्यास डोके आणि चोच ही शेंदरी असल्याचे लक्षात येते. मादीचा वरच्या भागाचा रंग हा फिकट, धूसर राखडी असतो. थंडीच्या दिवसात भारतात हे पाहुणे पक्षी येतात. त्यांना 'हिवाळी पक्षी' असे म्हणतात.




## वंडर गर्ल
## वैदेही आनंद वाघमारे



संजय पेंडसे/९४२२४४३२९५

**बाल मित्रांनो,** स्वप्न बघणं कधीही चांगलंच! आपण स्वप्नं कोणतीही बघू शकतो. स्वप्नात आपण आकाश भ्रमण करू शकतो. पृथ्वीला बघू शकतो आणि चंद्रावरही जाऊ शकतो. अशी स्वप्न असल्यानंतर प्रत्यक्ष चंद्रावर जाण्याची महत्वाकांक्षा ठेवणारी आपली आजची वंडर गर्ल आहे वैदेही आनंद वाघमारे! चंदामणी नगरात राहणारी वैदेही अपोस्टॉलिक कॉन्व्हेंटची विद्यार्थिनी आहे. वैदेही पूर्वी बेलतरोडी येथील एसओएस या शाळेतदेखील होती. अभ्यासात ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या वैदेहीला निवेदन करायला खूप आवडतं आणि नवनवीन कल्पना करायलाही आवडतात. आईकडून महाभारतातील गोष्टी ऐकायला आवडतात, इंग्रजीतील स्टोरी बुक्स वाचन, लायब्ररीतून पुस्तक घेऊन येणं, वाचणं हा तिचा छंद! पण, यापेक्षा जास्त ती निसर्गावर प्रेम करते आणि कोणी झाड तोडायला आलं तर त्याचा ती विरोध करते. वैदेही वर्गात कॅप्टनसुद्धा आहे. अशा या वैदेहीने रेन ड्रॉप सेंसर असं एक मॉडेल विज्ञान प्रदर्शनात तयार केलं. पाण्याचा प्रत्येक थेंब कसा वाचवता येईल, याविषयी जे मॉडेल तिने तयार केलं त्यात तिला बक्षीसही मिळालं. ती दूरदर्शनवर 'भारत को जानो' प्रश्नमंजुषा बघते. एकूण ३६ शाळांच्या स्पर्धकांमध्ये तिला प्रश्नमंजुषेत दुसरे बक्षीस मिळाले. आई तिला खूप प्रोत्साहन देते. अशा या आपल्या वंडर गर्ल वैदेहीला तिच्या हातून चूक झाली तर पश्चात्तापही होतो. विविध विषयांचा अभ्यास करायला तिला खूप आवडतो. तिचे शाळेतील मित्र आराध्य, मृणाली आणि ताकसांडे यांची वागणूक खूप तिला आवडते. शाळेच्या मुख्याध्यापिका विनिता बावर मॅडम यांचा नम्रपणा तिला आवडतो. अशी आपली ही वैदेही जिची चंद्रावर जाण्याची इच्छा आहे. शाळेचा असा एकही कार्यक्रम नाही ज्यात वैदेही सहभागी होत नाही. वैदेही कविता करते, पुस्तकं वाचते, निवेदन करते आणि खूप मित्रही जमा करते. अशा सर्व विषयांमध्ये सहभागी होणारी, आपली वंडर गर्ल वैदेहीचं तरुण भारतचा छोटे उस्ताद मनापासून कौतुक करतो आणि तिला शुभेच्छा द्यायला विसरत नाही




## ऋतू रबीचा

पाणी पिऊन बीजं फुगली, अंकुर फुटले आतून
हसत हसत बाहेर पडले मातीच्या पोटातून...
कोवळं कोवळं ऊन सांडलं, अंकुर भिजले उन्हात
आभाळाचं निळं पांढरं रुपडं हसलं मनात...
अंकुरांना फांद्या पालवी, उगवून आले फुटवे
दवाराने कुंपण घालून तोलून धरले पडदे...
इवल्या इवल्या अंकुरांनी, धरले नाजूक बाळसे
शिवाराच्या गावी थंडी घालून आली वळसे...
वाऱ्याच्या झोता सरशी, डोलू लागल्या माना
चिऊ काऊ पाखरांचा गाव झाला दिवाना...
लेकरांना पाखरांना, खुशी झाली फार
रबीच्या हंगामाचा ऋतू हिरवागार

**- भानुदास धोत्रे**

७९७२६२५०८६

## झेंडूची फुले



झाडावर खेळती, झेंडूची फुले
हवेच्या तालावर, हळूवार डुले
हिरव्या पानांत, बसती दडून
कधी वाटते, घ्यावी खुडून
दिवाळी दसऱ्याला, झेंडूचाच मान
दारावर तोरण, दिसते किती छान
सकाळी दिसती, पुजेच्या ताटात
महादेवाच्या पिंडीवर, बसती थाटात
घरादाराला सजविती, झेंडूच्या माळा
मनमोहक रंग, केशरी नि पिवळा

**- रवींद्र चालीकवार**

९०११५५९१०६

## मास्तर



अभिजित खोडके /९४२२७ ८०६०५

टोळी किंवा सेवावस्ती हा शब्द सर्वज्ञात व्हायचा असावा, तेव्हाचा हा प्रसंग आहे. एका मैदानात दररोज, एका ठराविक वेळी काही वेगवेगळ्या वयाची माणसं एकत्र येतात, सोबत खेळतात अन् तास-दिड तासानं निघून जातात. कधी-कधी आसपासच्या घरांमध्ये दिसतात. त्याला संपर्क म्हणतात, हे ठरायच्या जवळपासचा हा प्रसंग असावा.

आज रविवारचा दिवस आहे. माणसं नियमितपणे ठराविक ठिकाणी जमली. पण, आज त्यांच्याकडे भरपूर सामान आहे. छोट्या-छोट्या पिशव्या ज्यामध्ये अन्नधान्य आणि इतर सामान आहे. पिशव्यांवर कोणतंही छापील नाव नाही की पिशवीच्या आत कोणताही जाहिरातीचा कागद नाही. सोबत साफसफाईला लागणारी अवजारं आहेत. या शहराला रस्त्याचं विभाजन आहे. अर्ध्यापेक्षा जास्त शहराला रस्ताच दोन भागांत विभागतो. खरं तर रस्त्याच्या दोन्ही बाजूला श्रमिक, कामगार, नोकरदारांची घरं...बस्स कामाच्या, नोकरीच्या प्रकारात अंतर! हेच अंतर या अरुंद रस्त्याला सामाजिक आणि आर्थिक निकषांचं वेष्टन घालत आणखी रुंद बनवतं. आज हेच अंतर कमी करायला ही माणसं, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जात आहेत. चिंचोळ्या-तंग गल्ल्या, नागमोडी वळणं, दाटीवाटीनं उभ्या असलेल्या घरांच्या आणि घरापेक्षा घराबाहेर पसरलेल्या पसाऱ्यातून वाट काढत ही टोळी मुख्य चौकात पोहचली. रात्री उशिरा घरी पोहचलेली माणसं आवरत होती तर काही माणसं सकाळीच कामावर निघून गेली होती. त्यांची लहान मुलं रस्त्यावर खेळत होती.

मुख्य शिक्षकांनी मोर्चा सांभाळला. त्यांनी चौकाचा ताबा घेतला. बाकीचे लोक त्यांना मास्तर म्हणतात. खरंतर ही सगळीच माणसं एकमेकांना मास्तर म्हणतात. लहान मोठ्यांना, मोठे लहानांना! चौकाच्या मधोमध सर्व सामान ठेवलं. विशी-तिशीच्या आतल्या मुलांनी हातात ग्लव्ज घालून साफसफाईची अवजारं घेतली. इतर माणसांनी अन्नधान्याच्या पिशव्या हाती घेत, घरांच्या ओळी वाटून घेतल्या. मुख्यशिक्षकांनी चौकातल्या मुलांना एकत्र केलं. सुरुवातीला नावं विचारली, शाळेतला वर्ग विचारला, गप्पा सुरू झाल्या. तरुण मुलांनी रस्ता, नाल्यांच्या काठावरचा कचरा काढून सोबत आणलेल्या पिशव्यांमध्ये भरायला सुरुवात केली. मागोमाग एका तरुण मुलानं पाठीवरच्या पंपातून फवारणी सुरू केली. अन्नधान्याच्या पिशव्या वाटायला गेलेली माणसं घराबाहेर थांबत होती. घरातल्या माणसांना विनम्र भावानं, प्रश्नार्थक अंदाजात पिशवी दाखवीत होती. काही घरांतून लगेच प्रतिसाद येई, काही घरांतील माणसं अजूनही अवघडलेली होती. शेजारी काय करतात हे पाहण्यासाठी थांबलेली होती. कोणीच फारसं काही बोलत नव्हतं पण, काम सुरू होतं शिस्तीत!

सूर्य वर यायला लागला तसा सर्वांनी वेग वाढवला. आता घराघरासमोर चुली पेटल्या होत्या. आया आपल्या तान्ह्या लेकरांना पदराखाली घेऊन रांधत होत्या. वस्तीत करता येईल तेवढी साफसफाई जवळपास झाली होती. पिशव्यांचं वाटप संपत आलं होतं. चौकात मुख्यशिक्षकांनी मुलांना काही नवे खेळ शिकवले होते. मी शिवाजी... म्हणत लहान मुलं गोलाकार फिरत होती. घराघरात अन्न शिजलं, तशी मुलं कमी व्हायला लागली. काही घरांतून मुलांना हाका यायला लागल्या. काही मुलांना घरातील माणसं येऊन घेऊन गेली. आज अनेक घरांत पिशव्यांतील शिदोरीमुळे चांगले पदार्थ शिजत होते. मुख्यशिक्षक जाणाऱ्या मुलांना पुढच्या रविवारी परत भेटू म्हणून सांगत होते.

वस्तीत विविध दिशेने गेलेली माणसं पुन्हा चौकात परत येत होती. संख्या आणि हिशोब सुरू झाला. भूक तर यांनाही लागलेली होती. एका पिशवीत बिस्कीटाचे काही पुडे उरले होते. मुलांनी ते बाहेर काढले. 'मास्तर...' बिस्कीटाचा पुडा पुढे करत ही माणसं एकमेकांना विचारत होती. प्रत्येक जण दोन-चार बिस्कीटं उचलून घेत होता. रस्त्याच्या कडेला उभी असलेली एक पाच-सहा वर्षांची मुलगी हा प्रकार काही वेळापासून बघत होती. तिच्या हातात फरशीचा एक तुकडा होता. मागच्या अंगणात चिप्पीचे चौकोन आखलेले होते. तिचा आठ-नऊ वर्षांचा भाऊ मागे बसून, घर आणि त्याच्या तीन-चार वर्षांच्या धाकट्याला राखत होता. अधूनमधून वो...वो...आ...आ करत होता. मुका असावा कारण, एकेरी अक्षराव्यतिरिक्त तो एकही सलग शब्द बोलत नव्हता. घरातील माणसं सकाळीच कामावर निघून गेली असावीत. मुलं घरात झोपून असावीत म्हणून पिशव्या वाटायला गेलेल्या कोणाचंच यांच्यावर लक्ष गेलं नाही. भूक तर त्यांना पण लागली असेलच. रस्त्याच्या या बाजूला, मास्तर...म्हणत हात पुढे होत होता आणि बिस्कीटं वाटली जात होती.

रस्त्याच्या कडेला उभी असलेली 'ती' मुलगी थोडं धाडस करून, पुढे आली. तिनं फरशीचा तुकडा असलेला हात मागे लपवला आणि दुसरा हात पुढे करत म्हणाली...मास्तर! तिला काय मागायचं ते माहिती नसावं पण, मास्तर म्हणजे तिच्या भुकेवरचा इलाज तिला वाटला असावा. कदाचित बिस्किटालाच ती मास्तर समजत असावी. जमलेली माणसं तिच्या भाबडेपणावर हसलेत. ती आणखीच घाबरली. एवढ्यात जमलेल्यापैकी एकाने तिच्या हातात बिस्कीटाचा पुडा ठेवला. आणखी एकानं धान्यानं भरलेली एक पिशवी तिच्या हातात दिली. एका हातात पुडा घेऊन दोन्ही हातांचे वेटोळे करत तिनं ती पिशवी घेतली. ती वेगात घराकडे निघाली. आधीच वजनदार पिशवी, त्यात तिची घाई आणि पोटातील भूक! हातातून पिशवी खाली पडली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ही सगळीच माणसं कधीचीच कौतुकानं पाहत उभी होती. त्यातील दोघे-तिघे पुढे झाले. पण, तोपर्यंत तिचा भाऊ धावत पुढे आला. त्यानं आधी तिला उभं केलं, तिच्या गुडघ्यांना लागलेली धूळ पुसली, पिशवी उचलली. आताही तो आ...आ एवढंच बोलला, फक्त थोड्या वरच्या सुरात! दिसत नाही का? एवढी कशाची घाई आहे? किंवा आणखी काहीही, त्याला नेमकं काय म्हणायचं होतं त्यालाच ठाऊक! पण, त्याच्या शब्दात नाराजी आणि काळजी होती हे निश्चित! त्या मुलीची नजर मात्र अजूनही बिस्किटांचा पुडा शोधत होती. तिनं तो उचलला आणि त्याच्या पुढे करत ती म्हणाली...मास्तर! त्याला बोलता येत नव्हतं पण, ऐकता येत असावं. एका हातात तिचा हात आणि दुसऱ्या हाताने पिशवी उचलून ते बहिणभाऊ घराकडे गेले. त्या दोघांनी दोनचार बिस्कीटं खाल्ली. एका पेल्यात पाणी आणून, त्यांनी काही बिस्कीटं त्यात बुडवली आणि लहान भावाला भरवली. घास भरवताना ती त्या लहानग्याला म्हणत होती, मास्तर...मास्तर!

संख्या पूर्ण झाली. हिशोब संपला. आलेली माणसं, आली होती त्याच दिशेनं परत निघाली. चौक ज्या नागमोडी वळणावर दिसेनासा होणार होता, तिथं मुख्यशिक्षक एकदमच थांबले. त्यांनी त्या चौकाकडे परत एकदा वळून पाहिलं, हसलेत आणि परत चालायला लागले. एक विशीतला मुलगा हा प्रकार पाहत होता. त्यानं थेट विचारलंच, काय झालं मास्तर? तसं मुख्यशिक्षक म्हणाले,'आज न रिंगण झालं, ना ध्वज लागला, ना प्रार्थना झाली, तरीही आज आपल्या टोळीला तीन नवे 'मास्तर' मिळाले. फार पूर्वी अनुताई वाघांचं 'कोसबाडच्या टेकडीवरून' हे आत्मचरित्र वाचलं होतं. त्यात त्या म्हणतात, मास्तरांनी लेकरांच्या अंगणातील झाड झालं पाहिजे. त्या म्हणतात, तो आणि आपण आहोत. त्या मास्तर शब्दात तसं अंतर असलं तरी 'झाड होणं' म्हणजे काय ते आज कळलं.

## बंटीची बंडखोरी



(भाग २९)

प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२

बंटी ग्रुपची स्पेशल सुट्टी संपली. टर्मिनल परीक्षेचा रिझल्ट लागला. 'काँग्रेज्युलेशन बंटी...९८ टक्के गुण मिळवून तू दहावीच्या सर्व वर्गांतून पहिला आला आहेस,' बंटीच्या क्लासटीचरने म्हणताच, वर्गातून सर्वांनी टाळ्यांच्या कडकडाटात बंटीच्या यशाला भरभरून दाद दिली. बंटीनं उभं राहून, दोन्ही हात जोडून त्यांचे आभार मानले.'बंटी SS दोन टक्के कुठे कमी पडले? ते कमी पडले नसते तर, पैकीच्या पैकी टक्के मिळाले असते,' शिरीषनं बंटीच्या पाठीवर कौतुकाची थाप देता देता म्हटलं. 'अरे भाषा विषयात थोडे कमी पडले. ज्या प्रश्नांची उ?रं सविस्तर लिहायची असतात नं, तिथे त्यांना मार्कांची कंजुसी करायला वाव मिळतो. बाकी विषयात पैकीच्या पैकी आहेत,' बंटीनं सांगितलं.

'बंटी, पार्टी पाहिजे हं...' यश म्हणाला. त्याला सर्व ग्रुपनं अनुमोदन दिलं.

'देईन नं, पण बाहेर हॉटेलमध्ये नाही. घरी जाऊ या,' बंटी ग्रुप हास्यविनोद करत बंटीच्या घरी पोहचला.

'काकू SS पार्टी पाहिजे. बंटीनं एकदम सिक्सर मारला आहे,'सारे एका सुरात म्हणाले.'हो नक्कीच! दहा मिनिटात, काहीतरी मस्त बनवते. पण, मला सगळ्यांचे परसेंटेज सांगा...' बंटीची आई म्हणाली. 'काकू, आम्हा सर्वांनाच पंच्याऐंशी ते नव्वदच्या दरम्यान टक्के आहेत. दिवाळीच्या सुट्ट्यामध्ये, तुम्ही आमच्याकडून जी रिव्हीजन घेतली, त्याचाच परिणाम आहे हा!' शिरीषनं सांगितलं. 'तुम्ही सगळेच हुशार विद्यार्थी असल्याने, तेवढा अभ्यास पुरला तुम्हाला! तुमच्या तोंडापर्यंत घास कोणीतरी आणून दिला तरी चावावं तर तुम्हालाच लागेल ना?' बंटीची आई हसत हसत म्हणाल्या,'तुमच्या सगळ्यांचं खूप अभिनंदन!'

भरपूर प्रोटीनयुक्त पसरटू आणि डिंक लाडू असा पौष्टिक फराळ आईनं सर्वांना दिला. 'बंटी, दिवाळी संपली. तुळशीचं लग्नंही झालं. पण, यावर्षीचे आपले फटाके मात्र संपले नाहीत,' शिरीष म्हणाला. 'हो नं रे... तरी आपण यावर्षी, आवाजाचे फटाके आणले नाहीत. फक्त अनार, चक्रं, फुलबाजा असे शोभेचे फटाके आणलं होते. तरी संपले नाही,' स्वानंद म्हणाला.

'तसंही यंदा दादा लोकांनी फटाकेही उडवले नाहीत. ते आता मॅच्युअर्ड झाले आहेत. फटाके, फुलबाज्या हे लहान मुलांचं आकर्षण राहिलं आहे,' यश हसत म्हणाला. 'आपण कुठल्या प्रकारात येतो?धड लहान नाही, मोठेही नाही. म्हणावं तर अजून फटाके उडवावेसे वाटतात पण, एकीकडे हवेतलं प्रदूषण टाळावं असंही वाटतं,' बंटीनं स्पष्टीकरण केलं.'तर सांगायचं कारण म्हणजे, आपण येत्या रविवारी आपले राहिलेले फटाके उडवून टाकू या. क्लब हाऊस बाहेर नोटीस बोर्डवर त्याप्रमाणे नोटीस लावू या. सगळ्या बच्चे कंपनीलाही बोलवू या,'यशनं उपाय सुचवला.

'गुड आयडिया, शुभस्य शिघ्रम, चला तयारीला लागू या. लॅपटॉपवर आताच लिहून त्याचे प्रिंट आऊट काढून, नोटीस बोर्डवर चिकटवू,' बंटी, लगेच लॅपटॉप घेऊन आला.'येत्या रविवारी, इन्द्रप्रस्थमध्ये आतिषबाजी! लहान मोठ्यांनी आपापले फटाके घेऊन संध्याकाळी पार्किंग लॉटमध्ये यावे,' अशी नोटीस क्लब हाऊसच्या नोटीस बोर्डवर लावली. रविवार उजाडला. साऱ्यांचा उत्साह उतू जात होता. संध्याकाळी प्रत्येक जण आपापले फटाके घेऊन, पार्किंग लॉटमधे जमले.

'कुठे ठेवायचे फटाके?' जो तो बंटीला विचारू लागला. बच्चे कंपनीबरोबर त्यांचे आईवडील, आजीआजोबाही आले.'आमच्या पार्किंगमधे ठेवा. तसाही आमचा पार्किंग एरिया रिकामाच आहे. ठेवा तिथे,' जोशी आजोबांनी उत्साहात सांगितलं.

'हो चालेल. ऐका ऐका... प्रत्येकानं आपले फटाके, अनार, चक्रं सारं जोशी आजोबांच्या पार्किंगमध्ये ठेवू या. महत्वाची गोष्ट म्हणजे यात, माझं तुझं असं काही करायचं नाही. कोणाचेही फटाके कोणीही उडवू शकतं,' बंटीनं सगळ्यांना बजावलं. 'कबूल?' त्यानं विचारलं. बघता बघता, जोशी आजोबांच्या पार्किंग लॉटमधे सगळ्यांचे फटाके जमले. 'इन्द्रप्रस्थच्या सभासदांनो ऐका...फटाक्यांची, अनारची, चक्रांची जादू, झगमगाट ज्यांना प्रत्यक्ष पहायचा आहे, त्यांनी खाली यावं... लौकरच आतिषबाजी सुरू होते आहे. तो मंडळी, दिल थामके बैठिये, और मजा लीजिये.'

बंटी ग्रुपनं प्रेक्षकांसाठी क्लब हाऊसमधून खुर्च्या आणून मांडल्या. सारी पालक मंडळी, आजी आजोबा स्थानापन्न झाले. हळूहळू अंधार पडू लागला. पार्किंग लॉटमधले दिवे लागले. बंटी ग्रुपने आपापल्या घरातून पणत्या आणून, पाण्याच्या कव्हर्ड टँकवर ओळीने पेटवून ठेवल्या.'प्रथम लवंगी फटाके मग इलेक्ट्रिक फटाके, लक्ष्मी बार, बॉम्ब असे आवाजाचे फटाके उडवायचे आहेत. त्यासाठी, पणत्यांच्या बाजूला उदबत्या ठेवल्या आहेत. बच्चे कंपनीबरोबर त्यांचे आई वडील आले तरी चालतील कारण, त्यांना एकट्यांना फटाके उडवू देणं रिस्की आहे,' बंटीनं सांगितलं.

त्याच्या आज्ञेचं पालन करत, छोटे बच्चे आपल्या दोन्ही हातात फुलबाज्या घेऊन त्या गोल गोल फिरवीत राहिले. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. त्यानंतर, थोडी मोठी मुलं आली. आपल्या आईच्या मदतीनं त्यांनी लवंगी, इलेक्ट्रिक फटाक्यांच्या सरी लावल्या. धुडूम धाड धाड आवाज आला. साऱ्या प्रेक्षकांनी परत टाळ्या वाजवल्या. त्यानंतर आला बंटी ग्रुप! जबरदस्त आवाजाचे फटाके, अनार, चक्रं अशी आतीषबाजी केली. परत एकदा टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यानंतर, आजोबा-बाबा ग्रुप अनार, चक्रं उडवीत राहिला. फटाक्यांचा किती स्टॉक राहिलाय ते पहायला बंटी आणि यश गेले. अजून कितीतरी अनार, चक्रं शिल्लक होती. यश आणि बंटी परत फिरणार इतक्यात फुलबाजांच्या एका बॉक्समधून ठिणग्या पडताना दिसल्या.

'अरे बापरे! काहीतरी प्रॉब्लेम दिसतोय. यश, मी पलिकडच्या बाथरूममधून बादलीभर पाणी आणतो आणि फुलबाज्यांच्या बॉक्सवर टाकतो. बंटी धावत बाथरूममधून पाण्यानं भरलेली बादली घेऊन आला मात्र, तोपर्यंत सगळ्या फुलबाज्यांच्या बॉक्सने पेट घेतला होता. बादलीभर पाण्यानं ती आटोक्यात आली नाही. 'आता काय करायचं बंटी? पार्किंग लॉटमध्ये सगळ्या कार्स, स्कूटर्स, बाईक्स इथे आहेत. मी वॉचमन काकांना आणि दादा लोकांना घेऊन येतो,' यश म्हणाला.

बागेच्या कामासाठी आणलेली मातीची, खताची रिकामी पोती पडली होती. बंटी धावत जाऊन ती पोती घेऊन आला. पटापटा त्यानं आगीच्या जागेवर ती टाकली. काही काळ, आग शमल्यासारखं वाटलं. मात्र, एका बाजूने आग बंद झाल्यावर दुसऱ्या टोकाला ती पसरल्याचं बंटीच्या लक्षात आलं.

'फायर ब्रिगेडला फोन करायचा?' त्याच्या मनात आलं. तोपर्यंत वॉचमन काका, दादा कंपनी तिथे येऊन पोहचली. 'आपण फायर ब्रिगेडसारखा फोर्सफुली पाण्याचा फवारा मारला तर?' एका दादा म्हणाला. 'हो... आपल्या तळघरात, पाण्याचा पाईप आणि त्याला जोडणाऱ्या वेगवेगळ्या जाळ्या आहेत. मी त्या घेऊन येतो, तोपर्यंत तुम्ही ही पोती, आगीवर टाकत रहा,' बंटी बोलत होता. एका दादा वॉचमन दादांबरोबर ॲटॅचमेंटस शोधायला तळघरात गेला. नेमक्या त्या जाळ्या सापडत नव्हत्या. इकडे बंटी ग्रुप जीवाची बाजी लावून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत होता.

अखेर जाळ्या सापडल्या. दादा आणि वॉचमन काका दोघांनी बाथरूममधल्या नळाला पाईप जोडला. बंटीनं सगळ्यात मोठी ॲटॅचमेंट जोडली. भल्या मोठ्या फोर्सनं पाणी येऊ लागलं. बघता बघता आगीवर नियंत्रण मिळालं. संपूर्ण आग शमली. मात्र, उरलेले फटाके, अनार, चक्रं सारं भिजून वाया गेलं. दादा, बंटी, यशनं एकमेकांना मिठी मारली. 'गड आला पण सिंह गेला तसं, आग विझली, पण फटाके भिजले,' बंटी हसत हसत म्हणाला. सारे त्याच्या बरोबर हसू लागले.

**क्रमशः**

परतुर येथे लोणीकर समर्थकांचा आभार मेळावा संपन्न; हजारो समर्थकांकडून लोणीकरांचं भव्य जंगी स्वागत

# परतूर-मंठा-नेर-सेवली विधानसभा मतदार संघ विकासाच्या बाबतीत राज्यात अव्वलस्थानी -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

शरद पवार यांच्या नेतृत्वातील उबाठा गटाचे नेते तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील महाविकास आघाडी सत्तेत असताना राज्यभरात अराजकता माजली होती. साधू संतांवर हल्ले होत होते. राष्ट्रीय पुरुषांवर महाविकास आघाडीतील दळभद्री नेते तोंड सुख घेत होते. भ्रष्टाचाराने बरबटलेल्या महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये तत्कालीन राज्याचे गृहमंत्री महिन्याला शंभर कोटी रुपये वसुली करत होते. त्यामुळे तत्कालीन महाविकास आघाडी सरकारला उलथवून पायाखाली घेण्याच धाडस महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दाखवल त्यांच्या पाठीशी राज्यातील भारतीय जनता पक्ष खंबीरपणाने उभा राहिला. त्यामुळे राज्याच्या राजकीय सत्तेत तडजोड करावी लागली होती. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाची विद्यमान नवनिर्वाचित आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. ते भारतीय जनता पक्षातर्फे आयोजित परतूर - मंठा - नेर - सेवली विधानसभा मतदार संघातील परतूर तालुक्यातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), रयत क्रांती संघटना व मित्र पक्ष महायुतीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या भव्य मेळाव्यात महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानत असताना बोलत होते. यावेळी पुढे बोलताना



आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की महाराष्ट्रात पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याची मंत्री पदाची जबाबदारी माझ्यावर असताना आपण परतूर विधानसभा मतदारसंघात सुमारे ४००० कोटी रुपये निधी विकास कामाकरता आणला असून गत पाच वर्षात विधानसभेचा सदस्य म्हणून काम करत असताना परतुर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरिता आपण ३७०० कोटी रुपये निधी आणला असून परतूर विधानसभा मतदारसंघ राज्यातील विधानसभा मतदारसंघाच्या बाबतीत विकासात अव्वल स्थानी असून मी केलेल्या विकास कामाच्या मुद्द्यावरच आपण विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांना सामोरे गेल. विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू भगिनींनी विकास कामांना प्राधान्य देऊन मला पुन्हा पाचव्यांदा विधानसभेत मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त करून दिली याबद्दल विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्य मतदार बंधू-भगिनींचा मी मनःपूर्वक आभारी आहे. पुढे बोलताना माजी मंत्री नवनिर्वाचित आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मी मुंबई येथे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन मतदार संघातील समर्थकांच्या भावना मी त्यांच्यापर्यंत पोहोचविले आहेत. तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पदाच्या खात्याचा कारभार माझ्याकडे असताना महाराष्ट्र राज्यात आपण एक कोटी स्वच्छतागृह बांधकाम करण्याकरिता प्रती लाभार्थी १२ हजार रुपये अनुदान देऊन महाराष्ट्र राज्याला हागणदारीमुक्त केला आहे. गावागाव-ातील तांडेवाड्या वस्ती आतील खेड्यापाड्यातील नागरिकांसह शहरातील नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावं म्हणून राज्यातील १८००० गावात मराठवाडा वॉटर ग्रीड योजना आपण यशस्वीपणे राबविले असून. हागणदारी मुक्त महाराष्ट्र आणि पिण्याचे शुद्ध पाणी राज्याला पुरविल्यामुळे महाराष्ट्रातील रोगराई नाहीशी झाली असून राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य सुधारलं असून साथीचे आजार आता उद्भवत नाहीत असा दावाही यावेळी आमदार लोणीकर यांनी केला. तत्कालीन मंत्रीपदाच्या कार्यकाळात खांद्यावर असलेल्या जबाबदारीचे भान ठेवून केलेल्या कामामुळे महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासाकरिता पुन्हा एकदा मंत्रिमंडळात काम करण्याची संधी मिळेल असा विश्वास देखील यावेळी आमदार लोणीकर यांनी आपल्या समर्थकांसमोर बोल-ताना व्यक्त केला.

भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुलभैया लोणीकर,

भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुगुण कणसे, रमेश राव भापकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपतराव टकले, भगव-ानराव मोरे दया काटे, महाराज, संभाजी वारे, नगरसेवक प्रवीण सात-ोनकर, कृष्णा आरगडे, निवृत्तीआप्पा लाटे, आसाराम लाटे. माणिकराव वाघमारे, बबनराव आकात, प्रकाश चव्हाण, संदीप बाहेकर अशोकराव बुरकुले, बंडू मानवतकर, तुकाराम सोळंके, बद्रीभाऊ ढवळे, गजानन लोणीकर, बबलू सातपुते, नितीन जोगदंड, दिनेश होलानी, स्वप्नील मंत्री यांच्या सह हजारो कार्यकर्ते समर्थकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### संविधानाचा सन्मान फक्त प्रती वाटून नव्हे तर अंमलात आणूनच होईल-ॲड.धन्नावत



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

संविधानाचा सन्मान फक्त प्रती वाटून नव्हे तर अंमलात आणूनच होणार असल्याने, त्यादृष्टीने तसे प्रयत्न करायला हवेत, असा आग्रह सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेश सिताराम धन्नावत यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे एका पत्राद्वारे केला असून, नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्याची मागणीही केली आहे.

ॲड. धन्नावत यांनी महानगरपालिकेच्यावतीने संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्याबद्दल प्रशंसा केली. परंतु, संविधानातील आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ प्रतिकात्मक आयोजन पुरेसे नाही, असेही म्हटले आहे. रस्त्यांची दुरुस्ती, गटारांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक स्वच्छता यासारख्या नागरी मूलभूत सुविधा पुरविण्यात याव्यात, याकडे लक्ष वेधले आहे. जालना शहरातील अनेक भागात, जसे की कालीकुर्ती आणि ज्येष्ठ नागरिक शर्माजी यांच्या घराजवळील गटारांवर झाकण नाहीत, ज्यामुळे घाण आणि पाणी साचण्याची समस्या वाढत आहे. कॉलेज रोडसह शहरातील अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याबद्दलही चिंता व्यक्त केली. संविधानाच्या उद्देशिकेतील आदर्श आत्मसात करून जनसेवेद्वारे आपल्या कर्तव्यांचे पालन करावे, अशी विनंती ॲड. धन्नावत यांनी महानगरपालिकेला केली असून, जर असे झाले नाही, तर ते संविधानाचा अपमान ठरेल, असे म्हटले आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकाऱ्यांनाही देण्यात आली आहे. निवेदन देताना ड. महेश धन्नावत यांच्यासोबत ड. महेश गाडेकर हेसुद्धा उपस्थित होते.

### रामभाऊ लांडे यांची ग्रंथ संकलन समितीवर निवड



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाच्या संकलनाकरीता स्थापन करण्यात आलेल्या समितीवर होळकरशाहीचे अभ्यासक रामभाऊ लांडे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर व अध्यासन संचालक डॉ.प्रभाकर कोळेकर यांनी नियुक्ती केली.सन २०२४-२०२५ हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीचे वर्षे असुन संबंध देशभर विविध उपक्रमातून अहिल्यादेवींचा इतिहास व जीवनचरित्र सर्व घटकापर्यंत पोहचविण्याचे कार्य केंद्र व राज्य सरकार तसेच विविध शैक्षणिक संस्था, संशोधन मंडळ आदी करीत आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने देखील २०२५ या वर्षात अहिल्याद-ेवींच्या जीवनचरित्रांचा चित्ररथ,स्मारक ग्रंथ, व्याख्याने,ऐतिहासिक सहल आदी उपक्रम आयोजित केले आहेत. रामभाऊ लांडे यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.




जाफ्राबाद तालुक्यांतील माहोरा येथील जिल्हा परिषद प्रशाला येथे बालविवाह प्रतिबंधक कायदया बद्दल माहिती शाळेतील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद प्रा.शा.चे मु. अ. श्रीकृष्ण चेके, जेष्ठ शिक्षक सुधिर लकडे, गणेशराव पवार, दिलीप सपकाळ, ए.डी.पवार, अन्य शिक्षकांनी व अंगणवाडी सेविका, अश्या सेविका,यांनी सुध्दा बालविवाह कायदा बद्दल समाजात जनजागृती करावी व कोठेही २१ वर्षाच्या मुली विवाह बाल विवाह होणार नाही यांची जागृत पालकांनी जागृत राहुन बालविवाहस रोखण्यास कायदने व समाज ने सहकार्य करावे व बालविवाह होण्यास टाळावे असेही श्रीकृष्ण चेके यांनी मार्गदर्शन पर बोलतांना सांगितले.

## कल्याण आखाडे यांना विधान परिषदेची संधी द्या -परमेश्वर ढवळे

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत स्टार प्रचारक म्हणुन महायुतीच्या बाजुने अत्यंत निष्ठेने भूमिका निभावली. राज्यात झालेल्या विधानसभेच्या निकालामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढविण्यामध्ये सावता परिषदेची मोलाची मदत झालेली आहे. कल्याणराव आखाडे यांच्या नेतृत्वाला न्याय म्हणुन त्यांना विधान परिषद सदस्य म्हणुन संधी द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याकडे सावता परिषदेचे परतुर तालुकाध्यक्ष परमेश्वर ढवळे यांनी केली आहे. कल्याण आखाडे यांचा दांडगा जनसंपर्क व क्रीयाशील व्यक्तिमत्त्व म्हणुन त्यांचा परिचय सावता परिषदेने महाराष्ट्राला दिलेला आहे. अमोघ वक्तृत्वाने त्यांनी समाजात जागर केला. सावता परिषदेच्या माध्यमातून राज्यातील माळी समाज जोडलेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. अनेक मतदार संघात सावता परिषदेचा निर्णायक प्रभाव आहे.



कल्याण आखाडे यांनी अनेक मतदारसंघात प्रचार सभा घेतल्या. घेतलेल्या प्रचार सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भरभरून यश मिळालेले आहे. एक निष्ठावंत, प्रमाणिक व क्रीयाशील नव्या चेहऱ्याला विधीमंडळाच्या विधान परिषदेची संधी मिळावी ही माळी समाजासह अनेकांची अपेक्षा आहे. अजित पवार कल्याणराव आखाडे या नेतृत्वाला न्याय देतील असा विश्वास सावता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना आहे. विधानपरिषद सदस्य म्हणून या निवडणुकीत अनेकजण विधान सभा निवडणुकीत विजयी झालेले आहेत. यामध्ये पाथरी विधानसभेत राजेश विटेकर यांचा विजय झालेला आहे. त्यांच्या होणाऱ्या विधान परिषदेच्या रिक्त जागी कल्याण आखाडे यांना संधी द्यावी. विधानपरिषदेची संधी देऊन आगामी काळात काम करण्यास बळ मिळेल अशी अपेक्षा अजित पवार यांच्याकडे सावता परिषदेचे परतुर तालुकाध्यक्ष परमेश्वर ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

## शास्त्री विद्यालयाच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांसाठी बससेवेचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

शहरातील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या पुढाकारातून वलखेड, बामणी, शेरोडा, शेवगा इतर गावातील विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी आगारप्रमुख माधुरी देशमुख यांच्या हस्ते बससेवेचा शुभारंभ कारण्यात आला.यावेळी वाहतूक नियंत्रक साळवे मॅडम,जगदीश बरसाले,मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्यासह गावकरी मंडळी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

येथील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात वलखेड, बामणी, शेरोडा, शेवगा या व इतर गावातील विद्यार्थी मोठया संख्येने शिक्षणासाठी येतात. परंतु या गावांना बससेवा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांची अडचण होत होती.विद्यार्थ्यांची शाळेत येण्या-जाण्याची अडचण लक्षात घेत मुख्याध्यापक बिरादार सरांनी आगारप्रमुख श्रीमती माधुरी देशमुख यांची भेट घेत बससेवा सुरु करण्याची विनंती केली. देशमुख यांनी या मागणीची तातडीने दखल घेत बस सुरु केली. त्यामुळे विद्यार्थी, गावकरी, पालक मंडळींमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. शुक्रवारी सकाळी बस गावात पोहोचताच शेवगा,वलखेड,बामणी गावकऱ्यांच्या वतीने आगारप्रमुख माधुरी देशमुख, वाहतूक नियंत्रक श्रीमती साळवे, मुख्याध्यापक एल. के. बिरादार, चालक वाव्हूळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी टी. जी. घुगे, एम. के. वखरे, व्ही. एल. तनपुरे, ए. एस. धुमाळ, बी. बी. ढोबळे यांची उपस्थिती होती.

स्त्री शक्ती प्रबोधन संवादिनी गट पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना स्वतःचे व्यक्तिमत्व चांगले करणे गरजेचे -वेलणकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



संस्कार प्रबोधिनी विद्यालय व ज्ञान प्रबोधिनी स्त्री शक्ती प्रबोधन संवादिनी गट पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' उमलत्या वयाशी जुळवून घेताना ' यात विशाखा वेलणकर बोलताना म्हणाल्या की, प्रत्येकाने स्वतःचे व्यक्तिमत्व चांगले करण्यासाठी सतत कार्यरत असले पाहिजे. असे प्रतिपादन दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत त्यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी, विनायकराव देशपांडे,प्रा. केशरसिंह बगेरिया, डॉ.वैशाली पंडित,ज्ञान प्रबोधिनीच्या हेमांगी ठाकूर,मानसी ओगले,अमिता बेहेरे,परिमला पांडे,समृद्धी देशमुख आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या उद्घाटक डॉ.वैशाली पंडित बोलताना म्हणाल्या किशोरवयीन अवस्थेत शरी-रात प्रचंड बदल होत असतात. काय करावे काय करू नये हे आपल्याला माहीत असले पाहिजे.आपली दैनंदिनी ठरवून कार्य केल्यास शरीर तंदुरुस्त राहते.या वयात विद्यार्थ्यांमध्ये चिडचिडेपणा होणे.यासाठी आहारचे समतोल आपल्याला राग

आला पाहिजे.यासाठी संस्कार प्रबोधिनीने उमलत्या वयाशी जुळून घेताना या कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. या कार्यक्रमास इयत्ता नववी दहावी मधील विद्यार्थी तसेच मुख्याध्यापक ईश्वर वाघ,रामदास कुलकर्णी, रेखा हिवाळे,शारदा उगले दहिभाते, कीर्ती कागबट्टे,स्वप्नजा खोत, सुप्रिया कुलकर्णी,माणिक राठोड,रशीद तडवी,राहुल घोलप यांच्या सह शिक्षकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शारदा उगले- दहिभाते व आभार मु.अ.ईश्वर वाघ यांनी मानले.

## लोणीकरांना मंत्रिमंडळ स्थान मिळावे यासाठी भाजप कार्यकर्त्यांची महादेव मंदिरात महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

येथील भारतीय जनता पार्टी कार्यकर्त्यांच्या वतीने मोंढा भागातील चौक महादेव मंदिर येथे काल दिनांक २८ रोजी भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महादेव पिंडीला कार्यकर्त्यांच्या वतीने दुग्धाभिषेक करण्यात आला यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते भगवान मोरे, ओमशेठ मोर, दया काटे, यांच्यासह भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे, सुधाकर सातोनकर, अमोल अग्रवाल, अजित पोरवाल, दिनेश सेठ होलानी, संदीप दादा बाहेकर, आनंद कोटेचा, सोनू अग्रवाल, सुबोध चव्हाण, गजानन चव्हाण, मनोज मसलकर, बालाजी सांगोळे, डॉक्टर स्वप्नील मंत्री, सिद्धेश्वर लहाने, नरेश कांबळे, दत्ता गवळी, कृष्णा आरगडे, सुनील कोंडावार,



कैलास चव्हाण, अमर व रोशन बगडिया, रा स्व् संघाचे किशन अग्रवाल, मनीषा अग्रवाल, श्री सोळंके, नरेश कांबळे, सुनील कोंडावार, भगवानदादा सुरुंग, अभिजित जोशी, नेमीचंद कोटेच्या, ओवळे सावकार, शिवा बल्लमखाणे, आदींनी महादेव पिंडीला दुग्ध अभिषेक करून, महाआरती केली.

यावेळी परतुर शहरासह परिसरातील भाजपाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी जेष्ठ कार्यकर्ते भगवानराव मोरे व शत्रुघ्न कणसे यांनी मार्गदर्शन करताना भाजपाचे यशस्वी आमदार बबनराव लोणीकर यांनी संपूर्ण राज्यात महत्त्वकांक्षी वॉटर ग्रीड योजना आणून मोठे कार्य केले, तालुक्यातील प्रत्येक गावात वीज पाणी रस्ते करून मोठ्या प्रमाणात विकास कामे केली, लोणीकर यांच्या काळातच परतुर मंठा नेर शेवली भागात प्रचंड विकासाची कामे झलेली आहे, अत्यंत अनुभवी प्रगल्भ विचाराचे लोणीकर यांना पुन्हा एकदा मंत्रीपद मिळावे यासाठी आपण परमेश्वराला साकडे घातले असून लोणीकर यांना निश्चितच मंत्रिपद मिळेल अशी आशा व्यक्त केली.

## एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे यासाठी जालन्यातील शिवसेना शहरच्या वतीने मंमादेवी मंदिरात महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे यासाठी जालन्यातील शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांच्या उपस्थितीत शिवसेना शहर शाखेच्या वतीने मंमादेवीला साकडं घातलयं. जालना शहरातील मस्तगड येथील मंमादेवी मंदिरात शिवसेना शहर शाखेच्या वतीने देवीची महाआरती



करून देवीकडे एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदासाठी आणि आमदार अर्जुन खोतकर यांना कॅबिनेट मंत्री मिळू दे मंमादेवीकडे प्रार्थना केलीय. जालन्यातील शिवसेना शहर शाखेचे पदाधिकाऱ्यांनी मंमादेवीची मनोभावे पूजा करून महाआराती करत एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री पद मिळू दे आणि आमदार अर्जुन खोतकर यांना कॅबिनेट मंत्री अशी प्रार्थना केलीय. यावेळी शिव सेना शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले मेघराज भैय्या चौधरी दिनेश भगत मनोज देवरे शिवा मामा शेळके विक्रम कुसुंदर राज रत्नपारखे विशाल रत्नपारखे शुभम टेकाळे सागर गुटुक पांडुरंग खैरे पांडुरंग खैरे किरण गरड किशोर शिंदे भरत कुसुंदर रमेश खैरे राजू माधववाले आदिची उपस्थित होते

# मंत्रीपदावर लाडके दादा आ.केराम यांची वर्णी लागावी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर दि.२९ नोव्हेंबर**

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला त्यात प्रामुख्याने भारतीय जनता पार्टीला आई श्री रेणुकादेवी, प्रभु श्री दत्तात्रेय,माता श्री अनुसया यांचे कृपाशिर्वादाने छप्परफाडके यश मिळाले आहे.मतदारांनी महायुतीला पुन्हा सत्तास्थापनेसाठी बहुमताने स्पष्ट कौल दिला आहे.भाजपाकडून सध्याचे हंगामी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आगामी मुख्यमंत्री होण्याचा मार्ग देखील महायुतीकडून मोकळा झाला आहे.आता सर्वांना प्रतिक्षा आहे ती राज्यातील नवीन सरकारच्या शपथविधीची.इकडे किनवट/माहूर विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार प्रदीप नाईक यांची भेदक गोलंदाजी फोडून ९२८३६ नॉट आऊट राहत दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार भीमराव केराम यांच्यासाठी अभी नहीं तो कभी नहीं म्हणत त्यांची मंत्रीमंडळात वर्णी लागावी म्हणून मुंबई मुक्कामी जोरदार फिल्डींग लावण्यात आली आहे..नांदेड जिल्ह्यातल्या एकूण नऊही विधानसभेत विरोधकांना पार वॉशआऊट करत महायुतीने विजयी झेंडा फडकावला आहे. गतपंचवार्षिक काळातील सत्तासंघर्षाच्या नाट्यमय घडामोडीनंतर उद्धवलेली राजकीय परीस्थिती महायुतीचे सरकारने चाणक्य नीतीने यशस्वीपणे हाताळली.परंतु,आधे इधर,आधे उधर,बचे हुए मेरे साथ लेकिन कौन किसके साथ याचा पार्टी प्रमुखासह जनतेलाही थांगपत्ता लागत नव्हता. त्यामुळे जिल्ह्यासाठी पालकमंत्री म्हणून जिल्ह्याबाहेरील आमदार आयात करावा लागला.यावेळी झालेल्या विधानसभा निवडणुकीत सर्वच्या सर्व आमदार हे महायुतीचे निवडून आले आहेत.त्यात भाजपचे ०५, शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे ०३ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचा ०१ अशा एकूण ०९ आमदारांचा समावेश आहे.ज्यामध्ये भाजपकडून किनवट-आ.भीमराव केराम, भोकर-आ.ड.श्रीजया चव्हाण, मुखेड-आ.डॉ. तुषार राठोड, शिवसेनेचे राज्यमंत्री दर्जा प्राप्त तथा विधानपरिषदेचे आ.हेमंत पाटील आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे लोहा - आ.प्रताप पाटील चिखलीकर हे पाच आमदार मंत्रीपदाच्या शर्यतीत असल्याची राजकीय वर्तुळातून चर्चा ऐकू येत आहे.यातील भाजपाचे आ.भीमराव केराम शर्यतीत सगळ्यात पुढे असल्याचे सांगण्यात येत आहे.तर भाजपकडूनच मुखेडचे आ. डॉ. तुषार राठोड यांच्या नावाची देखील चर्चा सुरू आहे.



शिवसेनेचे आ.हेमंत पाटील व राष्ट्रवादीचे लोहा चे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नावाची मंत्रीमंडळात वर्णी लागण्याची शक्यता राजकीय निरीक्षकांकडून वर्तविण्यात येत आहे.यामध्ये २०१९ पर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा बालेकिल्ला समजला जाणारा किनवट सारख्या आदिवासी बहुल मतदारसंघात सलग दोन निवडणुकीत भाजपाचा झेंडा फडकावलेले आदिवासी समाजातील अनुभवी आणि विकासाभिमुख दूरदृष्टी लाभलेले भाजपाचे आ. भीमराव केराम यांना आदिवासी समाजाला प्रतिनिधीत्व देण्याच्या दृष्टीने आ.केराम यांची यंदाच्या मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तविण्यात येत आहे.आणि हाच येथील आदिवासी बहुल मागासलेल्या माहूर व किनवट तालुक्यातील जनतेला दिलेला योग्य न्याय असेल यात काहीच शंका नाही.सोबतच राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असलेल्या माहूरला येणाऱ्या कोट्यवधी भाविकांना पुरेपूर सोयीसुविधा उपलब्ध करून देत तिर्थक्षेत्राचा विकास साधण्यासाठी देखील उचित ठरेल.

**किनवट मतदारसंघास २५ वर्षापासून मंत्रीपद नाही : गोपु महामुने**

किनवट-माहूर सारख्या आदिवासी बहुल मागासलेल्या मतदारसंघास गेली २५वर्षा पासून मंत्री पद नाही.ही अत्यंत खेदाची बाब आहे. आता ती खरी वेळ आली आहे.राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची आणि आदिवासी समाजाची बुलंद तोफ, आदिवासींचे फ्रंट नेतृत्व,आदिवासींचा आवाज, आदिवासींची अस्मिता, आदिवासींचा हित जपणारा नेता म्हणजे किनवट-माहूर विधानसभा मतदासंघाचे भाग्यविधाते नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांना मंत्रीपद देऊन आदिवासींचे खांदे बळकट करण्याची नितांत गरज आहे.

**आ. केराम यांना मंत्रीपद देऊन सन्मानीत करावे : अनिल वाघमारे**

राज्याचे नेतृत्व लाडके उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावे अशी तमाम जनतेची भावना असून, एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा बालेकिल्ला समजला जाणारा किनवट मतदारसंघ एकवेळ नाही तर दुसऱ्यांदा गड काबीज केलेले,मतदारसंघात जमिनीवरचा सच्चा कार्यकर्ता तेसर्वसामान्यांसाठी धाऊन येणारा नेता अशी साधे राहणीमान मात्र उच्च विचारसरणी असलेले किनवट माहूर चे आमदार भीमराव केराम यांना मंत्रिपद देऊन सन्मानित करावे आणि भाजपचा हा बालेकिल्ला आणखी मजबूत करावा.

**आ. केरामांना नामदार करण्याची गरज : कांतराव घोडेकर**

मंत्री मंडळ विस्ताराचा मार्ग आता मोकळा झालेला आहे. किनवट येथील प्रचार सभेत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आपल्या भाषणातुन किनवट व माहूर तालुक्याच्या विकास साधण्यासाठी विधानसभेत आमदार म्हणुन भीमराव केराम यांना प्रचंड मतानी विजयी करा असे आवाहन केले होते.झाले ते आमदार आता या मतदारसंघासाठी मंत्रीपद देऊन केराम यांना नामदार करण्याची गरज आहे.

**आ. केराम यांना मंत्रीपद मिळणे काळाची गरज : निर्मला जोशी**

राज्यातील जनतेने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवल्याने राज्यात महायुती बहुमतात आली व त्यासाठी आता राज्यास विकासाचे मॉडेल करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ हवी आहे.त्याकरिता आम्ही सर्व महिला पदाधिकारी व लाडक्या बहिणींनी आई रेणुकेच्या चरणी साकडे घातले आहे. त्याचप्रमाणे किनवट माहुर मतदारसंघ हा अतिदुर्गम डोंगराळ मागासलेला भाग असल्याने येथे उच्च शैक्षणिक सोई सुविधा व उद्योग धंद्यांची वाणवा आहे ते भरुन काढण्यासाठी आमदार भीमराव केराम यांना नामदार होणे गरजेचे आहे म्हणून त्यांना मंत्रिपद मिळणे ही काळाची गरज आहे.

## संक्षिप्त वृत्त



### हजरत टिपू सुलतान जयंती साजरी

**आदमपूर**-मुखेड तालुक्यातील ग्राम खरब खंडगांव येथे थोर भारतीय स्वातंत्र्य सेनानी,शहीद शेर-ए-हिंद हज़रत टिपू सुलतान रहेमतुल्लाह अलैह यांची जयंती सामुहिक साजरी करण्यात आली. प्रारंभी हज़रत टिपू सुलतान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी समाज बांधव आणि गावकरी यांनी एकत्र येऊन गाव परिसरातून वाजत गाजत मिरवणूक काढून जयंती उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी उलेमा वक्फ बोर्ड मुखेड तालुकाध्यक्ष काझी सय्यद सुबानी, शेख साबीर, शेख जावेद, पठाण अनवर खान,नासरखाँ पठाण, तंटामुक्त अध्यक्ष नारायण पाटील जाधव ,माजी सरपंच व्यंकटराव एकाळे, महाराष्ट्र ग्रामीण बँक सहाय्यक महमदरफी मदार, जयंती मंडळ अध्यक्ष सरदार शेख,उपाध्यक्ष माजीद शेख, सचिव हज़रत बालेसाब शेख,कोषाध्यक्ष शाहेद शेख, क्रमवार सदस्य मुजाहिद सय्यद, समीर शेख, मुस्तफा शेख,एजास सय्यद, मदार शेख, शौकत शेख, मुख्तार शेख, बबलू शेख, अली शेख, सैलानी शेख, नबीसाब शेख, रामदास काळे, किशनराव एकाळे, दादाराव पाटील, बालाजी पाटील व गावकरी यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

### निवघा(बा) येथे लहुजी साळवे जयंती साजरी



**निवघा (बा)**-ध्वजारोहण सरपंच शेख इस्माईल व माजी उपसरपंच शाम पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्ष आणि उपस्थित होते यावेळी भव्य दिव्य अशी मिरवणूक करण्यात आली. यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित पत्रकार खानजोडे के अरविंद भोरे के डी पवार दयानंद गायकवाड अनिल काळे विकास मात्रे पत्रकार महेश बोरकर पत्रकार अशोक गव्हाणे संजय वाघमारे कैलास वारुळे पत्रकार कोल्हे संदीप रणखांब सुभाष भांडवले व सर्व मातंग समाजातील समाज बांधव उपस्थित होते.

### जिल्ह्यात पशुगणना सुरु ; नागरिकांनी सहभागी होवून माहिती देण्याचे सहकार्य करावे

**नांदेड**-केंद्र पुरस्कृत पंचवार्षिक २१ वी पशुगणना २५ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत होत आहे. नांदेड जिल्ह्यात या कामासाठी ३०८ प्रगणक व ७९ पर्यवेक्षक यांची नियुक्ती पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आलेली आहे. या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन, पशुधनाची माहिती घेणार आहेत. प्रत्येक गाव व शहरातील प्रगणक नागरिकांशी संवाद साधून माहिती गोळा करणार आहेत. तरी नागरिकांनी या गणनेत सहभागी होऊन योग्य माहिती प्रगणकास देवून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी केले आहे.

# चिकुनगुन्या प्रभावित क्षेत्रास जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली भेट

## प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजनाबाबत केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

देगलूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, मरखेल अंतर्गत पेडपल्ली या गावात २३ नोव्हेंबर २०२४ रोजी चिकनगुनियाचे रुग्ण आढळून आले होते. या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख यांनी नुकतीच पेडपल्ली या ठिकाणी भेट दिली. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष गृहभेटी देऊन, तात्काळ प्रतिबंधात्मक व उपचारात्मक प्रभावी काम कसे करायचे, या बाबतीत आरोग्य कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमेश गवाले यांना आवश्यक त्या सूचना केल्या.





तसेच प्रतिबंधासाठी मरखेलचे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. योगिता चामले, आरोग्य सहाय्यक डी. एल. कुलकर्णी, आरोग्य सेवक ए.एस. खांडरे, आरोग्य सेविका श्रीमती येदगिवार या वैद्यकीय पथकाद्वारे गावात रुग्णांवर उपचार केला जात आहे. चिकनगुनिया हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे. तो विशेषतः एडिस इजिप्ती आणि एडिस अल्बोपिक्टस प्रजातींद्वारे पसरतो. हे डास जेव्हा विषाणूने आधीच संक्रमित व्यक्तीला चावतात तेव्हा ते संक्रमित होतात. विषाणू प्राप्त केल्यानंतर, डास त्यांच्या चाव्याव्दारे इतर मानवांमध्ये पसरवू शकतात.

चिकुनगुनियाची लक्षणे साधारणपणे संक्रमित डास चावल्यानंतर ४ ते ८ दिवसांनी सुरू होतात. सामान्य लक्षणांमध्ये अनेकदा अचानक आणि १०२ओऋ (३९ओउ) पर्यंत पोहोचू शकते. सांध्यामध्ये तीव्र वेदना, विशेषतः हात आणि पाय जे अनेक दिवस टिकू शकतात. सामान्यतः स्नायूत वेदना होतात. सौम्य ते गंभीर डोकेदुखी अत्यंत थकवा आढळून येतो.

चिकनगुनियासाठी रक्ताची तपासणी आजाराच्या साधारणतः एक आठवड्यानंतर करतात. अँटिबॉडीची ही तपासणी चिकनगुनिया आहे की नाही हे सांगू शकते. आरोग्य विभागाकडून प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना केल्या जात असून, चिकुनगुनियाला प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांनी आपल्या घर परिसरात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. दर आठवड्यास शनिवारी कोरडा दिवस पाळावा. घर परिसरात फुटके डब्बे, टाकाऊ टायर्स, कप, मडकी इत्यादीची वेळीच सुयोग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. पाण्याचे साठे झाकणाने घट्ट झाकून ठेवावेत. संडासच्या पाईपला वरच्या टोकाला जाळी किंवा पातळ कपडा बांधावा. तसेच ग्रामपंचायतीने गावातील पाणी साचणारे खड्डे बुजवून घ्यावेत. तुंबलेली नाली व गटारी वाहत्या कराव्यात. चिकुनगुनियाची लक्षणे आढळून आल्यास नजीकच्या आरोग्य केंद्रात उपचार घ्यावेत, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगिता देशमुख यांनी केले.

# शेतकरी ओळख क्रमांकासाठी संकेतस्थळाची निर्मिती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

भारत सरकारची ग्रीस्टॅक संकल्पना राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संकल्पनेनुसार शेतकऱ्यासाठी तीन पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत. शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी या संकेतस्थळाचा णठङ्ग.ाहषी.रसीळीींरलज्ञ.र्सीं.ळप याचा वापर करता येईल. या संकेतस्थळावर करावयाच्या कार्यवाहीचे सादरीकरण दिले आहे. त्यानुसार या संकेतस्थळाचा वापर करुन नागरिकांनी स्वतःचा शेतकरी ओळख क्रमांक करावा. तसेच शेतकरी ओळख निर्माण करण्याची कार्यवाही मोठया प्रमाणात होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणानी प्रचार व प्रसार करावा, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताची आधार संलग्न माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच, भू संदर्भिकृत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच या बाबीचा समावेश यामध्ये असणार आहे. शेतकऱ्यांचा माहिती संच निर्माण करण्यासाठी मोहीम स्वरुपात शेतकरी माहिती संच निर्माण करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत भारत सरकारच्या मदतीने महाराष्ट्र राज्याचा शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी स्वयं नोंदणी संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. या संकेतस्थळाद्वारे शेतकऱ्यांना स्वतःचा शेतकरी ओळख क्रमांक निर्माण करता येईल व शेतकरी माहिती संचात समाविष्ट करता येणार आहे.

# नामदार होणाऱ्या उमेदवाराला पराभूत करणाऱ्या कोहळीकरांना नामदार करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २९ नोव्हेंबर**

पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ हदगाव येथील जाहीर सभेत लातूरातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते यांनी आमच्या उमेदवारास आमदार म्हणून मुंबईत पाठवा त्यांना आम्ही लाल दिव्याच्या गाडीत( नामदार करून ) पाठवु असे मतदारांना जाहीर आवाहन केले होते पण मतदार हे त्यांच्या भूलथापांना बळी न पडता महायुतीचे उमेदवार कोहळीकरांना भरघोस मतांनी निवडून दिले असून आता दोन्ही तालुक्यातील मतदारातून नामदार होणाऱ्या उमेदवाराला पराभूत करणाऱ्या कोहळीकरांना नामदार करण्याची हीच योग्य संधी असल्याचे मागणी जोर धरत आहे तरी कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता दोन्ही तालुक्यातील जनतेसाठी अहोरात्र परिश्रम करणाऱ्या कोहळीकरांना लोकसभेची उमेदवारी चालून आली होती त्याचप्रमाणे नामदार होण्याची संधी आल्यास त्यांच्या रूपाने तालुक्याच्या विकास कामांना नक्कीच वेग येणार असेही या निमित्ताने बोलले जात आहे .



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता संबंध तालुक्यात प्रत्येक गावा-गावात कोणाला कोणत्या बुथवरून किती मतदान झाले. गावाच्या पुढारीने किती आघाडी दिली याचा निष्कर्ष काढण्यात जनता व्यस्त आहेत तरी सर्व समाजातील लोकांनी महायुतीच्या पारड्यात मतदानुरूपी भरभरून आशीर्वाद दिले असा निष्कर्ष आता निघत असताना त्याच वेळी एक चर्चा दोन्ही तालुक्यातील जनतेत मोठ्या प्रमाणावर होत आहे की महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ लातूर येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते यांनी इथल्या उमेदवारांना विजयी केल्यानंतर मुंबईत पाठवा त्यांना आम्ही नामदार करून पाठवू असे जाहीर आव्हान केले होते पण त्यास तालुक्यातील जनतेने सपशेल नाकारून महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून दिले तरी जनता आता अशी मागणी करते की, बाबुराव कदम कोहळीकर यांना न मागताच लोकसभेचे तिकीट भेटले त्याचप्रमाणे मंत्रिमंडळात समावेश व्हावा अशी अपेक्षा मतदार बाळगून आहे तरी नामदार होणाऱ्या उमेदवारास पराभूत करणे म्हणजे ते पण नामदारच आहेत अशी चर्चा देखील या निमित्ताने होत आहे.

# संविधान दिनानिमित्त रॅली



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

संविधान दिनानिमित्त दि.२६ नोव्हेंबर रोजी हि रली महात्मा ज्योतिबा फुले पुतळा पासून ते डा.बाबासाहेब आंबेडकर पर्यंत या रलीची समाप्ती करण्यात आली.सदरिल रलीत डा.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त संस्था अल ईम्रान प्रतिष्ठाणचे सचिव ईजि.ईम्रान खान व संस्थेचे ईतर सदस्य, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, तरुण, तरुणी, महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त गिरिष कदम, स.आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी हिरवी झेंडी दाखवून संविधान रलीची सुरुवात केली. समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन उपस्थित नागरिकांकडून करुन घेतले. संविधान घरोघरी व प्रत्येक तरुणाला संविधान कळावे यासाठी संविधानची प्रतिज्ञा घेण्यात आली.सदरिल रलीत समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, चंदा रावळकर, भगवान ढगे, समतादुत शे.ईरशद, दवणे, दुगाने, निरिक्षक मोरे आदिंची उपस्थिती होती.

# मागच्या काळात कधी जातीवाद केला नाही, भविष्यात पण जातीवाद करणार नाही : आ. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. २९ नोव्हेंबर**

मी निवडून आलो हे कार्यकर्त्यांच्या मेहनतीचं फळ आहे या निवडणुकीत जातीपातीचे मोठ्या प्रमाणात राजकारण झाले अनेकांनी जातींची फॅक्टरी चालवली जातीच्या फॅक्टरमध्ये काही जणांना यश ही मिळालं एवढ्या जातीपातीच्या राजकारणात पहीलं कधी निवडणूक झाली नाही कोणी जातिवाद केला तरी मी भविष्यात जातिवाद करणार नाही माझ्यासोबत सर्व जाती धर्माची मंडळी आहेत मी पहिले कधी जातिवाद केला नाही आणि भविष्यातही करणार नाही असे नवनिर्वाचित आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी कंधार शहरातील संपर्क कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना केले.



राष्ट्रवादी आणि महायुतीचे विजयी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी विजयाच्या सर्व शिल्पकारांचे अभिवादन करण्यासाठी आणि त्यांचे आभार मानून आगामी काळातील ध्येय धोरणे ठरविण्यासाठी कंधार शहरात आगमन केले असता शहरात जंगी स्वागत करण्यात आले शहरासह तालुक्यात अनेकांनी फुलांचा वर्षाव तर जेसीबीने मोठ-मोठे हार ढोल ताशांचा गजरात स्वागत करण्यात आले शहरातील बडी दर्गाला चादर चढवून साधू महाराज मठ संस्थानचे दर्शन घेत बौद्ध द्वार येथील आयोजित कार्यक्रमात बुद्ध विहारात उपस्थिती दर्शविली शहरातील सर्व महामानवांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

शहरात मोठी दर्गा येथे चादर चढवून आशीर्वाद घेतला यावेळी जफरोदीन बाहोदीन, समीर चाऊस, शेख आसिफ , शेख मजर, शेख मनू, शेख अमजद यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर साधू महाराज मठ संस्थान येथे मधुकर डांगे, व्यंकट मामडे, बाळू महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत साधु महाराज मठ संस्थान येथे दर्शन घेतले तिथून बुद्ध विहारात आयोजित कार्यक्रमास उपस्थित दर्शविली राजू कोकाटे, हनुमंत डुमणे, सुनील बापूराव कांबळे यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला. छत्रपती शिवाजी चौकात स्वप्निल पाटील लुंगारे आणि धनराज लुंगारे यांनी स्वागत केले त्यानंतर भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर पिंटू कदम, अनिता कदम, सुनील कांबळे आदींनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले अभिवक्ता संघातर्फे ड .दिगंबर गायकवाड यांनी स्वागत केले त्यानंतर खयूम शेठ, मुजीब सेठ, नगरसेवक बालाजी पवार, चेतन केंद्रे, बालाजी पवार, पैलवान बालाजी पवार, माधव गुंजाळे, दत्तात्रय चंदनफुले, व्यंकट नागलवाड महेश मोरे, कैलास कांबळे विकास कांबळे, मनोज कांबळे, हनुमंत मळगे, उत्तम पाटील जाधव, व्यंकट पाटील जाधव, केशव पाटील जाधव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय कंधार येथे कीशन डफडे, भगवान राठोड, बाळासाहेब गर्जे यांच्या प्रमुख उपस्थितीत जंगी स्वागत करण्यात आले बस स्थानका समोर गंगाधर कांबळे, सुनील कांबळे तर भीमगड येथे मामा गायकवाड यांनी स्वागत केले.

आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे त्यांच्या संपर्क कार्यालयात व्हॉइस ऑफ मीडिया कंधारचे तालुकाध्यक्ष सय्यद हबीब, उपाध्यक्ष मारुती चिलपिपरे सचिव विनोद तोरणे ,कार्याध्यक्ष माधव गोटमवाड , सहसचिव संतोष कांबळे, प्रसिद्धी प्रमुख उमर शेख, ज्येष्ठ पत्रकार दयानंद कदम आदींनी पुष्पहारासह साईबाबा यांची मूर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला.

# शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर विशेष मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

कृषि विभागामार्फत राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक योजनेअंतर्गत अनु. जाती व अनु. जमाती संवर्गाच्या शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर ३० नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधीत विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजने अंतर्गत लाभ देण्यात येणाऱ्या ठिबक व तुषार सिंचनाबाबत तालुकास्तरावर, मंडळस्तरावर व तसेच गावोगावी माहिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यात अनु. जाती व अनु. जमाती संवर्गातील शेतकऱ्यांसाठी लक्षांक उपलब्ध असून लक्षांका पेक्षा कमी अर्ज प्राप्त झालेले आहे. तरी जिल्ह्यातील अनु. जाती व अनु. जमातीच्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा व अधिकच्या माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी केले आहे.

**नगर पंचायत,कार्यालय अर्धापुर ता.अर्धापूर जि.नांदेड**

ई-मेल :- ardhapurcogmail.com फोन नं. (०२४६२) २७२१०९

जा.क्र. अनपं/आस्था/ ४००५/२०२४ दिनांक. २९/११/२०२४

**अर्धापूर नगरपंचायत अर्धापूर जि. नांदेड**

**जाहीर आवाहन २०२४-२०२५**

अर्धापूर नगरपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. ७१ / २०१३ मधील दिलेल्या निर्देशानुसार अर्धापूर नगरपंचायत हद्दीतील मुख्य रस्ते व इतर रस्ते यावरील खड्डे, मॅनहोल्स व रस्ते खुदाईबाबतच्या तक्रारी http://mahaulb.in या संकेतस्थळावर नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचेमार्फत विकसित करणेत आलेल्या Integrated Web Based Portal (IWBP) प्रणालीवरील तक्रार मोड्यूलचा वापर करून तसेच ardhapurcogmail.लो व फोन क्रमांक (०२४६२) २७२१०९ व टोल फ्री क्र. १८००२३३२१०९ याव्दारे अर्धापूर नगरपंचायतकडे तक्रार दाखल करता येईल.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगरपंचायत अर्धापूर जि. नांदेड

# आ.संदीप क्षीरसागरांचा होणार भव्य नागरी सत्कार

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे नागरी सत्कार समितीकडून आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ नोव्हेंबर**

बीड विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार संदीप क्षीरसागर यांचा भव्य नागरी सत्कार बीड येथे रविवारी (दि.१) रोजी होणार असून याप्रसंगी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नागरी सत्कार समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील एकमेव निष्ठावंत आमदार संदीप क्षीरसागर यांची तब्बल दुसर्यांदा आमदार पदी जनआशिर्वादाने निवडून आले आहेत. अनेक अडचणी, दबाव, संकटे यांना न जुमानता आ.क्षीरसागर आपल्या आणि पक्षांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिले. याचेच बक्षीस म्हणून बीडच्या जनतेने आ.संदीप क्षीरसागरांना दुसर्यांदा विधानसभेत पाठवून प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. आ.संदीप क्षीरसागर दुसर्यांदा आमदार झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी बीड शहर नागरी सत्कार समितीच्या वतीने रविवारी (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे सकाळी ११ वा. भव्य नागरी सत्कारा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मायबाप मतदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा असे आवाहन नागरी सत्कार समितीकडून करण्यात आले आहे.

# युवकांनी नवं नवीन उद्योगात उतरावे-राजेंद्र मस्के



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ नोव्हेंबर**

वाढती बेकारी आणि नोकऱ्यांचा तुटवडा लक्षात घेता तरुणांनी व्यवसाय उद्योगाकडे वळावे. गरज ही शोधाची जननी असून युवकांनी आपल्या परिसरात जनतेला आवश्यक असणाऱ्या विविध गरजांचा अभ्यास करून नव नवीन उद्योगात उतरून स्वावलंबी झाले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे नेते, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मोहिनिनाथ अर्थमुहर्स शुभारंभ प्रसंगी व्यक्त करून, उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व विलास काकडे यांना शुभेच्छा दिल्या.


बोरफडी गावचे उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व जरुड येथील युवा कार्यकर्ते विलास काकडे यांनी जेसीबी (पोकलेन) मशीनच्या माध्यमातून नवीन व्यवसायाला सुरवात केली. आज जरुड फाटा येथे मोहिनिनाथ अर्थमुहर्सचा शुभारंभ गोरक्षनाथ टेकडीचे महंत नवनाथ बाबा महाराज, भवानीगड संस्थानचे महंत अखंडानंद गिरी महाराज, जरुड संस्थानचे महंत नवनाथ महाराज यांच्या शुभहस्ते व शेतकरी मित्र राजेंद्रजी मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

## आठरा पगड जातीचा माजलगांवचा देव खंडोबा

# चंपाष्टी निम्मित मंदीरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ नोव्हेंबर**

शहरातील पुरातन सर्वांचे कुलदैवत व आराध्य दैवत जागृत देवस्थान श्री. खंडोबा मंदीरात २९ नोव्हेबर शुक्रवार रोजी भक्तांचा उपस्थित घटस्थापना करण्यात आली व यात्रे ला प्रारंभ करण्यात आला आहे. चंपाष्टी यात्रा निम्मित मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे चे आयोजन केले आहे.तरी सर्वा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा आसे अवाहन तुम्ही आम्ही सर्व भक्तजनाने केले आहे.



एके काळी माजलगांव मध्ये आपल्या सर्वांचे कुलदैवत असलेले श्री खंडोबा मंदीर खंडोबा मैदानात. पाय ठेवायला जागा पुरत नव्हती एवढी मोठी खंडोबा यात्रा. भरत होती आता जागेच्या आभावीमुळे थोड्या प्रमाणात खंडोबा यात्रा भरते. पुरातन दगडी चिरेपासुन माजलगांवच्या खंडोबा मंदिर बनवलेले होते. तेच दगडी चिरे आज भी जशा तशे आसुन.मंदीराच्या आत मधील गभारात चिर किवां छिद्र सुध्दा दिसणार नाही आस मजबुत दगडी चिरेच्या बाहेरच्या लगत नवीन बांधकाम केलेले आहे.माजलगांव चे पुरातन खंडोबा मंदीर है ७० वर्षोंच्या पुढचे आहे. खंडोबाच्या समोरचा नंदी सुध्दा पन्नास वर्षाच्या पुढचा आहे. आजुक सुध्दा जसा तसा आहे. या खंडोबाच्या नंदीच वजन जास्त आहे. पाच जनाला सुध्दा उचलत नाही.श्री खंडोबा देव , म्हालसांदेवी व बानुदेवी या देवाच्यां मुर्ती साक्षात भूतलावर आवतरल्या सारख्या वाटतात.

२९ नोव्हेबर रोजी मंदीरात घटस्थापना , ६ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजता २१०० दिपोत्सवचा कार्यक्रम , ७ नोव्हेबर रोजी चंपाष्टी निम्मित ५ वाजता सकाळी देवाचा महाभिषेक ला सुरुवात होईल सकाळी ७ वाजता खंडोबा मल्हासादेवी ,बाणुदेवी यांचा विवाहचा कार्यक्रम ,व महाआरती सहीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे तरी भाविक भक्तानी धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन तुम्ही आम्ही सर्व भक्तजनाने केले आहे

खंडेरायाला रेवड्या व भंडाराची उधलन

माजलगांवच्या खंडोबाला चंपाष्टी दिवशी माजलगांवतील आठरा पकड जाती चे भाविक खंडोबा मंदीरात येऊन. सदानंदाचा येळकोट येलकट जय मल्हार चा गजरात रेवड्या भंडाराची उधलन होते. रेवड्या व भंडारा मंदिरावर उधलेला भक्तजन प्रसाद म्हणून घेतात. व आपल्या कपाळावर भंडारा लावतात.

घरोघरी तली भंडारा

माजलगांव शहरातील भाविक आपल्या घरी चंपाष्टी दिवशी. देवाच्या ताब्यांचे कोंटुबाची पुजा करून. वाग्यांचे भरीत, बाजरीची भाकरी, काद्यांची पात. इत्यादी पदार्थाचा नैवेद्य. ठेवुन पाच वेळा सदानंदाचा येळकोट येलकट जय चा गजर करुन. तली भंडारा कार्यक्रम होतो. व वागीं व कांदा खानाची परवानगी मिलते

# अंबाजोगाईत मोबाईल हिसकावुन नेणारी टोळी जेरबंद;स्थानिक गुन्हे शाखा बीडची उल्लेखणीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ नोव्हेंबर**

अंबाजोगाई शहरात मोटार सायकल वर येवुन पाई जात असलेल्या व्यक्तीचे मोबाईल हिसकावुन नेवुन चोरी करणारी टोळी सक्रिय झाली होती दरम्यान दोन गुन्हयांची नोंद पो.स्टे.अंबाजोगाई शहर ठाण्यामध्ये नोंदविण्यात आली होती. सदर चोरीचे अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण करुन स्थागुशा बीड येथील पोउपनि सुतळे यांना याकामी पाचारण केले. पोउपनि सुतळे यांनी दिनांक २८/११/२०२४ रोजी अंबाजोगाई शहर आरोपी शोध घेत असतांना गुप्त बातमी मिळाली की, निखील लक्ष्मण घाडगे रा.दौनापुर याचेकडे चोरीचा १० प्लस मोबाईल असुन तो मुकूंदराज सभागृह समोर आहे अशी खात्रीशिर माहिती मिळाल्यावरुन स्था.गु.शा.पथकाने तात्काळ रवाना होवुन नमुद ठिकाणावरुन निखील लक्ष्मण घाडगे व त्याचे दोन मित्रांसह मिळुन आला. निखील यास मोबाईल संदर्भात विचारपुस करता त्याने त्याचे इतर दोन मित्र (अल्पवयीन) यांचेकडुन घेतला असल्याने कळविले. दोन अल्पवयीन इसमांना मोबाईल बद्दल विचारपुस केली असता त्यांचेकडुन अंबाजोगाई शहर २५८/२०२४ कलम ३९२,३४ या गुन्हयातील गेलामाल मिळुन येवुन त्यांची संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्यांचेजवळ



एक आय फोन १६ प्रो कं. मोबाईल मिळुन आला असुन सदर मोबाईल त्यांनी पाई जाणाऱ्या पादचाऱ्याचा हिसकावुन चोरी केला होता अभिलेख पाहता अंबाजोगाई शहर येथे गुरनं ४६१/२०२४ कलम ३०४(१) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हयाची नोंद मिळुन आली. त्यानंतर त्यांचे ताब्यात दोन विनानंबरच्या दोन होंडा शाईन मोटार सायकली मिळुन आल्या अभिलेख पाहता १) पो.स्टे.यु.वडगाव गुरनं १७३/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. व पो.स्टे.परळी ग्रामीण गुरनं २३०/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हयात चोरी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपी निखील लक्ष्मण घाडगे वय २० वर्षे रा.दौनापुर ता.परळी हा जबरी चोरीचे गुन्हयात निष्पन्न झाला व दोन विधीसंघर्षग्रस्त बालके त्याचे इतर एक मित्रासह जबरी चोरी व मोटार सायकल चोरी अशा चार गुन्हयात निष्पन्न झाल्याने त्यांचे कडुन चोरीचे दोन मोबाईल व दोन चोरीच्या मोटार सायकली व गुन्हा करण्यासाठी वापरलेले स्पेंडर मो.सा. असा एकुण २,१०,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नमुद आरोपींना पो.स्टे.अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास अंबाजोगाई शहर करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख, पो.नि.श्री. धिरज घोळवे अंबाजोगाइ शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, श्रेपोउपनि हनुमान खेडकर, पोह/ मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, राजु पठाण, अश्विनकुमार सुरवसे, चालक नितीन वडमारे, यांनी मिळुन केली आहे.

# अंबाजोगाईच्या गोदामातील धान्याला पाय फुटले

## गरीबांना मिळणारे मोफत धान्य कोणाच्या घशात
## पन्नास किलोच्या तांदळाच्या पोत्यात निघाले चाळीस किलो

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ नोव्हेंबर**

येथील शासकीय गोदामात आलेल्या गहू व तांदळाला कट्ट्यागणीस दहा किलोला पाय फुटल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाला कोणाच्या पाठबळ आहे. हा संशय व्यक्त केला जात आहे. स्वस्त धान्य दुकानदारांच्या दिलेल्या धान्यातून पोत्यातून माल कसा गायब होतो. याकडे तहसीलदार व उपजिल्हाधिकारी लक्ष देणार का? याकडे लक्ष लागले आहे.



शासनाच्या वतीने गरीब नागरिकांना मोफत गहू व तांदळाचे वाटप कर्ते परंतु गरीबासाठी आलेले धान्य पोत्यातून गायब होवू लागले आहे. अंबाजोगाईच्या गोदाम रक्षक म्हणून एस.आर.बलुतकर यांची ऑर्डर झालेली असतानाही तहसीलदाराच्या आशिर्वादाने दुसर्याच व्यक्तीला या गोदामात बसविले आहे. त्यामुळे या गोदामात सध्या सावळा गोंधळ सुरू आहे. शासनाकडून पन्नास किलोच्या पोत्यामधील दहा किलो धान्य गायब होत असून हे धान्य कोणाच्या घशात जात आहे. हा संशयाचा विषय आहे. शासकिय धान्य घोटाळ्यात बीड पासून स्थानिक पातळीपर्यंत यंत्रणा बरबटली असून याकडे कोणी लक्ष देणार का? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. शासनाकडून नियमाप्रमाणे एका पोत्यामध्ये पन्नास किलो धान्य व पाचशे ग्रॅम पोत्याचे वजन क्रम बाह्य आहे. परंतु अंबाजोगाईच्या गोदामातून चाळीस किलो धान्य व पोत्याचे २४० या प्रमाणे धान्य स्वस्त धान्य दुकानदाराला वाटप होत आहे. आज शुक्रवारी अंबाजोगाई तालुक्याती येल्डा येथील ग्रा.प.कार्यालया अंतर्गत असलेल्या स्वस्त धान्य दुकानदाराला दिलेले धान्य पोत्यासह काट्यावर मोजमाप केले असता. चाळीस किलो धान्य निघाले. उर्वरीत दहा किलो धान्य कोणाच्या घशात गोदाम रक्षक घालित आहे. याची चौकशी करणे गरजेचे आहे. अंबाजोगाईतील सावळ्या गोंधळाकडे जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी चौकशी करणार का? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे.

# जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा वाळू माफीयांना पुन्हा एकदा दणका

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ नोव्हेंबर**



बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी नुकतीच वाळू माफीयांविरोधात कारवाई करत दोन हायवा जमा केल्या . यामुळे महसूल अधिकारी व कर्मचारी हे सतर्क झाल्याचे दिसून येत आहे . त्याचाच भाग म्हणून बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , त्यांचे अधिनस्त नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर हे दिवस रात्र गस्त घालत असून वाळू चोरीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे.

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी दि. २८ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह पथक प्रमुख नायब तहसीलदार प्रशांत जाधवर व पथकाने पाली येथून केजकडे जात असताना नेकनूर रोडवर मांजरसुब्याजवळ अंदाजे ५ ब्रास अवैध वाळू वाहतूक करणारा एल पी ट्रक MH23-U0449 पकडून पोलीस स्टेशन नेकनूर यांचे ताब्यात दिला . सदर वाहनावर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही करण्यात येईल असे तहसीलदार यांनी सांगितले . या वाहनाचे मालक प्रशांत नवले , राहणार पाली , तालुका जिल्हा बीड हे असून, ड्रायव्हर उमेश नेमाने हा आहे.

या कार्यवाहीमध्ये मंडळ अधिकारी अशोक डरपे , मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे , पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग जंघाळे , तलाठी विकास ससाणे , तलाठी संजय नेवडे , तलाठी अनिल गायकवाड , तलाठी कृष्णा रत्नपारखी , तलाठी अक्षय शिंदे , महसूल सहायक अमोल डोंगरे यांचाही सहभाग होता.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी अशाच प्रकारच्या कारवाया जिल्हाभर सुरू ठेवण्याबाबत सर्व संबंधित विभागांना सुचित केलेले आहे.कोणीही अनधिकृत रित्या गौण खनिजाची वाहतूक करू नये तसेच नागरिकांनी सुद्धा अशा प्रकारची गौण खनिजाची अवैध वाहतूक होत असल्यास त्याबाबत संबंधित महसूल अधिकारी पोलीस अधिकारी यांना तात्काळ कळवावे असे बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांची हयगय केली जाणार नाही, असा इशारा दिलेला आहे.अवैधरित्या गौण खनिजाची म्हणजेच वाळू , मुरूम यांची वाहतूक करणारी वाहने दिसल्यास अथवा साठे आढळून आल्यास त्याची माहिती संबंधित मंडळ अधिकारी , तलाठी , पोलीस अधिकारी , पोलीस पाटील यांना तात्काळ द्यावी आणि नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे असे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केलेले आहे.

# बिबट्याला जेरबंद करण्यासाठी टीम सक्रिय : 'त्या' शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यासाठी कार्यवाही सुरु – विजया शिंगोटे


**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ नोव्हेंबर**

अंबाजोगाई तालुक्यातील काही भागात बिबट्याने धुमाकूळ घातला असून त्याच्या वावराने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. पुस – जवळगाव, ममदापूर – पाटोदा या नंतर आता बिबट्याने माकेगाव परिसरात मोर्चा वळवला आहे. माकेगाव येथील शेतकरी रवि देशमुख यांच्या शेतातील बैलाचा बिबट्याने फडशा पाडला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी त्याचा शोध घेत आहेत, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

या संदर्भात वन विभागाच्या अधिकारी विजया शिंगाटे यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी सांगितले की, अंबाजोगाई तालुक्यातील पुस – जवळगाव भागातील ग्रामस्थांनी बिबट्याची माहिती दिल्यानंतर आम्ही त्या परिसराला भेट देऊन त्या ठिकाणची पाहणी केली आहे. या पाहणीत आम्हाला बिबट्याचे ठसे आढळून आले आहेत. त्यानंतर काल रात्री ममदापूर – पाटोदा परिसरातील ग्रामस्थांनीही बिबट्याच्या वावराची माहिती दिली. त्याही भागात आम्ही काल रात्रीच पेट्रोलिंग करत पाहणी केली आहे. तसेच या परिसरातील ग्रामस्थांना सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

पंचनामा करताना वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी

दरम्यान, आज सकाळी माकेगाव परिसरातील रवि देशमुख यांच्या शेतातील बैलाचा बिबट्याने फडशा पाडला असल्याची माहिती मिळाली. आम्ही लागलीच त्या ठिकाणी आमची टीम घेऊन गेलो आणि सदरिल घटनेचा पंचनामा केला. त्यासोबतच पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही सदरिल घटनेचा पंचनामा करीत 'त्या' बैलाचे शवविच्छेदन केले आहे. यात बिबट्यानेच त्याचा फडशा पाडला असल्याचं उघडकीस आले आहे. त्यामुळे आम्ही बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पावले उचलली आहेत. त्यासाठी आम्ही या



परिसराची पाहणी केली असून राडी शिवारात बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावणार आहोत. तसेच माकेगाव येथील शेतकरी रवि देशमुख यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कार्यवाही सुरु केली असल्याचे विजया शिंगाटे यांनी आमच्याशी बातचीत करताना सांगितले.

ग्रामस्थांना सतर्कता बाळगण्याचे आवाहन

अंबाजोगाई तालुक्यातील पुस – जवळगाव, ममदापूर – पाटोदा या भागात ऊसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून या ठिकाणी लपण्यासाठी बिबट्याला पाहिजे तशी जागा आहे. त्यामुळे निश्चितच तो या ठिकाणी वावरत असणार आहे. शेतकऱ्यांनी शेतात जाताना एकटं जाऊ नये, त्यासोबतच शेतात राहणाऱ्या ग्रामस्थांनी लहान मुलांना एकटं सोडून नये, शेतात फिरताना जमावाने जावं आणि सोबत लाकडी काठी किंवा इतर साहित्य घेऊन जावं. पुस – जवळगाव, ममदापूर – पाटोदा या भागातील ग्रामस्थांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करीत बिबट्या दिसताच वनविभागाला कल्पना द्यावी, असं आवाहनही वन अधिकारी विजया शिंगाटे यांनी केले आहे.

# देशातील सर्वांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला करणाऱ्या महात्मा फुलेंचा वारसा पुढे नेणे गरजेचे-जगताप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ नोव्हेंबर**

तत्कालीन संकटांना सामोरे जाऊन स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी पुढाकार घेणारे महात्मा ज्योतिबा फुले हे खऱ्या अर्थाने समाज नायक होत. केवळ स्त्रीयांनाच नाही तर देशातील सर्वांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला करणाऱ्या महात्मा फुलेंचा वारसा पुढे नेणे गरजेचे आहे. शिक्षणाशिवाय समाजोपयोगी अनेक गोष्टींसाठी त्यांनी कार्य केले याचा ही अभ्यास आपण केला पाहिजे. असे प्रतिपादन उमेश जगताप यांनी केले. स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात महात्मा फुले स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते.



यावेळी विषय मांडणी करताना सौ. गौरी डावखरे यांनी महात्मा फुलेंचा जीवन पट विद्यार्थ्यांसमोर मांडला व त्यांच्या कार्याचे स्मरण केले.यावेळी कुमारी अमृता वडमारे हिने महात्मा फुले यांच्यावर आपले विचार व्यक्त केले.यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेशजी जगताप, अभ्यास पूरक प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर, सौ. गौरी डावखरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सूत्रसंचालन सौ स्मिता नरहरे यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## रेल्वे प्रवाशाच्या हातावर मारून मोबाईल लांबविणाऱ्यास एक वर्षाची शिक्षा

छत्रपती संभाजीनगर : रेल्वेच्या डब्यात दरवाज्याजवळ बसलेल्या प्रवाशाच्या हातावर मारून मोबाईल चोरल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात दोषारोपपत्र सादर करण्यात आले. या प्रकरणावर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने आरोपीस १ वर्षे सक्षम कारावास व दहा हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सचिन विजय आठवले हे ९ जून २०२४ रोजी तपोवन एक्स्प्रेसने छत्रपती संभाजीनगर ते मुंबई असा प्रवास करत होते. रेल्वेच्या जनरल डब्यात दरवाज्यात बसून ते प्रवास करत होते. छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्टेशनवरून रेल्वे सुटल्यानंतर ओव्हरब्रिजच्या पुढे रेल्वे निघाल्यानंतर स्पीड कमी असताना पटरीच्या बाजूला उभे असलेल्या अज्ञाताने त्यांच्या हातावर वार केला. यात त्यांच्या हातातील ६० हजार रूपयांचा मोबाईल खाली पडला. तो मोबाईल चोरीला गेल्याप्रकरणी त्यांनी लोहमार्ग पोलिसांकडे तक्रार केली.

त्यांच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल झाला. रेल्वे प्रवास करताना प्रवाशांना अशा प्रकारे लुटण्याच्या तक्रारीत वाढत होत असल्याने प्रभारी लोहमार्ग पोलिस अधिकारी शरद जोगदंड, तत्कालीन प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश दळवी, तपासी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सविता तांबे, पथकातील सहायक फौजदार दिलीप लोणारे, पोलीस शिपाई बबन शिरसाठ, अमोल शिरसाठ यांनी तपासाची चक्रे फिरवली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास करून शिताफीने व तांत्रिक माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून शेखर मिलिंद चव्हाण (वय.२५, रा. राजीवनगर, छत्रपती संभाजीनगर) यास ताब्यात घेतले. आरोपीविरूध्द रेल्वे कोर्ट, छत्रपती संभाजीनगर येथे दोषारोपपत्र सादर केले. त्याच्यावर सबळ पुरावे असल्याने सुनावनी दरम्यान रेल्वे कोर्टच्या प्रथमवर्ग दंडाधिकारी यांनी आरोपीस वरीलप्रमाणे शिक्षा दिली.

## रोपळेकर चौकात भरधाव हायवाने स्कुटीला उडवले, मुलगा जागीच ठार

### हायवा चालक ताब्यात

छत्रपती संभाजीनगर : वाळू वाहतुकीच्या भरधाव हायवाने स्कुटीवर जाणाऱ्या स्कुटीचालकाला चिरडले. ही घटना आज (दि.२९) सकाळी साडे दहा वाजेच्या सुमारास रोपळेकर चौकाजवळ घडली. या अपघातात स्कुटीवरील १६ वर्षीय मुलगा ठार झाला तर दुसरा किरकोळ जखमी झाला आहे. फैजल अब्दूल रहेमान शेख रा. शहागंज असे ठार झालेल्या तरूणाचे नाव आहे. अपघाताची माहिती समजताच जवाहरनगर पोलिसांनी

तात्काळ धाव घेत जखमींना घाटी रुग्णालयात दाखल केले. हायवा चालक राजेंद्र कचरू पेटारे (वय ३२) रा. चिंचोले ता. फुलंब्री याला जवाहरनगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी जवाहर



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत फैजल हा त्याच्या भाच्यासह सकाळी साडे दहा वाजेच्या सुमारास अमरप्रित चौकाकडून शहानूरमियों दर्गाकडे स्कुटीवरून जात होता. त्याचवेळी अमरप्रित चौकातून वाळू वाहतुकीचा हायवा (क्र. एमएच २० ईएल ४७२३) भरधाव वेगाने त्याच दिशेने जात होता. रोपळेकर चौकाजवळ येताच भरधाव हायवाने फैजलच्या स्कुटीला पाठीमागून

जोराची धडक दिली. या अपघातात फैजल मागच्या चाकाखाली आला. अपघाताचा आवाज ऐकताच रस्त्यावरील नागरिकांनी तात्काळ हायवाला रोखले. त्याचबरोबर जवाहर नगर पोलिसांनीही अपघाताची माहिती दिली. जवाहर पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरिक्षक शेरमळे यांच्यासह पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी गंभीर जखमीला वाहनाच्या बाहेर काढले. तर स्कुटीही बाजूला केली. या अपघातात फैजल शेख गंभीर जखमी झाला. पोलिसांनी दोन्ही जखमींना घाटी रुग्णालयात दाखल केले.

### नऊ वाजेनंतर हायवा रस्त्यावर कसा...?

दरम्यान, सकाळी नऊ वाजेनंतर शहरात जड वाहतुकीला बंदी आहे. असे असताना वाळू वाहतुकीचा हायवा शहरात कसा आला, असा सवाल आता उपस्थित होत आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सदर हायवा स्मार्ट सिटीचा असल्याचे समजते.

## वेळेवर आग विझवल्याने नुकसान टाळले



तभा वृत्तसेवा

पैठण, दि २९ :- पैठण शहराजवळील महावीर चौक परिसरात असलेल्या शेखर पाटील यांच्या शेतातील ऊसाला आग लागली असता नगर परिषद अग्निशमन दलाच्या वतीने काही वेळातच आग विझवल्याने आगीमुळे ऊसाचे होणारे नुकसान टळले.

शुक्रवारी दुपारी सव्वादोन वाजेच्या दरम्यान गोलनाका परिसरात असलेल्या पाटील यांच्या शेतातील जवळपास ५ एकर ऊस पेटल्याची घटना घडली.यावर पाटील यांच्या मुलाने पैठण नगर परिषद अग्निशमन विभागाला आगीची माहिती दिली असता मुख्याधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे यांच्या मार्गदर्शनाखाली फायर ऑफिसर सचिन वळुंज,दल प्रमुख खलील धांडे, अमोल शेजुळ या अग्निशमन दलाने काही मिनिटांतच अग्निशमन वाहनासह घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणली. यामुळे आगिने ऊसाचे होणारे नुकसान टळले.ऊसाला आग नेमकी कशामुळे लागली याचा शोध घेतला जात असून आग विझवल्याने नगर परिषद अग्निशमन दलाचे अभिनंदन होत आहे.

## कन्नड बाजार समिती मध्ये शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून फसवणूक

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२९ नोव्हेंबर - तालुक्यातील शेतकऱ्यांनी कन्नड येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये विक्रीस आणलेल्या मका या शेतमालाला लिलावात एक भाव तर गोडाऊन वर कमी भाव देण्याचा प्रकार घडला आहे.संबंधित व्यापाऱ्यावर शेतक ऱ्याची फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख संजय मोटे यांनी उपविभागिय अधिकारी तसेच सहाय्यक निबंधक (सहकार) यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. बद्रीनाथ धर्म राठोड असे शेतक ऱ्याचे नाव असून त्यांनी गुरुवारी (दि.२८) रोजी स्वमालकीचे मका विक्रीसाठी कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड येथे घेऊन आले. नियमानुसार आलेल्या सर्व मालाचा मॉयश्चर ( दमटपणा) पाहून लिलाव करण्यात आला.

लिलावात या शेतकऱ्याच्या मकास दक्ष ट्रेडिंग कंपनी कडून या मकास १ हजार ९७५ रुपये क्विंटल भाव देण्यात आला व तशी लिलाव झाल्याची पावती देण्यात आली. सदर मका ट्रॅक्टर दक्ष ट्रेडिंग कंपनीने महामार्गावरील त्यांच्या गोडाऊन येथे वजन करून खाली करण्याचे सांगीतले. सदरील शेतकरी शेतमाल गोडाऊनवर घेऊन गेले असता कंपनीचे कर्मचारी व मालक यांनी मकाचे मॉयश्चर ( दमटपणा) कमी असल्याचे सांगत १ हजार ८०० रुपये प्रती क्विंटल प्रमाणे भाव देऊ असे सांगीतले. परंतु शेतकऱ्याने लिलावा प्रमाणे भाव देण्याची मागणी केली. परंतु शेतकऱ्यास दमदाटी करून उतरवलेला माल परत ट्रॅक्टर मध्ये भरून अपमानास्पद वागणूक देत हाकलून दिले. अशा प्रकारे कृषी उत्पन्न बाजार समिती व खरीददार आडते यांच्या मध्ये संगणमत आहे व संगणमताने सर्व सामान्या शेतकऱ्यांची लुटमार व हेळसांड करीत आहे. हा प्रकार कुठेतरी थांबला पाहिजे करिता सदरील शेतकऱ्यावरील अन्याय दूर करण्यासाठी सदरील व्यापारी व बाजार समिती यांची चौकशी करून त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा व परवाना रद्द करावा नसता लोकशाही मार्गाने न्याय भेटला नाही तर उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे करण्यात आला आहे. या निवेदनावर संजय मोटे, बद्रीनाथ राठोड, रामेश्वर बोरसे, नवनाथ राठोड आदी शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

## जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीसाठी दरपत्रके मागविण्यात

छत्रपती संभाजीनगर,दि.२९ (जिमाका)- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा माहिती कार्यालयातील जुनी वृत्तपत्राची विक्री करावयाची असल्याने त्यासाठी वृत्तपत्र रद्दी खरेदी विक्रीदार यांच्याकडून बुधवार दि. ४ डिसेंबर २०२४ सायंकाळी ५ वाजेपर्यंत दरपत्रके मागविण्यात येत आहे. वृत्तपत्र रद्दी पाहणी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत करता येईल. रद्दी विकत घेऊ इच्छिणा-यांनी जिल्हा माहिती कार्यालय, दुसरा मजला, ग्रंथालय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष भेट देऊन रद्दीची पाहणी करावी व दरपत्रक सादर करावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी यांनी केले आहे.

## सविता क्षीरसागर यांचे निधन

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२९ नोव्हेंबर - शहरातील हिवरखेडा रोड



येथील भोलेश्वर कॉलनीतील रहिवासी सविता कैलास क्षीरसागर वय ४५ वर्ष यांचे अल्पशा आजाराने दि.२९ रोजी दुःखत निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा ,एक मुलगी असा परिवार होता, त्या व्यावसायिक कैलास क्षीरसागर यांच्या पत्नी होत्या सायंकाळी देवलोक स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले

## तालुक्यात विकास कामे करणार : आ. संजना जाधव

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२९ नोव्हेंबर - तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे,कन्नड सोयगाव मतदारसंघात मी कुणाची मुलगी , कुणाची सून तर कुणाची बहीण बनले या सगळ्यांच्या मेहनतीमुळेच मी आमदार बनले . निवडणूक लढणं किती अवघड असते हे मला या निवडणुकीत कळले .कारण साथ देणारे कमी व भीती दाखवणारे जास्त होते . विकासापासून २५ वर्ष मागे गेलेला तालुका २५ वर्ष पुढे घेऊन जायचा आहे यासाठी मी अशी आमदार बनणार आहे कुणी तालुक्यात मला हात दाखवा व गाडी थांबवा असे काम करून दाखवेन असे प्रतिपादन नवनिर्वाचित आमदार संजना जाधव यांनी कार्यकर्ते मतदारांचे आभार मानण्याच्या कार्यक्रमात आपल्या भावना व्यक्त केल्या .

पुढे बोलताना संजना जाधव म्हणाल्या की एमआयडीसी , गुजरदरी प्रकल्प , तालुक्यातील रस्ते यावर प्राधान्याने काम करणार असल्याचे सांगितले . या कार्यक्रमाला जिल्हा प्रमुख भरत राजपूत , भाजपा जिल्हा प्रमुख संजय खंबायते , शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख पुष्पाबाई गव्हाणे , कन्नड सोयगाव विधानसभा निवडणूक प्रमुख डॉं संजय गव्हाणे , भिल्ल संघटनेचे पवन सोनवणे , कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉं मनोज राठोड , रवींद्र चव्हाण , अमोल जाधव , माजी सभापती आप्पाराव घुगे , किशोर पवार , उत्तम राठोड , यशवंतराव पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती . सूत्रसंचालन सुधाकर पवार , ज्ञानेश्वर निकम यांनी केले . यावेळी साईनाथ आल्हाड , भगवानराव गित्ते , सिध्येश्वर झालटे , रमेश जाधव , आदित्य गर्जे , कृष्णा हारदे , श्रीराम घुगे ,राम पवार , रत्नाकर पंडित , किशोर पवार , मूलचंद पवार , देविदास जाधव , प्रशांत निर्मळ , कृष्णा बोरसे आदींसह शिवसेना भाजप महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

### टँकरमुक्त गाव करण्यासाठी सारोळा ग्रामपंचायतचा, ग्रामस्थांचा पुढाकार

## श्रमदानातून अंजना नदीत पाणीपुरवठ्याच्या विहिरीजवळ बांधला वनराई बंधारा

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि .२९. नोव्हेंबर- कन्नड तालुक्यातील सारोळा येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी टँकर मुक्त गाव करण्यासाठी अंजना नदी पात्रात गाव पाणीपुरवठ्याच्या विहिरीजवळ श्रमदान करीत वनराई बंधारा उपक्रम राबवून लाखो लिटर पाणी अडवले आहे. ही संकल्पना उपक्रम राबविण्यासाठी ग्रामविकास अधिकारी अशोक काळे व सरपंच सविता जंगले यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांच्या मदतीने तीन दिवस श्रमदानातून



हा उपक्रम राबविण्यात यशस्वी झाले आहे. या स्तुत्य उपक्रमाची माहिती मिळताच चंद्रहार ढोकणे उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा (बी. डि. ओ) पंचायत समिती कन्नड यांनी भेट देऊन सहभाग घेऊन यशस्वी वनराई बंधारा उपक्रमाबद्दल सर्वांचे कौतुक केले आहे व प्रत्येक गावाने असे उपक्रम राबवून गाव टँकर मुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी विजयकुमार पंडित गटविकास अधिकारी, दारकुंडे विस्तार अधिकारी पंचायत समिती कन्नड यांची देखील उपस्थिती होती.

उपसरपंच -ताई धनगे, रोजगार सेवक- साईनाथ साखले, ऑपरेटर -सुनील ढमाले, कर्मचारी- संदीप लेणेकर,गजानन लेनेकर, योजनाधूत- विजय ढमाले, गावकरी -जगन्नाथ जंगले, बबन काळे, कारभारी टकले, कैलास जंगले, बाबासाहेब जंगले ,बाळू धनगे ,विलास पद्मे ,सांडू गाडेकर , तालेब शहा, फकीरराव शेवणकर, आदींनी श्रमदान केले.

## प्रसूतीनंतरही वेदना सहन करण्याचा दुर्धर प्रसंग!

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

घाटी रुग्णालय आणि सिव्हिल हॉस्पिटलसमोरील रुग्णवाहिका चालकांचा मुजोरपणा वाढत चालला आहे. सिव्हिल हॉस्पिटलमधून सुटी (डिस्चार्ज) मिळाल्यानंतर बाळाला घेवून घरी जाताना एका रुग्णवाहिका चालकाने उद्धट वागणूक दिल्याचा प्रकार गुरुवारी, २८ रोजी समोर आला. याप्रकरणी आपण सिव्हिल सर्जनसह सर्वसंबंधितांकडे तक्रार करणार असल्याचे रुग्ण महिलेचे नातेवाई ऋत्विक पोटफोडे यांनी सांगितले. प्रसूतीपूर्व वेदनानंतर प्रसूतीनंतरही वेदना सहन करण्याची दुदैवी वेळ बाळंतीण महिलेवर आल्याचा प्रसंग गुरुवारी सिव्हिल हॉस्पिटलसमारे घडला.

प्राप्त माहितीनुसार एमएच २० ईएल ७०७६ असा रुग्णवाहिकेचा क्रमांक आहे. पोटफोडे यांनी आपल्या नातेवाईक रुग्ण महिलेस सुटी मिळाल्यानंतर रुग्णालया बाहेर उभे असलेल्या रुग्णवाहिका चालकाशी संपर्क सापधला. त्यास रुग्णवाहिका रुग्णालयाच्या गेटजवळ घेण्याची विनंती केली. मात्र, मुजोर रुग्णवाहिका चालकाने मध्ये रुग्णवाहिका घेण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला. वॉर्डातून बाळाला घेवून खाली थांबलेली बाळंतीण महिला बराच वेळ ताटकळत तशीच उभी होती. मात्र, रुग्णचाहिका चालकाने आपली रुग्णवाहिका काही आतमध्ये घेतली नाही. बराच वेळ त्याने मोबाईलवर बोलण्यात घातला. या प्रकारामुळे रुग्ण महिलेचे नातेवाईक संतप्त झाले. चालकाने रुग्णवाहिका बह्यारुग्ण विभाग गेटमध्ये न आणता एक्झिट गेटसमोर उभी केली व आम्हाला बाहेर येण्यास सांगितले, असे नातेवाईकांनी सांगितले. आम्ही बह्यरुग्ण विभगासमोर येण्यास विनंती केली तर त्याने यायचे असेल तर या असे दरडावून सांगत पेशंटच्या भावाला शिवीगाळ केली. याप्रकरणी संबंधित रुग्णवाहिका चालकाविरुद्ध पोलिसांसह सिव्हिल सर्जनकडे तक्रार करण्यात येणार असल्याचे रुग्णमहिलेच्या नातेवाईकांनी सांगितले.

## 'रियलमी जीटी ७ प्रो' हा भारतातील पहिला स्नॅपड्रॅगन ८ एलिट फ्लॅगशिप स्मार्टफोन केला लाँच

छत्रपती संभाजीनगर, २७ नोव्हेंबर २०२४ : भारतीय तरुणांमध्ये सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमीने आज भारतातील पहिला स्नॅपड्रॅगन ८ एलिट फ्लॅगशिप चिपसेटयुक्त बहुप्रतिक्षित रियलमी जीटी ७ प्रो हा स्मार्टफोन लाँच केला.

या स्मार्टफोनमध्ये फ्लॅश स्नॅप मोड आणि एआय झूम अल्ट्रा क्लॅरिटी असलेला एआय अल्ट्रा-क्लियर स्नॅप कॅमेरा उपलब्ध आहे, ज्यात उद्योगातील पहिल्या अंडरवॉटर फोटोग्राफी मोडचाही समावेश आहे. मोबाईलचा डिस्प्ले हा रिअलवर्ल्ड इकोऑ डिस्प्ले आहे, जो सॅमसंगच्या डिस्प्लेच्या सहकार्याने विकसित करण्यात आला आहे. हा डिस्प्ले १२० टक्के डीसीआय -पी ३ कलर गॅमट आणि ६५०० नीट्सचे सर्वोच्च ब्राइटनेस ऑफर करतो. या डिव्हाईसमध्ये सेग्मेंटमधील सर्वोत्कृष्ट अशी ५८००एम ए एच ची बॅटरी आणि १२०डब्ल्यू सुपरवूक चार्जिंगचे संयोजन उपस्थित आहे, जे बॅटरीला दीर्घकाळ टिकणारे आयुष्य प्रदान करते. रियलमी युआय ६.० हे फ्लुईड डिझाइन आणि एआयचा सहज अनुभव प्रदान करते. रियलमी जीटी ७ प्रो हा मार्स ऑरेंज आणि गॅलेक्सी ग्रे या दोन आकर्षक रंगांमध्ये आणि रु. ५६,९९९ किमतीच्या १२जीबी + २५६ जीबी व रु.६२,९९९ किमतीच्या १६जीबी + ५१२जीबी अशा दोन स्टोरेज प्रकारांमध्ये उपलब्ध आहे.

बॉर्न टू एक्सीड या



ब्रीदवाक्याधारे डिझाईन करण्यात आलेली जीटी ची प्रत्येक पिढी ही अतुलनीय कामगिरी प्रदान करण्यासाठी आणि शक्य तितक्या बाबींमध्ये विस्तार करण्यासाठी प्रयत्न करत आहे. रियलमी जीटी ७ प्रो हा एक अभूतपूर्व डिव्हाईस आहे, ज्यामध्ये अनेक इंडस्ट्रीमध्ये पहिल्यांदाच उपलब्ध होणारी वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत. स्नॅपड्रॅगन ८ एलिट फ्लॅगशिप चिपसेटने वैशिष्ट्यीकृत असलेले हा भारतातील पहिला स्मार्टफोन आहे, जो उत्कृष्ट कामगिरीसाठी नवीन मानके निश्चित करतो आणि ३ दशलक्ष*च्या प्रभावशाली अँटुटू स्कोअरसह इतरांपेक्षा वेगळा ठरतो. फोटोग्राफीची आवड असणाऱ्यांसाठी रियलमी जीटी ७ प्रो हा सोनी आयएमएक्स ८८२ पेरिस्कोप कॅमेऱ्यासह येतो आणि उद्योगातील पहिले एआय अंडरवॉटर फोटोग्राफी मोड उपलब्ध करवतो, ज्यामुळे वापरकर्त्यांना पाण्याच्या पृष्ठभागाखालील बाबींच्याही आकर्षक प्रतिमा कॅप्चर करता येतात.

रियलमी जीटी ७ प्रो हा भारतातील पहिला ८ एलिट फ्लॅगशिप स्मार्टफोन आहे, जो अँटुटूवर ३ दशलक्ष इतका प्रभावशाली बेंचमार्क स्कोअर असलेल्या क्रांतिकारी स्नॅपड्रॅगन ८ एलिट मोबाईल प्लॅटफॉर्मद्वारे समर्थित आहे. जीटी ७ प्रो ने पहिल्यांदाच नेक्स्ट एआय ही प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली देखील सादर केली आहे, जी एआय स्केच टू इमेज या फिचरचा वापर करून साध्या स्केचेसना तपशीलवार प्रतिमांमध्ये रूपांतरित करते. याव्यतिरिक्त, रियलमी जीटी ७ प्रो मधील एआय मोशन डीब्लर तंत्रज्ञानाने तुमच्या फोटोग्राफीचा अनुभव सुधारतो. हे तंत्रज्ञान चलित किंवा स्थिर शॉट्समधील अस्पष्टता कमी करण्यासाठी इंटेलिजेंट अल्गोरिदम वापरते आणि तुम्ही कॅप्चर केलेले प्रत्येक फोटो अधिक स्पष्ट बनवते.

## पीएफ-यूएएन सक्रियकरणाकडे दुर्लक्ष; ईपीएफ सदस्यांनी द्यावे गांभीऱ्याने लक्ष

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

ईपीएफ कायद्याअंतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व आस्थापनांच्या सर्व ईपीएफ सदस्यांनी यूएएन केवायसी करणे बंधनकारक आहे. मात्र,असे असतानाही विभागातील सूमारे १ हजार ४५० आस्थापनांमधील १२ हजार पीएफधारक कर्मचाऱ्यांनी प्राप्त झालेला सार्वत्रिक खाते क्रमांक (युनिव्हर्सल अकाउंट नंबर) सक्रिय केला नसल्याचे समोर आले आहे.

येथील भविष्य निर्वाह निधीच्या क्षेत्रीय कार्यालय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), बीड, जालना, हिंगोली, परभणी आणि नांदेड या सहा जिल्ह्याचा समावेश आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील कंत्राटदार, साखर कारखाने, कंपन्या, हॉटेल, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, उद्योग असे विभागात (एम्प्लॉयर अथवा इस्टाब्लिशमेंट) नोंदणीकृत आस्थापनांची संख्या १९ हजारच्या घरात आहे. विभागात २५ लाख खातेदार आहे तर पेन्शनधारकांची संख्या ७२ हजारांच्या घरात आहे.

दरम्यान, कर्मचाऱ्यांचे भविष्य निधी खाते हे युनिव्हर्सल अकाऊंट नंबर (यूएएन) ओळखले जाते. यूएएन मार्फत भविष्य निधी कायद्याच्या अंतर्गत येणाऱ्या योजनांचे लाभ ऑनलाइन अगदी घर बसल्या घेता येतात. परंतु, या सुविधांचा लाभ घेण्यासाठी यूएएन आधार, बँक खात्याशी व्हेरिफाईड केलेले असणे आवश्यक असते.

परंतु, असे असले तरी येथील पीएफ विभागाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १ हजार ४५० आस्थापनात कार्यरत जवळपास १२ हजार कर्मचाऱ्यांनी युनिव्हर्सल अकाऊंट नंबर हा सक्रिय केला नसल्याची बाब पीएफ विभागाने केलेल्या पडताळणीतून समोर आली आहे.

संबंधित कर्मचाऱ्यांनी तातडीने युएएन क्रमांक हा सक्रिय करुन घ्यावा, असे आवाहन पीएफ विभागाने केले आहे.

सक्रीय आणि आधार सीडेड यूएएन असेल तरच पुढील ऑनलाइन सुविधा घेता येतील, असेही नमूद करण्यात आले आहे.

* येथे संपर्क साधा

सामाजिक सुरक्षा कवच म्हणजेच भविष्य निर्वाह निधी. भविष्य निर्वाह निधी संघटन विभागाच्या ईपीएफओ सदस्य पोर्टलमध्ये महत्वाची लिंक अंतर्गत यूएएन सक्रिय करा या कार्यक्षमतेद्वारे उपलब्ध केलेल्या ऑनलाइन सुविधेद्वारे यूएएन लॉगिन तयार करणे आवश्यक आहे. ही सुविधा ईपीएफओ युनिफाइड पोर्टलच्या सदस्य इंटरफेसवर उपलब्ध आहे (एचटीटीपीएस/युनिफाईडपोर्टल-एमईएम.ईपीएफइंडिया.गव्ह. ईन/मेंबरइंटरफेस/).

अधिक माहिती, सुविधेसाठी आस्थापनातील अधिकृत व्यक्तीशी संपर्क साधू शकतात. कर्मचारी/नियोक्ते यांना यूएएन सक्रिय करण्यात कोणतीही अडचण आल्यास ते पीएफ विभागाचे जनसंपर्क अधिकारी, प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्याशी दूरध्वनी क्रमांक -०२४०-२४८५६०६ किंवा २४८५३८३ वर संपर्क साधू शकतात. किंवा आरओ. औरंगाबादईपीएफइंडिया.गव्ह.ईन यावर ईमेल करा तसेच व्हॉट्सप क्रमांक ९४०५३५५२८७ वर लिहू शकतात.

## जागतिक एड्स दिनानिमित्त (दि.२ डिसेंबर) जनजागृती रॅलीचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर,दि.२९ (जिमाका)- जागतिक एड्स दिनानिमित्त दि.२ डिसेंबर रोजी सकाळी जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली आहे. सकाळी साडे आठ वा.क्रांती चौक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या रॅलीस सुरुवात होईल. पैठण गेट, जिल्हा परिषद मार्गे, मराठवाडा सांस्कृतिक मंडळ, खडकेश्वर येथे रॅलीचा समारोप होणार आहे. रॅलीस मोठ्याप्रमाणात युवक - युवती महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीनी उपस्थित राहण्याचे अवाहन जिल्हा चिकित्सक जिल्हा रुग्णालय यांनी केले आहे.

रॅली दरम्यान जनजागृतीसाठी माहिती पत्रक, लोककलाद्वारे जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जागतिक एड्स दिनाची यंदाची मध्यवर्ती संकल्पना 'हक्काचा मार्ग घ्या' ही आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अनुदानित अशासकीय संस्थाचा सहभाग असेल. जागतिक एड्स दिन व सप्ताह मध्ये जिल्हास्तरावर विविध स्पर्धेचे आयोजन (२ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४) या कार्यक्रमात करण्यात आले आहे.

तसेच तालुका स्तरावर विविध महाविद्यालयात व्याख्यान व रॅलीचे आयोजन केले आहे. सप्ताहामध्ये महाविद्यालयात एचआयव्ही, एड्स आजारा विषयी जनजागृतीपर व्याख्यान आयोजित करण्यता येणार आहेत. २ डिसेंबर रोजी सकाळी ८.३० वा. उपजिल्हा रुग्णालय, वैजापूर व प्रेरणा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यामाने वैजापूर शहरात रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या सर्व उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे असे अवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डी.एम. मोतीपवळे यांनी केले आहे.

# ऑनलाईन आर्थिक फसवणुकीतील साडे चार लाख रुपये फिर्यादीस परत

## धाराशिव सायबर पोलीसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. २९ नोव्हेंबर -**

क्रेडिट कार्ड ॲक्टिव्हेट करण्याच्या बहाण्याने धाराशिव शहरातील एकाची ४ लाख ४९ हजार ऑनलाईन फसवणूक झाली होती. या फसवणुकीतील रक्कम परत मिळवून देण्यास सायबर पोलिसांना यश आले असून सायबर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, धाराशिव शहरातील सुलतान पटेल यांना ऑक्टोबर रोजी मोबाईलवर एका अनोळखी इसमाने फोन करुन तो खउखउख या बॅकेतुन बोलतो असे सांगून क्रेडीट कार्ड क्टीवेट करण्यासाठी मोबाईलवर आलेला ओटीपी विचारून घेवून तीन वेगवेगळ्या ओटीपी द्वारे रक्कम काढून घेतली. यामध्ये क्रेडीट कार्डवर अनुक्रमे ९६ हजार ९२ रूपये, ८८ हजार २९० रूपये व २ लाख ६४ हजार ८७० रूपये असे तीन ट्रान्झक्शन झाल्याचे मेसेज आले.



असे मेसेज आले ते पाहून तक्रारदार यांनी ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या व्यक्तीस पैसे कट झाल्याची विचारणा केली. मात्र त्याने उडवाडवीची उत्तरे दिल्याने पटेल यांना संशय आल्याने त्यांनी तात्काळ सायबर पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. यानंतर सायबर पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवत ऑनलाईन तक्रार नोंदवून तांत्रिक विश्लेषण केले. तक्रारदार यांच्या क्रेडीट कार्डद्वारे मेझॉनवर खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तात्काळ मेझॉन कंपनीला इमेल करुन नोडल अधिकारी यांचेशी संपूर्क करुन यातील तक्रारदाराच्या क्रेडीट कार्डवर केलेली खरेदीचा ऑर्डर रद्द करुन तक्रारदार यांची गेलेली संपुर्ण रक्कम ४ लाख ४९ लाख २५२ रूपये परत करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश कासुळे, पोलीस हावलदार हालसे, नाईकवाडी, महिला पोलीस नाईक पौळ, पोलीस अमंलदार जाधवर,भोसले, मोरे, भोसले, तिळगुळे, कदम, काझी, सुर्यवंशी, महिला पोलीस अमंलदार खांडेकर, शेख यांच्या पथक या प्रकरणात काम करत होते.

# हॅलो मेडिकल फाउंडेशनकडून जळकोटवाडीत जागर अभियान



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि. २९ नोव्हेंबर -**

युवा पिढीनी अपयशाने निराश न होता ध्येय साध्य करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे मत प्रा. ज्योतिका चव्हाण यांनी केले.

हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या वतीने जळकोटवाडी (नळ) येथे हिंसामुक्तीसाठी युवा जागर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. हे अभियान हॅलोकडून जिल्हाभरात राबविण्यात येत आहे. यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील किशोरवयीन मुला-मुलीमधील व्यसनमुक्ती, छेडछाड प्रतिबंध, युवा जागर या विषयावर जनजागरण चालू आहे. या विषयावर चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, यशस्वी कोण होतो. जो योग्य निर्णय घेतो. तो नव्हे तर घेतलेला निर्णय योग्य कसा आहे. हे सिद्ध करतो. तो खरा युवक, निर्भयता, विवेकता, चतुराईने पुढे जाणारा युवकांची आज देशाला गरज आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंदिरा काळे प्रशालेचे मुख्याध्यापक गहिनीनाथ काळे हे उपस्थित होते. तर हॅलो मेडिकलच्या तालुका समन्वयक नागिनी सुरवसे, सम पुदेशिका वासंती मुळे, पर्यवेक्षक इंदूबाई कबाडे, प्रणिता भोसले, ललीता राठोड, डावरे, स्वामी, कागे, राऊत, जगन्नाथ काळे, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# राणाजगजितसिंह पाटील मंत्री, पालकमंत्री होण्यासाठी श्री संत गोरोबाकाकाला साकडे





**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि. २९ नोव्हेंबर -**

तेर गावचे भुमिपुत्र तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांची महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद मिळावे म्हणून तेर येथील ग्रामस्थांनी संत गोरोबाकाका यांच्या समाधीस अभिषेक आरती मंत्रोच्चार पुजा करण्यात आली.

आमदार राणाजगजितसिंह पाटील हे भाजपचे एकमेव जिल्ह्यातील आमदार आहेत. त्याचा माध्यमातून दोन वेळा जिल्हात भारतीय जनता पक्षाला आमदार दिला आहे.

त्यामुळे आ. राणाजगजिसिंह पाटील यांना राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री व्हावे म्हणून तेर येथे ग्रामदैवत श्री संत गोरोबाकाका मंदिरात अभिषेक व आरती पूजा केली.

यावेळी हभप. शिवाजी महाराज रोंगे, उपसरपंच श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, पद्माकर फंड, बालाजी पांढरे, भुजंग खांडेकर, विलास रसाळ, तानाजी बंडे, अर्शाद मुलांनी, अमित कोळपे, नाना गायके, सुभाष कुलकर्णी, बिभीषण लोमटे, सतीश कदम, गुरुनाथ बंडे, विवेकानंद नाईकवाडी, अतुल इंगळे, नारायण लोमटे, जयदेवी शिराळ, लतिका पेठे, नशिम मुलानी, पोर्णिमा झाडे, ममताज तांबोळी, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ पसारे, संजय लोमटे, रामभाऊ कोळी, किशोर काळे, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा फुलेंनी संपूर्ण आयुष्य समाज सुधारण्यासाठी खर्ची घातले : प्राचार्य कोळगे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. २९ नोव्हेंबर -**

समाजाविषयी असणारी तळमळ ही त्यांच्या कार्यातून आपल्याला समजून येते. समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला महत्त्व दिले एवढेच नाही तर दुर्लक्षित समाजासाठी, स्त्री सन्मानासाठी, बालविवाह विरोधासाठी मशाल पेटून क्रांती घडवणारे, समानता व सत्यासाठी ध्येय झिजवणारे क्रांतीसुर्य महात्मा फुले होते. त्यांनी शेतकऱ्यांसाठी ही कार्य केले. महात्मा फुलेंनी संपूर्ण आयुष्य समाज सुधारण्यासाठी खर्ची घातले असे उद्गार जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचा स्मृतिदिन साजरा करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य जयप्रकाश कोळगे बोलत होते.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन व वेळेचे महत्व समजून व वेळेचा सदुपयोग करून जीवन उज्वल बनवावे अशी अपेक्षा ही याप्रसंगी व्यक्त केली.

विद्यालयातील सहशिक्षक श्री प्रसन्न धमधिकारी यांनीही क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्याची सखोल माहिती देऊन विद्यार्थ्यांनी समाजासाठी काहीतरी कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, डोंगरे के.ए., जविकास क्षिरसागर, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत घोळवे यांनी तर उपस्थितांचे आभार सुरेश रायजादे यांनी मानले.

# श्री काळभैरवनाथाच्या मंदिराच्या मुख्यमार्गावर दिशादर्शक फलक लावण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि. २९ नोव्हेंबर -**

सोनारी येथील श्री काळभैरवनाथाच्या दर्शनासाठी राज्यसह परराज्यातील भविकभक्त येतात परंड्यात मुख्यमार्गावर दिशादर्शक फलक नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. बांधकाम विभागाने परंड्याहुन सोनारीकडे जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी मुख्यरस्त्यांवर दिशादर्शक फलक लावण्यात यावे, अशी मागणी श्री काळभैरवनाथ देवस्थानचे विश्वस्त समीर संजय पुजारी यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग परंडा यांच्याकडे गुरूवार दि.२८ रोजी केली आहे.

मागणीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता टोंपे यांच्याकडे श्री काळभैरवनाथ देवस्थाचे विश्वस्त समीर पुजारी, मयुर पुजारी यांनी दिले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता शिंदे यांना या बाबत माहिती दिली आहे. सोनारी येथील श्री काळभैरवनाथ देवस्थानच्या दर्शनासाठी महाराष्ट्र राज्यासह पर राज्यातील भाविक भक्तांचा नेहमीच ओढा असतो. परंड्यात या मार्गावर दिशादर्शक फलक नसल्याने हजारो भावीक जुन्या गुगल मॅप प्रमाणे परंडा शहरातील अरूंद असलेल्या गल्ली बोळातुन वाहणे घेऊन ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे भाविकांना मोठा मनःस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक महिला भाविकांची मोठी गैरसोय होत आहे. परंडा शहरातील डॉ. आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, करमाळा चौक, खासापूरी चौक, कुर्डूवाडी नाका, कुर्डूवाडी, बार्शी, करमाळा मार्गावरून सोनारीस जाणाऱ्या भाविकांसाठी रस्ता सहज लक्षात यावा यासाठी दिशादर्शक फलक लावणे अत्यंत गरजेचे आहे.



सार्वजनिक बांधकाम खात्याने तात्काळ लावुन सोनारीस जाणाऱ्या नवीन रस्त्याचे गुगल मॅपवरती अपडेट करण्यात यावे. यामुळे भाविक भक्तांची गैरसोय दुर होण्यास मोठी मदत होईल. असे निवेदनात समीर पुजारी यांनी म्हटले आहे.

# डाळ वर्गीय पीक विकास परिषदेच्या चेअरमनपदी नारायण नन्नवरे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि. २९ नोव्हेंबर -**

आंतरराष्ट्रीय पातळी वरील इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशनच्या डाळ वर्गीय पीक विकास परिषदेच्या चेअरमनपदी नारायण नन्नवरे यांची निवड करण्यात आली.



ग्रँट थोर्टन प्रभादेवी मुंबई या ठिकाणी २५ नोव्हेंबर रोजी परिषदेच्या संचालक मंडळाची बैठक झाली या बैठकीस कॅनडा येथील प्रतिनिधी स्कॉट मॅत्थिस तसेच महाराष्ट्रातील स्मार्टचे नोडल अधिकारी चंद्रकांत माळी, विनायक पाटील, शरद म्हेत्रे, सीईओ डॉ. शुभ्रा देशपांडे, रावसाहेब बेंद्रे, चंचल पाल्हाल, सुभजीत बॅनर्जी, श्रेया झा यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सर्वानुमते परिषदेच्या चेअरमनपदी नारायण नन्नवरे तसेच सचिव पदी विनायक पाटील यांची निवड करण्यात आली. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्य व महाराष्ट्र शासनाच्या (स्मार्ट) बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प अंतर्गत आंतरराष्ट्रीय पातळीवर या परिषदेचे कार्य सुरू असणार आहे. ३१ जुलै २०२४ रोजी इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशनच्या नावाने देशातील पहिल्या डाळ वर्गीय पीक विकास परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देशांमध्ये अशा पीक विकास परिषदा पूर्वीपासून कार्यरत आहेत पण इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशन ही भारतातील डाळवर्गीय पिकातील पहिली पीक विकास परिषद आहे.

या परिषदेच्या माध्यमातून डाळ वर्गीय पीक उत्पादक शेतकरी, खरेदीदार, कृषी निविष्ठा उद्योग, साठवण उद्योग, वाहतूक उद्योग, प्रक्रिया उद्योग इत्यादींसह डाळ वर्गीय पीक मूल्य साखळीतील सर्व घटकांना एका व्यासपीठावर आणून डाळ वर्गीय पीक उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य केले जाणार आहे.

# तुळजाई नगरीत श्री काळभैरवनाथ जन्माष्टमी उत्साहात साजरी

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सपत्नीक केला महारुद्राभिषेक....

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. २९ नोव्हेंबर -**

श्री काळभैरवनाथ जन्माष्टमीनिमित्ताने काळभैरवनाथ मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, प्रारंभ काळभैरवाष्टक, भैरवचंडी आणि बटुकभैरव स्त्रोत हवन, भैरव अनुष्ठान करण्यात यावेळी आले. महारतीने काळभैरवनाथ जन्माष्टमी उत्सवाची सांगता झाली.



यावेळी कालभैरवनाथाच्या कड्यावर शेकडो दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला, कड्यावर आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. जन्माष्टमीनिमित्त आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सौभाग्यवती अर्चना पाटील यांच्या समवेत कालभैरवनाथस महारुद्राभिषेक पूजा केली.

याप्रसंगी महंत इच्छागिरी महाराज, महंत तुकोजीबुवा, कालभैरवनाथाचे मुख्य पुजारी सोमनाथ पुजारी, पुरोहित माणिक कांबळे, दादा ढोले, सर्वोत्तम जेवळीकर, विशाल रोचकरी, निलेश अमृतराव, ॲड. जनक पाटील, प्रेम पुजारी, सुनील पुजारी, वैजनाथ पुजारी, गणेश पुजारी उपस्थित होते. कालभैरवनाथ मंदिर समितीतर्फे आ. पाटील यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. काळभैरव जन्माष्टमी उत्सवासाठी श्री काळभैरवनाथ भिंडोळी उत्सव समिती व श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या सेवकांसह भाविकांनी परिश्रम घेतले.

यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

# संविधान अमृत महोत्सवी दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि. २९ नोव्हेंबर -**

२६ नोव्हेंबर भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा बालोद्यान कळंब येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक समिती कळंबच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक समितीचे अध्यक्ष सुनील गायकवाड, सत्पाल बनसोडे, माधवसिंग राजपूत, बंडू ताटे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे सामूहिक वाचन करण्यात आले.

याप्रसंगी राजाभाऊ गायकवाड, सुमित रणदिवे, विलास करंजकर माणिक गायकवाड, बालासाहेब हौसलमल, भाउसाहेब कुचेकर, रमेश भोसले, किशोर वाघमारे, अभय गायकवाड, सुधाकर वनकळस, प्रमोद ताटे, महावीर गायकवाड यांनी यात सहभाग घेतला.

भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाली असून २०२४-२५ हे संविधान अमृत महोत्सवी वर्ष म्हणून देशात मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहे. यावेळी संविधान प्रेमी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही मार्गाने लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न!

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. २९ नोव्हेंबर**


लोकशाही मार्गानेच लोकशाही खतम करण्याचे उद्योग निवडून दिलेली सरकारेच अनेक देशांत आज करताना दिसत आहेत, ही चिंता आणि चिंतनाची बाब आहे. एकेकाळी लोकशाही संपुष्टात आणण्यासाठी लष्करी बळाचा किंवा बंदुकांचा वापर केला जात असे. पण हल्ली निवडून दिलेले सत्तांध, महत्त्वाकांक्षी लोकप्रतिनिधीच लोकशाही मार्गाने उपलब्ध करून दिलेल्या अवकाशात लोकशाहीचा गळा घोटताना दिसत आहेत. हार्वर्ड विद्यापीठात राज्यशास्त्र विषयात अध्यापन करणारे डॅनियल झिब्लेट आणि स्टीवन लाटवस्की या प्राध्यापकद्वयाने २०१८साली 'हाऊ डेमोक्रोसिज डाय' या पुस्तकात पेरू, रशिया, हंगेरी, व्हेनेझुएला आणि अर्थातच डोनाल्ड ट्रम्पच्या नेतृत्वाखाली अमेरिकेत लोकशाही मार्गाचाच वापर करून लोकशाही कशी नष्ट करण्याचा प्रयत्न झाला, हे सोदाहरण सांगितले आहे. यात ते तीन प्रकारे लोकशाही नष्ट केली जाते असे निदर्शनास आणून देतात. एक- ताब्यात घेऊन (यात लोकशाहीची बूज राखणाऱ्यांना धमकावणे, तुरुंगात टाकणे, माध्यमे ताब्यात घेऊन सत्य दडवणे, नियामक संस्था, लोकशाही संस्थांवर कब्जा/ताबा मिळविणे इत्यादी बाबींचा समावेश होतो) दोन- राजकीय खेळाडूंना बाजूला करून (यात प्रतिस्पर्धी राजकीय विरोधकांना शत्रू समजून त्यांना समाप्त करण्याची भाषा केली जाते) आणि तीन- नियमांचे पुनर्लेखन करून (यात संविधान, कायदे, नियम आपल्या भूमिकांना अनुकूल करण्यासाठी त्याची तोडमोड केली जाते, सुधारणा केल्या जातात, किंवा नवे कायदे केले जातात)सध्याचा भारतीय लोकशाही व्यवहार यापेक्षा निराळा आहे असे म्हणण्यास जागा नाही.

# अल्प भूधारक शेतकऱ्याचा मूलगा झाला 'क्लास वन' : राहुल शंकरराव महामुने यांचे एमपीएससीत यश

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २९ नोव्हेंबर**

पाणी टंचाईग्रस्त पाचोंदा गावातील अल्प भूधारक शेतकऱ्याचा मुलगा राहुल शंकरराव महामुने यांनी मोठ्या परिश्रम व जिद्दीने अभ्यास करून एमपीएससी परिक्षेत उज्वल यश मिळवून 'क्लास वन' अधिकारी 'अ' पदाला गवसनी घातल्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

अतिदूर्गम पाचोंदा येथील अल्पभूधारक शेतकरी दाम्पत्य रमाबाई व शंकरराव महामुने यांनी आपल्या मुलांना शिक्षणाचं बाळकडू पाजलं. शिक्षणावर भर देवून त्यांनी तिन्ही मुलं शिक्षक केली. त्यांचा मोठा मूलगा अनिल महामुने हे शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी असा प्रवास करत, माजी गट शिक्षणाधिकारी व पीएम पोषण आहार शक्ती निर्माण योजना अधिक्षक या पदावर कार्यरत आहेत. त्यांचा दुसरा मुलगाही शिक्षक आहे. राहूल महामुने हा त्यांचा धाकटा मुलगा. राहूलचे प्राथमिक शिक्षण पाचोंदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर गोकुंदा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण झाले. पनवेल येथून डी.एड् उत्तीर्ण झाल्यानंतर शासकिय आश्रम शाळा झराळा येथे सह शिक्षक म्हणून रूजू झाले. बदलीनंतर शासकीय आश्रम शाळा सारखणीत आले येथे ते विद्यार्थी प्रिय गुरुजी ठरले. याच परिक्षेत्राचे शिक्षण विस्तार अधिकारी असलेले मोठेबंधू अनिलकुमार महामुने यांनी सदैव त्यांना प्रेरणा दिली. अन् त्यांच्यामुळेच राहूल स्पर्धा परिक्षेच्या तयारीला लागले. पहिल्याच परिक्षेत उत्तीर्ण होऊन ते गृहपालपदी नंदूरबार येथे रुजू झाले. तेवढ्यावरच समाधान न मानता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी ) परीक्षा देण्याची जिद्द उराशी त्यांनी बाळगली. त्यातच सन २०२० मध्ये एमपीएससीची वरिष्ठ संशोधन अधिकारी/ सहायक आयुक्त/ प्रकल्प अधिकारी गट 'अ' या आदिवासी विकास विभागातील सरळसेवा पदभरतीसाठी जाहिरात आली. फार्म भरून कठोर परिश्रम व अभ्यासात सातत्य ठेवून परीक्षा दिली.



परीक्षा तेव्हाच झाली ; परंतु २८ नोव्हेंबर २०२४ रोजी आलेल्या निकालात राहूल महामुने हे महाराष्ट्रातून प्रथम आले.

या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पाणी ही नित्य समस्या असणाऱ्या पाचोंदा गावातील अल्प भूधारक शेतकरी रमाबाई व शंकरराव महामुने या दाम्पत्यांनी लेकरांच्या शिक्षणावर भर दिला. त्यांचे काका गौतमराव महामुने, रमेश महामुने, परमेश्वर महामुने व विश्वनाथ महामुने यांनी वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन केले. यामुळेच ते आज यशाची पायरी चढत आहेत. हे इतर शेतकरी व त्यांच्या मुलांसाठी प्रेरणादायी आहे.

# साईबाबा दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## गेल्या २५ वर्षापासून साईबाबाला जाण्यासाठी दिंडीची पायाने सुरुवात

**मोहन धारासूरकर**

**पाथरी,/प्रतिनिधी:** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गुरुवार दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी परमपूज्य श्री साईबाबा जन्मस्थान मंदिर पाथरी ते पंढरपुर पायी दिंडी चे टाळमृदंगाच्या गजरात प्रस्थान झाले. दिंडी निघण्यापूर्वी श्री साईबाबांचे परमभक्त आई तुळजाभवानी बँकेचे चेअरमन श्री प्रसाद फलके यांचे वतीने बँकेचे प्रतिनिधी श्री मिलिंद मनेरे व श्री महेश बोराटे यांचे उपस्थितीत दिंडीतील साई भक्तांना समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री नारायण कुलकर्णी यांचे शुभ हस्ते टी-शर्ट वाटप करण्यात आले, प्रसंगी समितीचे प्रताप आमले, प्रभाकर पाटील, बालाजी बेंद्रे, व मोठ्या संख्येने साईभक्त उपस्थित होते.

पूर्ण देशभरातून ही एकमेव साईबाबांची दिंडी आहे जी पंढरपूरला पायी जाते, गेल्या २५ वर्षांपासून समितीने ही परंपरा जोपासली आहे. या दिंडीत जाणाऱ्या भक्तांकडून वारकर्यांकडून कुठलीही ही फिस आकारल्या जात नाही साईभक्तांसाठी ही दिंडी पूर्णतः मोफत असते. दिंडी निघण्यापूर्वी समितीचे कोषाध्यक्ष विश्वस्त श्री सूर्यभानजी सांगडे यांचे शुभ हस्ते परमपूज्य श्री साईबाबांच्या पादुकांचे पूजन व महाआरती करण्यात आली तसेच सौ प्रज्ञा अतुलराव चौधरी व सौ छाया नारायण कुलकर्णी मंदिर अधीक्षिका व इतर सुवासिनींनी परमपूज्य श्री साईबाबांना श्रद्धापूर्वक औक्षण केले

आज ही दिंडी साईबाबा जन्मस्थान मंदिर पाथरी येथून निघताना सर्वप्रथम श्री



साईबाबांचे कुलदैवत असलेल्या माळीवाडा येथील पंच बावडी हनुमान मंदिर येथे दर्शन घेऊन, श्री पंकज मैराळ यांच्या मळ्यात चहा पाण्याचा कार्यक्रम झाला तिथून पुढे श्री महादेवराव खारकर यांचा मळ्यात श्री साईबाबांची आरती व दुपारच्या जेवणाचा कार्यक्रम झाला.

या दिंडीला व श्री साईबाबांच्या रथाला निरोप देण्यासाठी पाथरी शहरातील मोठ्या संख्येने जनसमुदाय एकत्रित आला होता. तसेच या दिंडीचे अध्यक्ष/ व्यवस्थापक अॅड. श्री मुकुंदराव चौधरी, श्री साई स्मारक समिती पाथरी चे व्यवस्थापकीय विश्वस्त मा.अॅड. श्री अतुलराव चौधरी, कोषाध्यक्ष विश्वस्त मा. श्री सूर्यभानजी सांगडे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री नारायण कुलकर्णी परम साईभक्त परभणीचे मा. श्री नागेन्द्र आनंतवार, श्री सुरेशराव चव्हाण श्री प्रताप आमले, श्री बालाजी बेद्रे व आदी मान्यवर उपस्थित होते.



# महिलेच्या पोटातून काढला दहा किलोचा गोळा आरपी हॉस्पीटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील पाथरी रस्त्याावरील आरपी हॉस्पिटल व रिसर्च इन्स्टिट्यूट वैद्यकीय महाविद्यालयात एका ६५ वर्षीय महिलेच्या पोटातून दहा किलोचा गोळा शस्त्रक्रिया करुन काढण्यात आला.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एक ६५ वर्षीय महिलेच्या पोटात सतत दुखत असल्याने त्याांनी आर. पी. हॉस्पिटल येथे शैल्यचिकित्सक डॉ. अमीर तडवी, डॉ. भीमराव कनकुटे यांना दाखवले. त्याावेळी त्याांनी केलेल्या सोनोग्राफी तपासणीमध्ये महिलेच्या पोटात दहा किलो वजनाचा गोळा तसेच गर्भपिशवी देखील खराब झाल्याचे आढळून आले, त्याामुळे तातडीने शस्त्रक्रिया करणे गरजेचे असल्याने हॉस्पिटलने तात्काळ महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्राक्रियेची परवानगी घेतली. दोन तासापेक्षा अधिक झालेल्या शस्त्राक्रियेनंतर महिलेच्या पोटातून दहा किलोचा गोळा आणि गर्भपिशवी काढण्यात आली. त्याामुळे महिलेची प्राण वाचले.

दरम्यान, या शस्त्राक्रियेसाठी डॉ. अमीर तडवी, डॉ. भीमराव कनकुटे, डॉ. श्रुती शहारे यांच्यासह कर्मचारी संध्या आळणे, किशोर नवले आदींनी परिश्रम घेतले. यावेळी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी आरपी हॉस्पिटलचे आभार व्यक्त केले.

## संक्षिप्त वृत्त...

### खरीप नुकसान भरपाईची शेतकरी संघटनेची मागणी

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** खरीप हंगाम २०२४ मध्ये विविध पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत पंतप्रधान पीकविमा योजनेतून तात्काळ भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी संघटनेकडून परभणी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पंतप्रधान पीकविमा योजनेच्या शासन निर्णयानुसार कुठल्याही हंगामातील प्रतिकूल परिस्थिती अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्यासाठी अधिसूचना काढल्यानंतर एक महिन्याच्या आत नुकसान भरपाईची रक्कम देणे आवश्यक आहे. त्याा संदर्भात जिल्हा प्रशासनाने अधिसूचना काढली आहे. त्याला ५५ दिवसांपेक्षा अधिक कालावधी होऊनदेखील शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही. यासंदर्भात शासनाने संबंधित पीकविमा कंपनी आयसीआयसीआय लोम्बार्ड यांना तात्काळ आदेश द्यावेत अन्यथा शेतकरी संघटनेचे वतीने आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात दिला आहे. निवेदनावर शेतकरी संघटनेचे सोनपेठ तालुकाध्यक्ष विश्वंभर गोरवे, हेमचंद्र शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### विधान परिषद आमदार असतांना मंजूरी, विधानसभा सदस्य होताच वाटप सुरु

**परभणी,/प्रतिनिधी :** सप्टेंबर महिन्यात झालेल्या पीक नुकसानी पोटी



झालेल्या नुकसानीची भरपाई ची आर्थिक मदत वाटप करण्यात यावी अशी मागणी आ राजेश विटेकर यांनी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कडे केली होती त्याप्रमाणे येत्याा दोन दिवसा पासून शेतकऱ्यांच्या खात्याात २५ % अग्रिम रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार असल्याची माहिती आ राजेश विटेकर यांनी दिली आहे .

आमदार राजेश विटेकर हे विधान परिषद सदस्य म्हणून कार्यरत असताना त्याांनी अतिवृष्टी मध्ये नुकसान झालेल्या नुकसानी पोटी शेतकऱ्यांना २५ % प्रमाणे अग्रिम रक्कम वाटप करण्यात यावी अशी विनंती क्रशी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कडे केली होती त्याावरून कृषी मंत्री यांनी , नुकसानीचे आकलन करून अग्रिम ची २५% रक्कम शेतकऱ्यांच्या खात्याात जमा करा असे निर्देश जिल्हाधिकारी परभणी यांना दिले होते त्याावरून जिल्हाधिकारी व कृषी विभाग यांनी प्रक्रिया पूर्ण केली होती परंतु विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने वाटपाची प्रक्रिया सुरू करण्यास अडचण निर्माण झाली होती, आता आचारसंहिता उठल्याने येत्याा आठवड्यापासून शेतकऱ्यांच्या खात्याात पैसे जमा होण्यास सुरुवात होणार आहे, अशी माहिती आ राजेश विटेकर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.



जिंतूर-सेलू विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांची जिंतूर-सेलु विधानसभा मतदारसंघावर दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना जिंतूर येथील नगरसेवक अॅड.गोपाळ रोकडे पाटील दिसत आहेत.

# मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त देवगिरी हॉस्पीटलमध्ये पत्रकार कुंटूंबियासाठी आरोग्य शिबीर

**परभणी,/प्रतिनिधी:** अखिल भारतीय मराठी परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त परभणीत ३ डिसेंबर रोजी पत्राकार व त्याांच्या कुटूंबीयांची आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन परभणीतल्या देवगिरी मल्टीसुपरस्पेशालीटी हॉस्पीटल या ठिकाणी आयोजित केली आहे. परभणी जिल्हा मराठी पत्राकार संघ आणि देवगिरी सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलच्या वतीने ही आरोग्य तपासणी करण्यात येणार असून यामध्ये विविधि प्रकारच्या तपासण्या करण्यात येणार आहेत तर जवळपास १० सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांची टिम तपासणी करणार आहेत. याच शिबीरात इच्छूक पत्राकार व नागरिकांसाठी रक्तदान शिबीराचं आयोजन देखील करण्यात आले आहे. या शिबीराचा जिल्हाभरातील पत्राकार आणि त्याांच्या कुटूंबीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पत्राकार संघ आणि देवगिरी सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलच्या वतीने करण्यात आले आहे.


या शिबीरात शुगर, बीपी, इसीजी या बरोबरच सीबीसी, एचबीएवनसी, लिपीड प्रोफाईल, थायराईड प्रोफाईल, किडनी फंक्शन, लिव्हर फंक्शन एचपीएलसी आदींसह विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात येणार आहेत. शिबीराची सुरुवात सकाळी ८ वाजता होणार आहे. या शिबीरात रुग्णांची तपासणी करण्यासाठी एमडी मेडीसीन डॉ. आंबेगावकर, डॉ.



अजय कुंडगिर, जनरल सर्जन डॉ. परमेश्वर साळवे, डॉ. निहार चांडक, न्युरॉलाजीस्ट डॉ. अतुल जाधव,डॉ. एकनाथ गबाळे, कार्डीओलॉजीस्ट डॉ. व्यंकटेश हराळे, नेफ्थॉलॉजीस्ट डॉ. राहूल टेंगसे, युरॉलॉजीस्ट डॉ. कोंडावार, अस्थिरोग तज्ञ डॉ. सुर्यतळ, नेत्रातज्ञ डॉ. संदिप वानखेडे, फिजीओथेरपिस्ट डॉ. अश्विनी सुर्यतळ आदी पत्राकार व त्याांच्या कुटूंबीयांची तपासणी करणार आहेत. या निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन मेडीकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजगोपाल कालानी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, ज्येष्ठ साहित्यीक तथा पत्राकार डॉ. आसाराम लोमटे, मराठी पत्राकार परिषदेचे सरचिटणीस प्राचार्य सुरेश नाईकवाडे आदींची उपस्थिती राहणार आहे.

पत्राकार व त्याांच्या कुटूंबीयांच्या आरोग्याची तपासणी करण्याची संकल्पना मराठी पत्राकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी मांडली असून त्याानुसार संपूर्ण राज्यभरात पत्राकार आणि त्याांच्या कुटूंबीयांची आरोग्य तपासणी करण्यात येते. राज्यभरातल्या हजारो पत्राकारांची तपासणी करण्यात येते. परभणीत यावर्षीचे तपासणी शिबीर देवगिरी सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल या ठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे. या शिबीराचा जिल्हाभरातील पत्राकार, पत्राकार क्षेत्राशी संबंधित सर्व व त्याांच्या कुटूंबीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन देवगिरी सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल व जिल्हा मराठी पत्राकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सचखंड एक्सप्रेसमध्ये चढतांना खाली पडून प्रवाशाचा तुटला हात



**परभणी,/प्रतिनिधी:** अमृतसर हुन नांदेड कडे जाणाऱ्या सचखंड एक्सप्रेस मध्ये चढताना प्रवाशी गाडीखाली सापडल्याने हात तुटल्याची घटना बुधवार २७ नोव्हेंबर रोजी रात्री ७:३१ वाजता घडली.या अपघातामुळे सेलू रेल्वे स्थानकावर सचखंड एक्सप्रेस सुमारे ४० मिनिट थांबली होती.

या अपघाताची माहिती कळतात रेल्वे पोलीस चौकीचे परसराम सूर्यवंशी सह इतरांनी या प्रवाशास तात्काळ उपचारार्थ उपजिल्हा रुग्णालय दाखल केले परंतु हात तुटल्यामुळे आणि रक्तस्त्राव जास्त होत असल्याने पुढील उपचारार्थ परभणीत रेफर करण्यात आले आहे. याबाबत रेल्वे पोलिसांनी दिलेली माहिती याप्रमाणे आमरस्सर नांदेड गाडी क्रमांक १२ ७१६ या सचखंड एक्सप्रेस बुधवार २७ नोव्हेंबर रोजी नियोजित वेळेपेक्षा उशिराने म्हणजे रात्री ७:३१ वाजता शेलु रेल्वे स्टेशन वरील प्लॅटफॉर्म दोन वर आली. यावेळी नंदिग्राम एक्सप्रेस प्लॅटफॉर्म एक वर होती.तर सचखंड एक्सप्रेस प्लॅटफॉर्म दोनवर होती. या सचखंड एक्सप्रेस मध्ये चढताना हा अपघात झाला.यामध्ये प्रवासी रेल्वे खाली सापडल्याने त्याच्या हातावरून गाडी गेल्याने हात तुटला.या घटनेनंतर तात्काळ रुग्णालयात दाखल करताना या प्रवाशाने मला वाचवा म्हणत संजय पांडुरंग पांडे वय ५० वर्षे राहणार वैजापूर एवढेच बोलू शकला. या जबर मार लागल्याने त्याची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.

# राठोड यांना विधानपरिषदेवर घेण्याची मागणी

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजाचा वनवास संपवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून मराठवाड्यातील बंजारा समाजाला न्याय देण्याची मागणी बंजारा समाजाचे युवा नेते रमेश पवार यांच्यासह युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्याकडे इमेलद्वारे केली आहे.

सोनपेठ नगरीचे नगराध्यक्ष म्हणून चंद्रकांत राठोड यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. वेळोवेळी पक्षाची ध्येयधोरणे आणि विचार तळागळात पोहचवण्यासाठी परिश्रम घेतले आहेत.बंजारा समाजाच्या तुलनेत आणि मराठवाड्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात बंजारा समाजाला नेतृत्व मिळत नसल्याने मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा चेहरा म्हणून चंद्रकांत राठोड यांना संधी देण्याची मागणी यातून त्याांनी केली आहे. जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या नेहमी सुख दुःखात उभे राहून सर्व समाजाला वेगळी दिशा देण्याचे काम राठोड करत असतात.विकासाचा अजेंडा असल्याने सोनपेठ शहर सोडून विकास करण्यासाठी मर्यादा येत असतात.सोनपेठ शहराचा बंजारा समाज सक्षम झाला आहे. जिल्हातील बंजारा समाज हा विकासापासून कोसोदूर आहे. जिल्ह्यातील तांडा सुधार वस्ती अध्यक्ष,गट नेता तसेच सोनपेठ नगरीचे माजी नगराध्यक्षपद गेल्या पंचवीस वर्षापासून चंद्रकांत राठोड यांच्याकडे असल्याने खूप मोठा अनुभव आहे.आम्हा सर्व बंजारा समाजाची मागणी राहील कि ही जागा परभणी जिल्यात आदरणीय राठोड यांना देण्यात यावी त्याामुळे बंजारा समाजावर अन्याय होणार नाही आणि विकास होईल.परभणी जिल्ह्यातील लोकसंख्याच्या अभ्यास केला तर बंजारा समाज हा दुसऱ्या क्रमांकावर आहे.



जिंतूर- सेलु विधानसभा मतदारसंघावर आमदार मेघना बोर्डीकर साकोरे यांची दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ.साकोरे यांचा सत्कार केला.

### रब्बी हंगाम पीक स्पर्धेत सहभागी व्हा

**परभणी,/प्रतिनिधी-** राज्यांतर्गत राबविण्यात येणाऱ्या रब्बी हंगाम पिक स्पर्धेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, त्याकरीता ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गंगाखेडात शिक्षकाची पत्नी व मुलीसह रेल्वेरुळाखाली जावून केली आत्महत्या

**गंगाखेड/ प्रतिनिधी-** येथील एका विद्यालयातील मसनाजी सुभाष तुडमे (वय ४५) या शिक्षकाने पती व मुलीसह गुरुवारी (दि.२८) दुपारी ३ वाजेच्या सुमारास एका मालगाडीसमोर झोपून आत्महत्याा केल्याची खळबळजनक घटना घडली.

रेल्वेस्थानकाजवळ असलेल्या धारखेड शिवारात रेल्वे पुलावर या शिक्षकासह पती व मुलीने रेल्वे मार्गावर झोपून जीवनयात्रा संपवली. त्याा तीघांचे मृतदेह आढळून आल्याबरोबर प्रत्याक्षदर्शनींनी ती गोष्ट तात्काळ पोलिसांना कळविली. उपविभागीय अधिकारी दिलीप टिप्परसे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आसेफ शेख, जमादार दिपक वावळे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली व मृतदेह ताब्यात घेवून ओळख पटविण्याचे काम सुरु केले तेव्हा खिशात सापडलेल्या मोबाईलवरुन समोरच्या व्यक्तीस संपर्क केल्यानंतर आत्महत्याा केलेल्यापैकी व्यक्तीची ओळख पटली. शहरातीलच एका विद्यालयात शिक्षक असणाऱ्या मसनाजी सुभाष तुडमे (वय



४५) या शिक्षकाने पती व मुलीसह आत्महत्याा केल्याची माहिती समोर आली.

दरम्यान, या घटनेबाबत पोलिसांनी प्राथमिक माहिती दिली असून, या कुटूंबियांनी आत्महत्याा का केली याचे कारण स्पष्ट केले नाही. त्याा संदर्भात पोलिसांनी तपास सुरु केला होता. दरम्यान, तो शिक्षक अहमदपुर तालुक्यातील किनीकद्दु या गावचा मूळ रहिवाशी असल्याची माहिती समोर आली आहे.

### जात वैधता प्रमाणपत्रासाठी २० डिसेंबरपर्यंत प्रस्ताव

**परभणी,/प्रतिनिधी-** शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या वर्षात १२ वी विज्ञान शाखेतील तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्रा व औषधनिर्माण शास्त्रा या व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, भटक्या जमाती -विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग यामधून प्रवेश घेण्यास ईच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या जातप्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी आपला अर्ज संकेतस्थळावर भरावा. ऑनलाईन भरलेल्या

अर्जाची प्रिंट व त्यासोबत आवश्यक सर्व मूळ कागदपत्रासह जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती या कार्यालयाकडे २० डिसेंबरपर्यंत सादर करावे, असे आवाहन जिल्हा जातपडताळणी समितीने केले आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# विधानसभेत पाठवण्याची ताकद सर्वसामान्यांच्या हाती : आनंदराव पाटील बोंढारकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

नांदेड दक्षिण विधानसभेच्या आमदार पदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभाचे आयोजन आयोजक बालाजी पाटील भायगावकर सरपंच व व्यापारी मित्र मंडळ नवा मोंढा नांदेड यांच्या वतीने दिनांक २८ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला. याप्रसंगी विधानसभेत पाठवण्याची ताकद सर्वसामान्यांच हाती असे मत

नवनिर्वाचित आमदार आनंदराव बोढारकर यांनी व्यक्त केले. नांदेड दक्षिण विधानसभेच्या आमदार पदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभाचे आयोजन दिनांक



२८नोव्हेबर रोजी नांदेड नवीन मोढा येथे आयोजित सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी बोलताना नवनिर्वाचित आमदार आनंदराव पाटील बोंढारकर म्हणाले कि निवडूनक जीकंने हे जनतेच्या हातात आहे जनता म्हणजेच ईश्वर आहे आणि त्यांच्या आशीर्वादाने मी आज एका ग्रामीण भागातून थेट विधानसभेत गेलो आहे असल्याचे सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की येथील शेतकरी, कामगार, शेतमजूर, व्यापारी यांचा कुठलाही प्रश्न मी विधानसभेत लावून धरून तो प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न करीन. मला निवडून आणण्याचे श्रेय माजी खासदार हेमंत पाटील यांना दिले. या सत्कार सोहळ्याप्रसंगी अध्यक्ष म्हणून मार्केट असोसिएशनचे प्रल्हाद पाटील काकांडीकर हे होते मुकेश गुप्ता, नागनाथ पाटील, प्रल्हाद पाटील, खांडेकर महेश , गडूशेठ संभाजी जाधव, विठ्ठलराव देशमुख कासार , सदाशिव पाटील पुंड, शिवाजी पाटील कदम, बिल्लू महाराज ,अशोक वांगीकर, बबनराव कदम या सहा आदींची उपस्थिती होती.

# शास्त्री महाविद्यालयात विद्यापीठाची हिवाळी पदवी परीक्षा सुरळीत

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. २९ नोव्हेंबर**

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत घेण्यात येणारी हिवाळी पदवी परीक्षा महाविद्यालयाचे प्रा.डॉ.कमलाकर कनसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडत आहे.

सविस्तर वृत्त असे की धर्माबाद येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा



विद्यापीठाच्या वतीने दि.२६ नोव्हेंबर पासुन घेण्यात येणारी हिवाळी परीक्षा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कमलाकर कनसे यांच्या मार्गदर्शनाखाली व परीक्षा विभागप्रमुख डॉ. सुनीलचंद्र सोनकांबळे, सहाय्यक परीक्षा विभागप्रमुख प्रा.रामराव शेवलीकर यांच्या निरीक्षणाखाली कॉपीमुक्त सीसीटीव्हीच्या नजरेत सुरळीत पार पडत असून सदरील परीक्षा सुरळीतपणे पार पडण्यासाठी परीक्षा विभागातील कर्मचारी मारुती डेबेकर,व्यंकटेश पालकृतवार, माधव मिरदोडे, राजेश गोविंदलवार, नारायण आडेराव, श्रीनिवास गोरजे,राजेश कोत्तावार बालाजी गंठोड इत्यादीचे सहकार्य लाभत आहे.

# सासऱ्याच्या खूनप्रकरणी जावयाला जन्मठेपेची शिक्षा

## वसमत जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ नोव्हेंबर**

वसमत शहरातील आसेगाव रस्त्यावरील एका शाळेमध्ये भेटण्यासाठी आलेल्या दिव्यांग सासऱ्याचा खून करणाऱ्या जावयाला वसमतच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत येथील एका शाळेमध्ये वॉचमनचे काम करणाऱ्या काशिनाथ साहेबराव चौरे यास त्याचा सासरा पंडीतराव विठ्ठलराव पानधोंडे हे १ फेब्रुवारी २०२४ रोजी भेटण्यासाठी आले होते. यावेळी काशिनाथ यांच्या खोलीमध्ये दोघेही गप्पा मारत बसले होते. यावेळी अचानक दोघांमध्ये वाद सुरू झाला. या वादातून हाणामारी झाली. यामध्ये काशिनाथ यांनी त्याचा सासरा पंडीतराव यांना लाकडी दांड्याने मारहाण केली. या मारहाणीत पंडीतराव यांचा जागीच मृत्यू झाला होता.

या प्रकरणात संबंधीत शाळेचे संचालक नामदेव दळवी यांनी वसमत शहर पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून काशिनाथ चौरे याच्यावर खूनाचा गुन्हा दाखल झाला होता. वसमत पोलिस ठाण्याच्या तत्कालीन महिला पोलिस उपनिरीक्षक श्रीदेवी पाटील, जमादार केशव गारोळे यांनी आरोपी काशिनाथ साहेबराव चौरे रा पुयनी खुर्द याला अटक केली होती. पोलिसांनी अधिक तपास करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

या प्रकरणात दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी काशिनाथ चौरे याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात सरकारी अभियोक्ता म्हणून एन एच नायक यांनी काम पाहीले तर कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून उपनिरीक्षक विनायक केंद्रे , बेटकर, पतंगे यांनी कामकाज पाहीले.



**हिंगोली- पोलिस वाहतुक शाखेच्यावतीने शहरातील विविध चौकात वाहन चालकांकडे परवाना तसेच कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे. यावेळी तपासणी करतांना पोलिस कर्मचारी. छाया- विजय गुंडेकर**

# औंढ्यात मुख्याधिकाऱ्याच्या खुर्चीला चपलांचा हार

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २९ नोव्हेंबर**

येथील नगरपंचायत अंतर्गत अनेक कामे प्रलंबित असल्यामुळे मुख्याधिकारी यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून औंढा नगरपंचायतीचे नगरसेवकांनी कंटाळून खुर्चीला चपलांचा हार घालीत निषेध व्यक्त केला आहे.



मुख्याधिकारी यांनी दिनांक १४ ११ २०२४ रोजी आचारसंहितेच्या काळात एका वाईन शॉपला कुठल्याही नगरसेवकाला व कुठलाही ठराव संमत नसताना एन ओ सी देऊन परवानगी दिली. या विषयाला गावातील सर्वच नगरसेवकाकडून विरोध असतानाही कुठल्याही नगरसेवकाला किंवा नगराध्यक्षाला विश्वासात न घेता सदर एन ओ सी दिल्याकारणाने त्यांच्या खुर्चीला चपलांचा हार घालून त्यांच्या केबिनला कुलूप लावून निषेध व्यक्त केला. दरम्यान गावातील अनेक घरकुलांचे व अनेक प्रमाणपत्रांची तसेच अनेक विकास कामांची व पूर्ण झालेल्या विकास कामांचे व अपूर्ण असलेल्या विकास कामांचे देयके बाकी असताना व अनेक प्रमाणपत्रे स्वाक्षरी विना बाकी असताना व अनेक प्रकरणे प्रलंबित असताना सदर वाईन शॉपला परवानगी दिली. सदर परवानगी कुठल्या आधारे दिली व का दिली हे प्रकरण गुलदस्त्यात असले तरीही मात्र त्यांनी आचारसंहितेच्या काळात वाईन शॉपला एनओसी देऊन परवानगी दिल्याने आचारसंहितेचा भंग झाला असून यावर वरिष्ठ काय निकाल देतात हे पाहणे उत्सुकतेचे झाले आहे दरम्यान गावातील सामान्य नागरिकांत कचरा व्यवस्थापन, गावातील सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन व स्वच्छता याकडे लक्ष न देता मुख्याधिकारी यांनी या वाईन शॉपला एनओसी देऊन काय साध्य केले अशी चर्चा करत आहेत. यावेळी नगराध्यक्ष सपना कनकुटे व उपनगराध्यक्ष अनिल देव तसेच माजी नगराध्यक्ष कपिल खंदारे, उपनगराध्यक्ष साहेबराव देशमुख दिलीप कुमार राठोड, राहुल, मनोज देशमुख, अनिल देशमुख, नगरसेविका जया देशमुख, शितल पवार आदींची उपस्थिती होती.

# २ डिसेंबरला हिंगोलीत जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ नोव्हेंबर**

शासनाच्या आदेशानुसार डिसेंबर २००७ पासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. डिसेंबर महिन्याचे जिल्हास्तरीय लोकशाही दिन दि. २ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे आयोजित करण्यात आले आहे. या लोकशाही दिनास जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि, जिल्हा पाणी पुरवठा समन्वय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे, देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार, निवेदन वैयक्तीक स्वरुपाची नसेल तर तसेच वरीलप्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनासाठी स्वीकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबंधित विभागाकडे आठ दिवसात पाठविण्यात येतील व त्याची प्रत अर्जदारास देण्यात येईल. निवडणूक आचारसंहिता लागू असलेल्या कालावधीत लोकशाही दिनाचे आयोजन केले जाणार नाही. तसेच संबंधित विभागाने अर्जदाराला अंतिम उत्तर लोकशाही दिनानंतर शक्य तितक्या लवकर एक महिन्याच्या आत देणे आवश्यक राहील, असे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### बालसंगोपन योजनेसाठी आधार सिडींग करा

हिंगोली- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेसाठी बालकांचे बँक खाते आधार सिडींग करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजाभाऊ मगर यांनी केले आहे. या योजनेच्या लाभासाठी पात्र असलेल्या व लाभ सुरु असलेल्या बालकाचे वय १० वर्षाच्या आत असल्यास त्या बालकांचे त्यांच्या पालकांसोबत संयुक्त बँक खाते उघडून सदर खात्याशी बालकांचा आधार क्रमांक डीबीटी, सिडींग करावा. तसेच ज्या बालकांचे वय १० वर्षापेक्षा जास्त आहे अशा बालकांचे स्वतंत्र बँक खाते उघडून आधार क्रमांक सिडींग करावा. बालकांचा आधार क्रमांक बँक खात्याशी सिडींग नसल्यास या योजनेचा लाभ जमा होणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच जर बालकांचे स्वतंत्र खाते किंवा त्यांचे पालकांसोबत संयुक्त बँक खाते पूर्वीपासूनच उघडलेले असतील तर ते खाते सद्यस्थितीत चालू आहे की बंद आहे याची खात्री करावी.

### अवैध वाळू वाहतुक करणारे टिप्पर पकडले, औंढा पोलिसांची कार्यवाही



औंढा नागनाथ- येथील मौजे धारफाटा परीसरात औंढा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी तपास कामी गस्तीवर असताना त्यांना एक हायवा टिप्पर आढळून आला असता त्यास थांबवून चौकशी केली. त्यामध्ये वीना परवानगी रेतीची वाहतूक करीत असल्याचे दिसून आले दरम्यान सदर हायवा टिप्पर क्रमांक चक-२२ए एन ४९३० अशोक लीलँड कंपनीचा व आरोपी देवीदास दत्तराव घुले यास ताब्यात घेऊन औंढा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणांमध्ये पोलिसांकडून रेती सह एकूण २५ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दर कार्यवाही औंढा पोलीस स्टेशनचे पोलीस जमादार संदीप टाक, ढाकरे, कुटे यांनी केली असून पोलीस जमादार संदीप टाक यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास संदीप टाक करीत आहेत. औंढापोलीस कर्मचारी यांच्याकडून अवैध गौण खनिज वाहतुकीवर कार्यवाही होत असली तरीही महसूल विभाग मात्र कार्यवाही बाबतीत उदासीन असल्याचे दिसून येत आहेत.

# बालविवाह मुक्त भारत मोहीमेंतर्गत महात्मा फुले विद्यालयात मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ नोव्हेंबर**

इन्स्टिटयूट ऑफ सोशल अवेरेनेस रिफॉर्म-इसार, यवतमाळ आणि ॲसेस टु जस्टीस फॉर चिल्ड्रन प्रोग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने येथील महात्मा जोतिबा फुले विद्यालय, कळमनुरी येथे बाल विवाह मुक्त भारत मोहिमेअंतर्गत विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना बाल विवाहाची शपथ घेण्यात आली. यावेळी बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच बालविवाह कायदा आदी बाबत विद्यार्थीनींना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित एस. डी. मुलगीर (मुख्याध्यापक), श्रीमती. शालिनी नाईक (महिला पोलीस निरीक्षक) हेंबाडे (बाल कल्याण समिती सदस्य), दिवाकर भोयर (संचालक-इसार संस्था) श्रीमती आरती सावळे (दामिनी पथक), मिथुन कांबळे (इसार संस्था प्रतिनिधी), सतीश खंदारे ( जिल्हा समन्वयक), १०९८ चाईल्ड लाईन टीम, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, तसेच शाळेतील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता विद्यालय तसेच इसार संस्थेचे कर्मचारी सोनिया भगत, माया येरणे, अचल खंदारे, मायादेवी साबळे, शेख साबेर यांनी परिश्रम घेतले.

# आज व्यापारी महासंघाची महत्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ नोव्हेंबर**

व्यापारी महासंघ मराठवाडा विभाग, कॉन्फेडर्रेशन ऑल इंडिया ट्रेडर्स चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमल बंब यांच्या नेतृत्वाखाली सुखदेव बजाज सचिव, सौ. सिता रामभाऊ मोहिते पाटील महिला आघाडीच्या अध्यक्षा,सौ. आनंदी सुब्रमण्यम अय्यर महिला आघाडीच्या सचिव यांच्या संपर्क दौऱ्याच्या निमित्ताने हिंगोली येथे हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघ ( कैट) च्या बैठकीचे आयोजन दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ शनिवार रोजी दुपारी १२.३० वाजता हिंगोली येथील हॉटेल श्री गणेश इन मध्ये करण्यात आलेले आहे. व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणी, व्यापाऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा उद्योग व्यवसाय व्यापारात करावयाचा वापर व याकरता संघटनेच्या पदाधिकारी यांनी जिल्ह्यातील व्यापारी यांना संघटनेच्या माध्यमातून कोणत्या पद्धतीने प्रशिक्षित करून मार्गदर्शन करावे याबाबत या बैठकीत व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यासोबत चर्चा करणार असून हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाचे सर्व पदाधिकारी यांनी सदर बैठकीला वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे.

# तंबाखूजन्य व अंमली पदार्थाला प्रतिबंध करा- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ नोव्हेंबर**

शहरातील नगर पालिका, आरोग्य विभाग व पोलीस यानी संयुक्त पथक तयार करून तंबाखू जन्य पदार्थ व अंमली पदार्थाला प्रतिबंध करण्यासाठी विशेष मोहीम राबवून कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्या.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक दि. २६ नोव्हेंबर, २०२४ घेण्यात आली. यावेळी अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, समाज कल्याणचे ए. एम. वागतकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विकास पाटील, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मोहन मातकर, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी डॉ. प्रकाश जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचे डॉ. बालाजी भाकरे, डॉ. निशांत मानका, अन्न व औषध प्रशासन विभागाचे मनोज पैठणे, वन विभागाचे सचिन माने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी जिल्हा रुग्णालयांच्या तंबाखू नियंत्रण पथकाने पोलिसांचे सहकार्य घेऊन शाळा, विद्यालय, महाविद्यालय, रुग्णालयासमोर पानशॉपीवर गुटखा विक्री होत असल्यास त्यांच्यावर कोटपा कायद्यानुसार कार्यवाही करावी. अन्न व औषध प्रशासन विभागाने मेडीकल स्टोअर्सवर अंमली पदार्थ किंवा नशा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या औषधाची विक्री होत असल्याचे आढळून आल्यास त्या ठिकणी डमी ग्राहक पाठवून कार्यवाही करण्यात यावी. सर्व सदस्यांनी आपापल्या कार्य क्षेत्रातील परिसरात गांजा, अंमली पदार्थ (छ.ऊझ.ड.) सदराखालील गुन्हे घडणार नाहीत याबाबत सर्वांनी लक्ष ठेवावे आणि तात्काळ नजीकच्या पोलीस स्टेशनला माहिती कळवावी.

जिल्ह्यातील गांजा, अंमली पदार्थ (एन.डी.पी.एस.) संबंधाने जास्तीत जास्त कार्यवाही करण्यासाठी पोलीस विभागाने विशेष मोहीम राबवावी. तसेच ज्या गांजाची कार्यवाही झाली आहे, अशा गावातील माहिती न देणाऱ्या पोलीस पाटलांवर कार्यवाही करावी, अशा सूचना केल्या.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांनी हिंगोली जिल्ह्यात गांजा वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच तात्काळ गुन्हे दाखल केले आहेत. विधानसभा निवडणूक आचारसंहिता काळात औंढा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे आसोला शिवारातील शेत गट क्र २६० मध्ये १० गांजाची झाडे व आखाडा बाळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे बोल्डावाडी शिवारातील शेत गट क्र ५८ मध्ये १३९ गांजाची झाडे मिळून आले आहेत. या दोन्ही गुन्ह्यात १४९ लहान, मोठे गांजाची झाडे वजन २९.७२ कि.ग्रॅम मिळून आली आहेत. याबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती दिली.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे मनोज पैठणे यानी मेडीकल स्टोअर्स तपासणीत कोठेही अंमली पदार्थ किंवा नशेची औषध मिळून आली नसल्याने कार्यवाही केली नाही. तसेच वसमत येथील एम.आय.डि.सी. मध्ये असलेली भुमीन्युट्रोसिटी कंपनीमध्ये नियमानुसार केमिकल वापरल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची माहिती दिली.

# हिंगोलीची साखर रेल्वेद्वारे परराज्यात रवाना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यात तयार करण्यात आलेली लाखो टन साखर रेल्वेमार्गे दि २८ नोव्हेंबर रोजी विक्रीसाठी रवाना करण्यात आली आहे.हिंगोली जिल्ह्यातील पूर्णा सहकारी साखर कारखाना, बाराशिव सहकारी साखर कारखाना, डोंगरकडा येथील साखर कारखाना तसेच टोकाई येथील सहकारी साखर कारखान्यात यावर्षी लाखो टन साखर उत्पादन करण्यात आले. या साखरेला परराज्यात मोठी मागणी असल्यामुळे तसेच योग्य भाव मिळत असल्यामुळे या कारखान्यांमधून दि २८ नोव्हेंबर रोजी लाखो टन साखर अनेक ट्रकमधून हिंगोली येथील रेल्वे स्थानकात आणण्यात आली. रेल्वे स्थानकात आणल्यानंतर साखरेची पोती रेल्वेच्या रॅकमध्ये भरण्यात येत होती. साखरेला सध्या बाजारात चांगला भाव मिळत असल्याचे दिसत आहे.